अंदाज समिती

२०१२-२०१३

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सत्ताविसावा अहवाल

सत्यमेव जयते

(मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या कृषि विद्यापीठास राज्य/केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, झालेला प्रत्यक्ष खर्च, राबविण्यात येणारे प्रकल्प यासंदर्भातील समितीचा अहवाल)

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक डिसेंबर, २०१२ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
डिसेंबर, २०१२

अंदाज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

सत्ताविसावा अहवाल

(मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या कृषि विद्यापीठास राज्य/केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान, झालेला प्रत्यक्ष खर्च, राबविण्यात येणारे प्रकल्प यासंदर्भातील समितीचा अहवाल)

अंदाज समिती
(२०१२-२०१३)

समिती प्रमुख

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.

सदस्य

२) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.
३) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स.
४) श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.
५) श्री.कालीदास कोळंबकर, वि.स.स.
६) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
८) श्री.रावसाहेब शेखावत, वि.स.स.
९) श्री.अमित देशमुख, वि.स.स.
१०) कु.प्रणिती शिंदे, वि.स.स.
११) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.
१२) श्री.विलास लांडे, वि.स.स.
१३) श्री.राजीव देशमुख, वि.स.स.
१४) श्री.सुरेश देशमुख, वि.स.स.
१५) श्री.सुधाकर देशमुख, वि.स.स.
१६) ॲड.चिंतामण वनगा, वि.स.स.
१७) श्री.विजयकुमार देशमुख, वि.स.स.
१८) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
१९) श्री.सुभाष देसाई, वि.स.स.
२०) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.
२१) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.
२२) श्री.शिशिर शिंदे, वि.स.स.
२३) श्री.विवेक पाटील, वि.स.स.
२४) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.
२५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.
* २६) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. (**दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ पर्यंत**)
२७) श्री.अनिल भोसले, वि.प.स.
** २८) श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. (**दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून**)
२९) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.
३०) डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.अशोक मोहिते, उप सचिव
३) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
४) श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)
५) श्री.विजय कोमटवार, कक्ष अधिकारी
६) श्री.मोहन काकड, कक्ष अधिकारी

---

* श्री.दिपक सांळुखे, वि.प.स. यांचा दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त.

** श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. यांची रिक्त झालेल्या जागी दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून नियुक्ती.

अंदाज समिती
(२०१०-२०११)

समिती प्रमुख

१) श्री.दिलीप मोहिते, वि.स.स.

सदस्य

२) * श्री.संजय देवतळे, वि.स.स. **(दिनांक १९ नोव्हेबर, २०१० पर्यंत)**
३) श्री.वल्लभ बेनके, वि.स.स.
४) ** श्री.सुभाष झनक, वि.स.स. **(दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीपासून)**
५) श्री.अशोक जाधव, वि.स.स.
६) श्री.माणिकराव कोकाटे, वि.स.स.
७) श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.
८) श्री.राजीव सातव, वि.स.स.
९) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
१०) श्री.शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.
११) श्री.अब्दुल रशीद ताहीर मोमिन, वि.स.स.
१२) श्री.प्रदीप जाधव नाईक, वि.स.स.
१३) श्री.पंकज भुजबळ, वि.स.स.
१४) श्री.गिल्बर्ट मेंडोन्सा, वि.स.स.
१५) श्री.संदिप नाईक, वि.स.स.
१६) श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.
१७) श्री.चैनसुख संचेती, वि.स.स.
१८) पै.संभाजी पवार, वि.स.स.
१९) श्री.प्रकाश (अण्णा) शेंडगे, वि.स.स.
२०) श्री.बबन घोलप, वि.स.स.
२१) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स.
२२) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.
२३) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
२४) श्री.अबु आसिम आजमी, वि.स.स.
२५) *** श्री.विलासराव शिंदे, वि.प.स. **(दिनांक ५ डिसेंबर, २०१० पर्यंत)**
२६) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.
२७) श्री. मोहन जोशी, वि.प.स.
२८) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
२९) श्री.जगदीश गुप्ता, वि.प.स.
३०) डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.अशोक मोहिते, उप सचिव
३) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
४) श्री.भा.शं.गायकवाड, अवर सचिव (समिती)
५) श्री.विजय कोमटवार, कक्ष अधिकारी

***** श्री.संजय देवतळे, वि.स.स. यांचा दिनांक १९ नोव्हेंबर, २०१० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून समावेश झाल्यामुळे जागा रिक्त.

******श्री.सुभाष झनक, वि.स.स. यांची रिक्त असलेल्या जागी दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीपासून नियुक्ती.

******* श्री.विलासराव शिंदे, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे जागा रिक्त.

अ नु क्र म णि का

अ.क्र. (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
१)	प्रस्तावना	
२)	अहवाल	
३)	समितीचे अभिप्राय व शिफारशी	
४)	बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त	

प्रस्तावना

मी अंदाज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन, मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या माहिती संदर्भातील अंदाज समितीचा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ रोजी परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठास शासनाकडून मिळणारे अनुदान व प्रत्यक्ष खर्च तसेच विद्यापीठाने केलेले संशोधन व राबविण्यात आलेल्या योजना / प्रकल्पांना भेटी देऊन संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली. तत्पूर्वी समितीने या कृषि विद्यापीठासंदर्भात कृषि विभागाकडून लेखी माहिती मागविली. या माहितीच्या तसेच प्रत्यक्ष भेटीच्या व चर्चेच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ रोजी व त्यानंतर दिनांक ११ सप्टेबर, २०१२ रोजी प्रधान सचिव, कृषि विभाग व कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने सदर अहवालात आपले अभिप्राय व शिफारशी व्यक्त केल्या आहेत.

समितीच्या बैठकीस उपस्थित राहून सहकार्य केल्याबाबत डॉ.सुधीर गोयल, प्रधान सचिव, कृषि विभाग यांची समिती अत्यंत आभारी आहे, त्याच प्रमाणे समितीच्या भेटी व बैठकीच्या वेळी उपस्थित राहून समितीला अपेक्षित माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल व केलेल्या सहकार्याबद्दल समिती डॉ.के.पी.गोरे, कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ यांचे तसेच डॉ.बी.बी.भोसले, कुल सचिव, डॉ.एन.डी.पवार, संचालक विस्तार शिक्षण व डॉ.जी.आर. मोरे, संचालक, संशोधन यांचेही आभार मानते.

समितीच्या बैठकीच्या वेळी आपला अमूल्य वेळ देऊन समिती सदस्यानी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले, त्याबद्दल मी त्यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

समितीने दिनांक डिसेंबर, २०१२ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो संमत केला.

विधान भवन
नागपूर,
दिनांक डिसेंबर, २०१२.

(शामराव उर्फ बाळासाहेब पाटील)
समिती प्रमुख
अंदाज समिती

अहवाल

सन १९५६ साली परभणी येथे त्या काळी (हैद्राबाद निजाम सरकार प्रशासनाने) पहिले ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र सुरु केले. त्यानंतर ग्राम विस्तार अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण गरजा लक्षात घेवून सन १९६० मध्ये जालना येथे दुसरे ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले. फळे, भाजीपाला आणि फुले लागवडीची कुशलता विकसीत करण्यासाठी १९६५ साली एक वर्ष कालावधीचे माळी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेसाठी खऱ्या अर्थाने उच्च कृषि शिक्षणाची सुरुवात कृषि महाविद्यालय, परभणीच्या स्थापनेने झाली. हे महाविद्यालय राज्यांच्या भाषिक पुर्नरचनेच्या अगोदर हैद्राबाद प्रशासनाच्या उस्मानिया विद्यापीठा अंतर्गत सुरु करण्यात आले होते. नंतर हे महाविद्यालय मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या अंतर्गत संलग्न करण्यात आले. महाराष्ट्रात पहिले कृषि विद्यापीठ, सन १९६८ मध्ये स्थापन झाले. कृषि विद्यापीठ स्थापनेसाठी मराठवाड्यातून मोठ्या प्रमाणात चळवळ उभारली गेली. याला प्रतिसाद म्हणून शासनाने मराठवाड्यात परभणी येथे दिनांक १८ मे, १९७२ रोजी अलग कृषि विद्यापीठाची स्थापना केली. मराठवाड्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात औरंगाबाद, परभणी, लातूर, नांदेड, बीड, जालना, उस्मानाबाद व हिगोंली या आठ जिल्ह्याचा समावेश होतो. कृषि अनुषंगीक क्षेत्रातील शाखांचे शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण ही विद्यापीठाची प्रमुख तीन कार्य आहेत.

उद्दिष्टे :

१) कृषि विद्यापीठाच्या विविध शाखांमध्ये समन्वय साधून कृषि आणि अनुषंगिक क्षेत्रात शिक्षण देणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे पदविका/पदवी प्रमाणपत्र प्रदान करणे.

२) मराठवाड्यातील जनतेच्या आर्थिक स्वावलंबणासाठी कृषि, पशुसंवर्धन व अनुषंगिक क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी समस्याभिमुख, पायाभुत संशोधन करणे.

३) नैसर्गिक संसाधनाची जपवणुक आणि शाश्वत वापर यासाठी आराखडा विकसीत करणे.

४) विस्तार शिक्षण उपक्रमाचे आयोजन करणे. प्रथम दर्शनीय तंत्रज्ञान प्रसार, प्रशिक्षण देणे, पिक प्रात्यक्षिक आयोजन व संपर्क यंत्रणा विकसीत करणे.

५) मराठवाड्यातील शेतकरी, महिला शेतकरी व शेत मजूरांचे राहणीमान उंचावण्यासाठी शेती, आणि अनुषंगीक क्षेत्र जसे पशुसंवर्धन, मत्सव्यवसाय इत्यादी क्षेत्रात लागवड तंत्रज्ञान, पिक संरक्षण, काढणी, विपणन, काढणी पश्चात वापर यावर तंत्रज्ञान विकसीत करणे.

६) विभागातील प्रमुख पिकांचे न्युकलियस, ब्रिडर, फाउंडेशन बिजोत्पादन करणे, तसेच शेती उत्पादनातून अर्थाजण करणे.

शिक्षण :

१९५६ साली कृषि महाविद्यालय, परभणीच्या स्थापनेने मराठवाड्यातील जनतेसाठी खऱ्या अर्थाने उच्च कृषि शिक्षणाची सुरुवात झाली. विद्यापीठ स्थापनेनंतर अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी व गृहविज्ञान महाविद्यालय, परभणी (१९७६), उद्यान विद्या महाविद्यालय, परभणी (१९८४), कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, परभणी (१९८७), कृषि महाविद्यालय, लातूर (१९८७), कृषि महाविद्यालय, बदनापुर, अंबेजोगाई व उस्मानाबाद (२०००) ; कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर (२००६); कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकुर (२००८) येथे स्थापन करण्यात आले आहेत.

विद्यापीठात वेगवेगळ्या ७ शाखांच्या ११ घटक व २९ संलग्न महाविद्यालयातून कृषि आणि अनुषंगिक शाखांचे शिक्षण दिले जाते. ज्यात कृषि, कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, उद्यानविद्या, गृहविज्ञान, जैवतंत्रज्ञान व व्यवसाय व्यवस्थापन या शैक्षणिक शाखांचा समावेश आहे. सर्व शाखामध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहेत. पदवी अभ्यासक्रमासाठी घटक महाविद्यालयात ७३२, पदव्युत्तर अभ्यासक्रमाची ३३८ तर आचार्य विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता २९ आहे. माध्यमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना कृषि पदविका शिक्षणाच्या सोई ९ घटक व ५३ खाजगी कृषि तंत्र विद्यालयातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

संशोधन :

मराठवाडा कृषि विद्यापीठात चालणारे संशोधन ९ संशोधन केंद्र, ८ उपकेंद्र व २९ योजनेंमार्फत चालते. विद्यापीठाने भरीव संशोधन करून विविध अन्नधान्य, कडधान्य, गळीत धान्य, ऊस, कापुस पिकांचे तसेच भाजीपाला, फळे, फुले आणि चारा पिकांचे अनेक वाण विकसीत केले आहेत. आजपावेतो विद्यापीठाने ११५ वाणांची निर्मिती केली आहे. मृद व जलसंधारण, विविध पिके आणि पिक लागवड पध्दती, खते आणि पाणी व्यवस्थापन, आंतर मशागत, किड, रोग, आणि तणाचे एकात्मिक व्यवस्थापन, सुधारीत औजारे, हरीतगृहातील शेती, प्रक्रिया आणि विपणन, कोरडवाहू शेतीतंत्रज्ञान, पशुपालन, दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन या विषयी सखोल संशोधन करून ५८१ शिफारसी प्रसारीत केल्या आहेत. सुधारित वाणाच्या बिजोत्पादनाबरोबरच फळझाडांची रोपे/कलमे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. माती, पाणी उति व पेशी परिक्षण याबाबच्या अद्यावत प्रयोगशाळेची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध आहेत.

विस्तार शिक्षण :

मराठवाडा कृषि विद्यापीठाने केलेले समस्याभिमुख कृषि संशोधन शेतकऱ्यांपर्यत पोहचविण्याचे कार्य विद्यापीठामार्फत पार पाडण्यात येते व यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करून विद्यापीठाने अनेक अभिनव विस्तार शिक्षण उपक्रम राबवून आपले संशोधन खेडोपाडी पोहचविले आहे. आधुनिक कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत

पोहचविण्याचे कार्य विस्तार शिक्षण योजना, परभणी, कृषि तंत्रज्ञान माहीती केंद्र, परभणी, विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र, परभणी, लातूर, अंबेजोगाई व औरंगाबाद : कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद, तुळजापुर व खामगांव या योजनाद्वारे केल्या जाते.

सन २००७-२००८ ते २०१०-२०११ या चार वर्षाचा अनुदानाचा आणि खर्चाचा तपशील दर्शविणारा गोषवारा (विवरणपत्र १ ते ६) **प्रपत्र १** मध्ये नमूद करण्यात आला आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठासाठी एकूण २५८७.७४ हेक्टर जमिन संपादित करण्यात आली होती व सर्व जमिनीचा पूर्णतः वापर करण्यात येत आहे. संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला वा नुकसान भरपाई रक्कम रुपये २०१.५१ लक्ष संबंधीत शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहे. तसेच वाढीव मोबदला रकमेपोटी न्यायालयाच्या आदेशानूसार रुपये १,१०,७०,१५८/- शेतकऱ्यांना अदा करण्यात आले आहेत.

भू-संपादन :

मराठवाडा कृषि विद्यापीठाकरीता मौजे शेंद्रा, बलसा (खुर्द), खानापूर व सायाळा ता.जि.परभणी येथील शेतकऱ्यांची सुमारे २५३०.५४ हेक्टर जमिन टप्या टप्याने १९७२-७३ ते १९७७-७८ या कालावधीत संपादीत करण्यात आलेली आहे. तद्वतच लातूर येथील कृषि महाविद्यालयाकरिता, लातूर परिसरातील ५७.२० हेक्टर जमिन सन १९९३-९४ या वर्षी संपादित करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे मराठवाडा कृषि विद्यापीठासाठी एकूण २५८७.७४ हेक्टर जमिन शेतकऱ्याकडून संपादित करण्यात आलेली आहे.

संपादित केलेल्या जमिनीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	गावाचे नांव	संपादित केलेले क्षेत्र (हे)	शेतकऱ्यांची संख्या	संपादनाचे वर्ष	अदा केलेली मोबदला रक्कम (रूपये लक्ष)
१)	शेंद्रा ता.जि.परभणी	८१७.६८	३८१	१९७२-७३ व १९७६-७७	३४.२८
२)	बलसा (खुर्द) ता.जि.परभणी	७१०.४५	३०५	१९७७-७८	३६.२०
३)	खानापूर ता.जि.परभणी	५४०.६८	१८१	१९७३-७४	२७.१८
४)	सायाळा ता.जि.परभणी	४६१.७३	८५	१९७५-७६	२८.८५
५)	लातूर (कृषि महाविद्यालय)	५७.२०	१४	१९९३-९४	७५.००
	एकूण	**२५८७.७४**	**९६६**		**२०१.५१**

शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनीच मोबदला रक्कम रु.२०१.५१ लक्ष भू-संपादन कायद्यामधील तरतुदीनुसार मंजूर करण्यात आलेल्या निवाड्यानुसार संपादनाचे वेळीच अदा करण्यात आलेला आहे. याशिवाय संबंधित जमिन मालकांनी मोबदला रक्कम वाढवून मिळण्यासाठी दिवाणी न्यायालयात दाखल

केलेल्या प्रकरणातील न्यायलयाच्या निर्णयानुसार वेळोवेळी वाढीव मोबदला रक्कम देखील अदा करण्यात आलेली आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठाकरीता मौजे बलसा (खुर्द) व मौजे शेंद्रा ता.जि.परभणी येथील ग्रामस्थांच्या जमिनीसोबतच संपूर्ण गांवठाण, तेथील घरे, बांधकामे, मोकळ्या जागा इत्यादीसहीत सन १९८५-८६ व १९८७-८८ यावर्षी संपादीत करण्यात आलेले आहे आणि त्याचा मोबदला संबंधीत घर मालकांना अदा केलेला आहे. मौजे बलसा व मौजे शेंद्रा येथील बऱ्याच ग्रामस्थांनी त्यांचे संपादीत घरांचा मोबदला कमी मिळाला म्हणून तो वाढवून मिळण्याकरिता न्यायालयाच्या आदेशानुसार वाढीव मोबदल्याची रक्कम संबंधीत घर मालकांना अदा केलेली आहे.

मौजे बलसा येथील गांवठाणाचे क्षेत्र १८२९५.०४ चौ.मि. एवढे असून त्याच्या संपादनावर सुमारे ४५.०० लक्ष रुपये आणि जमिनीच्या व घराच्या वाढीव मोबदल्यापोटी ३९.०० लक्ष रुपये इतका खर्च मंजूर निवाड्यानुसार झालेला आहे व दिवाणी न्यायालयाच्या उर्वरीत प्रकरणातील आदेशानुसार हा खर्च आणखी वाढत आहे. मौजे शेंद्रा ता.जि.परभणी येथील गांवठाणाचे क्षेत्रफळ २७०५६.१६ चौ.मि.एवढे असून त्याच्या संपादनावर मंजूर निवाड्यानुसार ५६.५१ लक्ष रुपये एवढा खर्च झालेला आहे.

पुर्नवसन :-

मौजे बलसा (खुर्द) :- मौजे बलसा (खुर्द) ता.जि.परभणी येथील ग्रामस्थांच्या पुर्नवसनाकरीता मौजे खानापूर ता.जि.परभणी येथील स.न.५८ व ५९ मधील १५ हे. ६९ आर एवढी जमिन जिल्हाधिकारी, परभणी यांनी संपादीत केलेली असून त्या ठिकाणी २४८ भू-खंडाचे आरेखन केलेले आहे. त्यापैकी २०२ भू-खंडाचे ग्रामस्थांना वाटप केलेले आहे. त्यांच्या पुनर्वसनाकरीता संपादीत करण्यात आलेल्या नवीन गांवठाणात नागरी सुविधा जसे:पोहोंच व अंतर्गत रस्ते, नाल्या, पथदिवे, शाळा, समाजमंदिर, जलवाहिनी व कुप-नलिकेद्वारे पाणी पुरवठा इत्यादीकरीता सन १९८५ ते १९९२ या कालावधीत एकूण रूपये २०.५० लक्ष खर्च झालेला आहे. तसेच मौजे बलसा येथील ग्रामस्थांना नवीन गांवठाणात घरे बांधण्याकरीता, तेथील १४१ खातेदारांना प्रत्येकी रु.८०००/- या प्रमाणे ७४ व बिगर खातेदारांना प्रत्येकी रु.४०००/- या प्रमाणे एकूण २१५ खातेदारांना रु.९.६४ लक्ष अद्याप पर्यंत तहसिलदार, परभणी यांचेमार्फत अदा करण्यात आलेले आहेत.

मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचे मागणी नुसार मौजे बलसा खु. येथील ग्रामस्थांचे नवीन गावठाणात पुनर्वसानासाठी २५.०० लक्ष रुपयाचा निधी विद्यापीठ पत्र क्र अेअे-२/कअ-१०१, दिनांक २७.१.२००९ द्वारे धनादेश क्र.६२५१०३, दिनांक २३.१.२००९ नुसार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच ७.२५ लक्ष रुपयाचा निधी विद्यापीठ पत्र क्र अेअे-२/कअ-१०१, दिनांक १७.८.२००९ द्वारे धनादेश क्र.७९६१४८, दिनांक १४.८.२००९ नुसार मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच

१५.०० लक्ष रुपयाचा निधी विद्यापीठ पत्र क्र.अेअे-२/कअ-१०१, दिनांक १९.३.२०१० द्वारे धनादेश क्र.७२७८९४, दिनांक १९.३.२०१० नुसार मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. (२५.००, ७.२७, १५.०० एकूण ४७.२७ लक्ष), तसेच शासनाने निर्णय क्रमांक २६०६/प्र.क्र.४६/७-अे, दिनांक ३१.३.२०१० नुसार मौजे बलसा खु.ता.जि.परभणी येथील ग्रामस्थांचे पुनर्वसनासाठी रुपये १२६.३९ लक्ष निधी मंजूर केला असून विद्यापीठाने उक्त प्रयोजनासाठी आतापर्यंत अदा केलेला निधी रुपये ४७.२७ लक्ष वजा जाता उर्वरित निधी रुपये ७९,१२,०००/- लक्ष मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे धनादेश क्रमांक ४८३४७० दिनांक ३१.३.२०१० नुसार जमा केले आहेत. मौ.बलसा (खुर्द) येथील ग्रामस्थ नवीन गावठाणात स्थलांतरीत झालेले आहेत. (शासनाकडून पुनर्वसन कामासाठी रु.१,२६,३९,०००/- मंजूर झाले असून ही संपुर्ण रक्कम मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे अदा केली आहे)

मौजे शेंद्रा :

मौजे शेंद्रा ता.जि.परभणी येथील गांवठाणाचे क्षेत्रफळ २७०५६.१६ चौ.मि.एवढे असून त्याच्या संपादनावर मंजूर निवाड्यानुसार ५६.५१ लक्ष रुपये एवढा खर्च झालेला आहे. मौजे शेंद्रा येथील ग्रामस्थांच्या पुनर्वसनासाठी मौजे. कारेगांव ता.जि.परभणी येथील स.न.९० मधील १२.०९ हेक्टर क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे. संबंधीत जमिन मालकांस त्यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यापोटी रु.५.०७ लक्ष सन १९९८-९९ या वर्षी अदा करण्यात आलेले आहे. मौजे शेंद्रा येथील ग्रामस्थांच्या पुनर्वसनाकरीता संपादीत केलेल्या उपरोक्त जमिनीवर २६१ भुखंडाचे आरेखन करण्यात आलेले आहे.

मौजे. शेंद्रा, ता.जि.परभणी येथील ग्रामस्थांची नवीन गावठान पूनर्वसन करण्यासाठी तहसीलदार परभणी यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये २०,८३,१५०/- उपलब्ध करून देण्याबाबत विद्यापीठ पत्र दिनांक १९.३.२००५ नुसार शासानाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच मौजे. शेंद्रा ता.जि.परभणी येथील ग्रामस्थांना नवीन गावठाणात पुनर्वसन करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडून रु.१,०९,२७,०००/- एकत्रित निधीची मागणी करण्यात आली असून त्याअनुषंगाने विद्यापीठ पत्र दिनांक २६.८.२०१० द्वारे पूर्वी करण्यात आलेली मागणी रक्कम रु.२०,८३,१५०/- व मा.जिल्हाधिकारी परभणी यांनी मागणी केलेली रक्कम रु.१,०९,२७,०००/- असे एकूण पुनर्वसन कामासाठी रु.१,३०,१०,१५०/- रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यानंतर तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून मोजणी फीसाठी रु.३,८४,०५०/- मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडून पाणी पुरवठा यासाठी रु.३,६२,२५०/- असा एकूण रु.१,३७,५६,४५०/- मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

तद्वतच तहसिलदार, परभणी यांनी मागणी केल्याप्रमाणे मोजणी शुल्कासाठी ६७,१५०/- रुपयाचा निधी तहसिलदार, परभणी यांचेकडे धनादेश क्रमांक ७२८९९३ दिनांक २१.९.२०१० द्वारे जमा केला आहे. तसेच

जिल्हाधिकारी, परभणी यांनी मागणी केल्याप्रमाणे मौजे शेंद्रा येथील ग्रामस्थांचे नवीन गावठाणात पुनर्वसन करण्यासाठी मुलभुत नागरी सुविधा निर्माण करण्याकरिता शासनाकडून निधी मंजूर होईपर्यंत तातडीची गरज म्हणुन रु.२५ लक्ष रुपयाचा निधी विद्यापीठ महसुलातून धनादेश क्रमांक ७३९००२, दिनांक २.९.२०१० द्वारे मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे जमा केला आहे. यानंतर मोजणी फी शुल्कापोटी रु.३,८४,०५०/- धनादेश क्रमांक ७२९३३६, दिनांक २४.१२.२०१० द्वारे तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, परभणी यांचेकडे जमा केले आहेत. तसेच पाणीपुरवठा योजनेसाठी तातडीची गरज म्हणून रु.२,९०,८५७/- मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे धनादेश क्रमांक ४८६२०२, दिनांक २९.१.२०११ द्वारे जमा केले आहेत. मौजे. शेंद्रा येथील नवीन गावठाणत मुलभूत नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी धनादेश क्र.०७०४७५ दिनांक ९.५.२०११ नुसार रु.१,०४,४७,२४३/- मा.जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे जमा केले आहेत. मौजे. शेंद्रा ता.जि.परभणी येथील ग्रामस्थांचे नवीन गावठाणांत पुनर्वसनासाठी विद्यापीठाचे महसुलातून आतापर्यंत रु.१,०४,४७,२४३/- अदा केले आहेत.

या संदर्भात सादर करण्यात येते की, मौजे शेंद्रा येथील गावठाण, विद्यापीठाने संपादीत केलेल्या जमिनीच्या केंद्रस्थानी वसलेली आहेत. तेथील ग्रामस्थांना त्यांच्या संपादीत मालमत्तेचा मोबदला, न्यायालयाच्या वेळोवेळी झालेल्या आदेशानुसार वाढीव मोबदला, नवीन गावठाणात भुखंडाचे वाटप, नवीन गांवठाणत नागरी सुविधा उपलब्ध करण्याकरिता जिल्हा प्रशासनाकडून लक्षणीय खर्च झालेला असून देखील गावकऱ्यांनी अद्यापही जुन्या गांवठाणातील आपली घरे सोडून देवून, तेथून, त्यांच्यासाठी संपादीत केलेल्या नवीन गांवठाणांत स्थलांतर केलेले नाही. परिणामी ग्रामस्थांची पाळीव जनावरे विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे अतोनात नुकसान करीत आहेत. विद्यापीठ प्रक्षेत्रावरील मौल्यवान साधनसामुग्री व यंत्रसामुग्रीच्या चोऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला असता गावकऱ्यांशी कलहाचे प्रसंग वारंवार उद्‌भवत आहेत. जिल्हा प्रशासनाकडे या संबंधात अनेक बैठका झाल्या असून या बैठकीत सहभागी होण्याकरिता ग्रामस्थांना सुध्दा पाचारण करण्यात आले होते. या बैठकामधून ग्रामस्थांना त्यांचेसाठी संपादीत केलेल्या नवीन गांवठाणात स्थलांतर करण्याचे वेळोवेळी आवाहन करण्यात आलेले आहे. तथापि, त्यांनी नवीन गावठाणात अजूनही स्थलांतर केलेले नाही.

कृषि विद्यापीठ अंतर्गत सेवारत असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन आणि कृषि विषयक संशोधन शिक्षण इ.बाबत खर्चाचे प्रमाण, घटक महाविद्यालये, कृषि विद्यापीठ अंतर्गत अनुदानित व विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालये यांची माहिती **प्रपत्र क्र.२** मध्ये नमूद केली आहे.

अ.क्र.	गट	मंजुर पदे	भरलेले पदे	रिक्त पदे	जाहिरातीसाठी दिलेली पदे	निव्वळ रिक्त पदे

१)	अ	२८५	२१६	६९	--	६९
२)	ब	९३	३६	५७	३५	२२
३)	क	५४५	३९३	१५२	७९	७३
४)	ड	१३६३	९८४	३७९	२६७	११२
	एकुण	**२२८६**	**१६२९**	**६५७**	**३८१**	**२७६**

मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (दिनांक ३१.१२.२०१० अखेर)

१) सरळसेवा - गट - अ

अ. क्र.	संवर्ग	मंजुर पदे	भरलेले पदे	रिक्त पदे	जाहिरातीसाठी दिलेली पदे कमी करणे	निव्वळ रिक्त पदे	जाहिरातीस दिलेल्या पदांबाबतची केलेली कार्यवाही
१)	कुलगुरु	०१	०	०१	---	१	---
२)	संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)	१	०	१	---	१	कृषि परिषदेने सदर पद भरण्यासाठी जाहिरात दिली आहे.
३)	संचालक विस्तार शिक्षण	१	०	१	---	१	कृषि परिषदेने सदर पद भरण्यासाठी जाहिरात दिली आहे.
४)	संचालक संशोधन	१	१	०	---	--	---
५)	सहयोगी अधिष्ठाता	५	२	०३	---	३	कृषि परिषदेने ३ पैकी २ पदे भरण्यासाठी जाहिरात दिली आहे.
६)	विभाग प्रमुख	०६	०४	०२	---	२	कृषि परिषदेने सदर पदे भरण्यासाठी जाहिरात दिली आहे.
७)	प्राध्यापक /तत्सम	१८	१२	०६	---	६	---
८)	सहयोगी प्राध्यापक/ तत्सम	८५	६३	२२	---	२२	---
९)	सहायक प्राध्यापक / तत्सम	१५३	१२५	२८	---	२८	---
१०)	कुलसचिव*	०१	०	०१	---	१	---
११)	नियंत्रक*	०१	०१	०	---	---	---
१२)	विद्यापीठ अभियंता*	०१	०१	०	---	---	---
१३)	उपअभियंता*	०१	०	०१	---	१	---
१४)	वैद्यकीय अधिकारी	०१	०१	०	---	---	---
१५)	सुरक्षा अधिकारी	०१	०१	०	---	---	---
१६)	सहायक कुलसचिव /सहायक नियंत्रक / तत्सम	०८	०५	०३	---	३	---
	एकूण	**२८५**	**२१६**	**६९**	**---**	**६९**	**---**

* शासनाकडून प्रतिनियुक्ती.

कार्यासन अेपीबी-१ ची दिनांक ३१.१२.२०१० अखेर मंजूर भरलेली व रिक्त पदे.

सरळसेवा - गट- ब

अ. क्र.	संवर्ग	मंजुर पदे	भरलेले पदे	रिक्त पदे	जाहिरातीसाठी दिलेली पदे कमी करणे	निव्वळ रिक्त पदे	जाहिरातीस दिलेल्या पदांबाबतची केलेली कार्यवाही
१)	वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि)	४३	१४	२९	२२	०७	
२)	वरिष्ठ संशोधन सहायक (कृषितंत्र)	०७	---	०७	०३	०४	
३)	वरिष्ठ संशोधन सहायक (जैवतंत्रज्ञान)	०४	---	०४	०४	---	
४)	वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि अभियांत्रिकी)	०२	---	०२	०१	०१	
५)	पशुवैद्यकीय अधिकारी	०१	---	०१	---	०१	
६)	कक्ष अधिकारी	१२	६	६	५	१	
७)	सहायक कक्ष अधिकारी	१३	९	४	---	४	
८)	लघुलेखक	९	५	४	---	४	
९)	तांत्रीक सहायक	२	२	---	---	---	
		९३	**३६**	**५७**	**३५**	**२२**	

कार्यासन अेपीबी-१ ची दिनांक ३१.१२.२०१० अखेर मंजूर भरलेली व रिक्त पदे.

सरळसेवा - गट -क

अ.क्र.	संवर्ग	मंजुर पदे	भरलेले पदे	रिक्त पदे	जाहिरातीसाठी दिलेली पदे कमी करणे	निव्वळ रिक्त पदे	जाहिरातीस दिलेल्या पदांबाबतची केलेली कार्यवाही
१)	कनिष्ठ पशुवैद्यकीय अधिकरी	१	१	---	---	---	---
२)	कनिष्ठ संशोधन सहायक	३७	१३	२४	१५	०९	शासन निर्णयानुसार १ वर्षासाठी क व ड गटातील नोकर भरती बंद ठेवण्यात आलेली आहे.
३)	कनिष्ठ अभियंता	०३	०३	---	---	---	
४)	कार्यदेशक पर्यवेक्षक	०१	०१	---	---	---	
५)	पर्यवेक्षक गृहविज्ञान	०१	०१	---	---	---	
६)	आरेखक	०२	०२	---	---	---	
७)	वरिष्ट यांत्रिक	०१	०१	---	---	---	
८)	कनिष्ठ यांत्रिक	०१	०१	---	---	---	
९)	ट्रॅक्टर चालक	०२	---	०२	०१	०१	
१०)	वाहन चालक	२२	१३	०९	०६	०३	

११)	ट्रक चालक	०२	---	०२	०२	---	
१२)	कृषि सहायक	२८३	२३०	५३	२८	२५	शासन निर्णयानुसार १ वर्षासाठी क व ड गटातील नोकर भरती बंद ठेवण्यात आलेली आहे.
१३)	विजतंत्री	६	३	---	३	---	
१४)	सुतार	२	२	---	---		
१५)	कलाकार	२	२	२	---		
१६)	उप आवेक्षक	५	३	२	---	२	
१७)	काम्युटर	१	१	---	---		
१८)	मॉन्टेसरी शिक्षक	१	१	---	---		
१९)	प्रयोगशाळा सहायक (गृ.वि.)	५	१	४	---	४	
२०)	दूरध्वनी चालक	२	२	---	---	---	
२१)	नळ कारागीर	३	३	---	---	---	
२२)	मिस्त्री	१	---	१	---	१	
२३)	बाष्पक सहायक	१	---	१	१	---	
२४)	संधाता	१	---	१	---	१	
२५)	कातारी	१	---	१	---	१	
२६)	जोडारी	२	२	---	---	---	
२७)	दृकश्राव्य यंत्र चालक	२	१	१	१	---	
२८)	संगणक चालक	१	१	---	---		
२९)	क्राफटसमन वेल्डर	१	१	---	---		
३०)	क्राफटसमन फिटर	१	---	१	---	१	
३१)	वरिष्ठ लिपीक	२८	१६	१२	७ प्रकल्पग्रस्ताची जाहिरात	५	शासन निर्णय दिनांक ५/६/२०१० अन्वये गट क व ड मधील पदांच्या भरती बाबत निर्बंध असल्यामुळे पद भरण्यात आलेले नाहीत.
३२)	लघुटंकलेखक	५	४	१	१ प्रकल्पग्रस्ताची जाहिरात	---	
३३)	कनिष्ठ लिपीक	११४	८०	३४	१४ प्रकल्पग्रस्ताची जाहिरात	२०	
३४)	ग्रंथालय सहायक	२	२	---	---	---	
३५)	रिप्रोग्राफीक सहायक	१	१	---	---	---	
३६)	मिश्रक	१	१	---	---	---	
		५४५	**३९३**	**१५२**	**७९**	**७३**	

अ.क्र.	पदाचे नाव	मंजुर पदे	भरलेले पदे	रिक्त पदे	जाहिरातीसाठी दिलेली पदांची संख्या	निव्वळ रिक्त पदे
१)	प्रयोगशाळा सेवक	४९	३४	१५	१५	०
२)	मजुर	९३८	६८३	२५५	१८०	७५
३)	पहारेकरी	१४४	१०३	४१	२५	१६
४)	शिपाई	१०३	७१	३२	२४	८
५)	गुराखी	६	५	१	१	०

६)	परिचर	९	६	३	१	२
७)	दोग्धा	४	३	१	१	०
८)	संदेश वाहक	३	२	१	१	०
९)	पुस्तक वाहक	१	०	१	१	०
१०)	मिस्त्री	१	१	०	०	०
११)	ड्रेसर	१	१	०	०	०
१२)	फरास	१	१	०	०	०
१३)	सफाई कामगार	२८	२५	३	३	०
१४)	माळी	१८	६	१२	४	८
१५)	ग्रंथालय परिचर	५	२	३	२	१
१६)	प्रयोगशाळा परिचर	४६	३७	९	७	२
१७)	खानसामा	१	०	१	१	०
१८)	जमादार	१	०	१	१	०
१९)	रुखी/वाल्मीकी	४	४	०	०	०
	एकूण	**१३६३**	**९८४**	**३७९**	**२६७**	**११२**

गोषवारा

पदोन्नती :

अ.क्र.	गट	मंजुर पदे	भरलेलेपदे	रिक्त पदे	जाहिरातीसाठी दिलेली पदे	निव्वळ रिक्त पदे
१)	अ	२५४	१७५	७९	---	७९
२)	ब	८१	६५	१६	---	१६
३)	क	१७३	१२२	५१	---	५१
	एकूण	५०८	३६२	१४६	---	१४६

मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (दिनांक ३१/१२/२०१० रोजीची)

पदोन्नती गट -अ

अ.क्र.	संवर्ग	मंजुर पदे	भरलेले पदे	रिक्त पदे
१)	सयोगी अधिष्ठाता	५	४	०१
२)	विभाग प्रमुख	०४	०३	०१
३)	प्राध्यापक / तत्सम	२३	१८	०५
४)	सहयोगी प्राध्यापक/तत्सम	८४	७३	११
५)	सहायक प्राध्यापक / तत्सम	१२३	६६	५७
६)	विद्यार्थी कल्याण अधिकारी	०१	०	०१
७)	उप-कुलसचिव	०२	०२	०
८)	उपअभियंता	०२	०२	०
९)	मा.कुलगुरु याचें	०१	०	०१

	खाजगी सचिव			
१०)	मा.कुलगुरु याचं स्वीय सहायक	०१	०१	०
११)	सहायक कुलसचिव / सहायक नियंत्रक / तत्सम	०८	०६	०२
		२५४	**१७५**	**७९**

कार्यासन अेपीबी-१ ची दिनांक ३१/१२/२०१० अखेर मंजुर भरलेली व रिक्त पदे. पदोन्नती

अ.क्र.	संवर्ग	मंजुर पदे	भरलेलेपदे	एकूण रिक्त पदे
	गट ब			
१)	वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि)	४३	३८	५
२)	कक्ष अधिकारी	१२	५	७
३)	सहायक कक्ष अधिकारी	१४	११	३
४)	लघुलेखक	१०	९	१
५)	तांत्रीक सहायक	२	२	---
	एकूण	**८१**	**६५**	**१६**
	गट क			
१)	कनिष्ठ संशोधन सहायक	३७	३६	०१
२)	कनिष्ठ अभियंता	०३	०२	०१
३)	वरिष्ठ यांत्रिक	०१	०१	---
४)	ट्रॅक्टर चालक	०३	०१	०२
५)	वाहन चालक	२२	१३	०९
६)	ट्रक चालक	०२	---	०२
७)	वरिष्ठ लिपीक	२८	२०	८
८)	लघुटंकलेखक	६	३	३
९)	कनिष्ठ लिपीक	३८	३२	६
१०)	ग्रंथालय सहायक	२	२	---
	एकूण	**१७३**	**१२२**	**५१**

"अ" संवर्गातील सरळसेवेच्या एकूण २८६ पंदापैकी २११ पदे भरण्यात आलेली असून ७५ पदे रिक्त आहेत. तसेच पदोन्नतीच्या एकूण २५३ पदांपैकी १७६ पदे भरण्यात आलेली असून ७७ पदे रिक्त आहेत.

सरळसेवा: प्राध्यापक व त्यावरील उच्च श्रेणीतील रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्यासाठी कृषि परिषदेस या कार्यालयाचे पत्र दिनांक ५.०१.२०१० नुसार कळविण्यात आले आहेत. त्यानुसार कृषि परिषदेने जाहिरात क्रमांक एमअसी/आस्था-२/अडीव्हीटी/१९/४७१९/२०१०, दिनांक २०.१२.२०१० अन्वये संचालक विस्तार

शिक्षण-०१, अधिष्ठाता कृषि-०१, सहयोगी अधिष्ठाता-०२ व विभाग प्रमुख-२ ही पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात दिली आहे.

तसेच सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

पदोन्नती :-

प्राध्यापक व त्यावरील उच्च श्रेणीतील रिक्त पदोन्नतीने भरणेसाठी पत्र दिनांक ५.१.२०१० नूसार कळविण्यात आले आहे.

तसेच सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या संवर्गात ज्या ज्या ठिकाणी उमेदवार उपलब्ध होत आहेत. ती पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत असलेल्या संशोधन केंद्र/अभाकृअप समन्वर्यात संशोधन प्रकल्पांची सूची, कृषि विद्यापीठ अंतर्गत-२३ आखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषद समन्वय संशोधन प्रकल्पाचे ठिकाण, संशोधनाचे स्वरुप व कार्य पध्दती याबाबतची माहिती **प्रपत्र - ३** मध्ये नमूद केली आहे.

विद्यापीठाच्या २३ संशोधन प्रकल्पात विविध पिके/घटक/बाबीवर संशोधन केले जाते. दर वर्षीच्या संशोधानांचे निष्कर्ष प्रकल्प समन्वयक व त्या पिकासंबंधित असलेल्या शास्त्रज्ञांच्या बैठकीत सादर केले जातात. त्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार पुढील वर्षीच्या संशोधन कार्याचा वार्षिक आराखडा तयार करून त्याप्रमाणे संबंधित दृष्टीकोनातून व शास्त्रज्ञाच्या बैठकीत पारीत झालेल्या तंत्रज्ञानाच्या किंवा नवीन वाणांच्या शिफारसी राज्यस्तरीय संयुक्त संशोधन समितीने मान्यता दिल्यानंतर शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या जातात.

कृषि विद्यापीठाचे लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा विभाग व महालेखापाल यांचे मार्फत करण्यात येते.

१) स्थानिक निधी लेखा विभागाचे लेखा परिक्षण सन २००८-२००९ पर्यंत पूर्ण झालेले आहे व २००९-२०१० चे लेखा परिक्षण चालू आहे.

२) महालेखापाल यांच्याकडून सन १९९९-२००० पर्यंतचे लेखा परिक्षण वर्ष २००४-२००५ मध्ये तपासणी झालेले आहे.

स्थानिक निधी लेखा विभागीयांचे लेखा आक्षेप / परिच्छेद एकूण ८६३५ नोंदवले आहेत, त्यापैकी ३७३७ प्रकरणी पुर्तता करण्यात आली आहे. महालेखापाल यांचे लेखा आक्षेप/परिच्छेद एकूण १४७ नोंदवले आहेत. त्यापैकी ११२ ची पुर्तता सादर करण्यात आली आहे. नोंदविण्यात आलेल्या लेखा अक्षेपाचे स्वरूप खालील प्रमाणे आहे.

१) तुकडे पाडून खरेदी अथवा कामे करणे.

२) नोंद वह्या न ठेवणे अथवा अपूर्ण असणे.

३) खरेदीचे नियम न पाळणे.

४) वैयक्तीक वसूली बाबत.

श्री.एम.व्ही.ढोबळे, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय यांनी जिमखाना फंडामधील मा.कुलगुरुच्या परवानगीशिवाय व राष्ट्रीयकृत बँक नसतानाही यशवंत अर्बन सहकारी बँक परभणी येथे रक्कम रु.३,५०,०००/- गुंतविले. सदरील रु.३,५०,०००/- व त्यावरील १३ टक्के व्याज दराने जानेवारी, २००९ अखेरीस होणारी व्याजासहीत एकूण रक्कम रु.९,६३,२५७/- वसूलपात्र होती, पैकी रु.२,००,०००/- यशवंत अर्बन सहकारी बँकेतून प्राप्त झाले आहेत. रक्कम रु.७,६३,२५७/- वसूल होणे बाकी आहे. सध्या सदरील प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. याबाबत मा.न्यायालयाचे आदेशाने तात्पुरते सेवा निवृत्ती वेतन व उपदन अदा केले असून निवृत्ती वेतन विक्रीची रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे.

मागील पाच वर्षात घेतलेले विस्तार कार्यक्रम

अ.क्र.	विस्तार कार्यक्रम	२०००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११
१)	पिक प्रात्यक्षिके	२४५	२१२	२१६	२७०	२२३
२)	जिल्हा मासिक चर्चासत्र	८४	९४	९५	९६	९६
३)	निदान चमू भेटी	७२	११२	१२६	१२७	५७
४)	शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी	४२५	२५८	२७५	३५०	४६४
५)	विस्तार कार्यकर्ते/शेतकरी प्रशिक्षण वर्ग	२८९	२४९	२२६	२०४	१८२
६)	शेतकरी मेळावे आयोजन/ सहभाग	१०४	१३२	१०७	११०	१२२
७)	गटचर्चा	२९०	१४१	१४५	२८०	२१९
८)	मासिक संदेश	८४	९४	९५	९६	९६
९)	कृषि माहिती वाहिनी कार्यक्रम	१०८	१३२	१३७	१३८	१४४
१०)	जिल्हा मासिक चर्चा सत्रातंर्गत प्रक्षेत्र भेटी	८४	९४	९५	९६	९६
११)	शेतकऱ्यांचे अभ्यास दौरे	१५०	१००	७८	१००	१५५
१२)	दूरदर्शन कार्यक्रम	३२	५२	५५	५६	५२
१३)	आकाशवाणी कार्यक्रम	१६८	४५	१५०	१६२	१२८
१४)	कृषि प्रदर्शन	१५	१४	१७	२२	
१५)	कृषि तंत्रज्ञान प्रसार सप्ताह	०१	---	---	---	०१
१६)	प्रकाशने					
१७)	कृषि दैंनदिनी	१५०००	१५०००	१५०००	१५०००	१२०००
१८)	माहिती पुस्तीका	३७५००	३९०००	३८०००	४००००	२३०००
१९)	घडीपत्रिका	१३०००	१४०००	२००००	२४०००	१४०००

२०)	शेतीभाती	२६३००	२८२५०	२६०००	२२५००	१६०००
२१)	दिनदर्शिका	८०००	४०००	४०००	४०००	४०००

कृषि विद्यापीठातर्फे राबविण्यात येणाऱ्या कृषि संशोधन योजनांना मंजुर झोलेला निधी संशोधन कार्यासाठी फारच अपुरा पडतो. विविध कृषि संशोधन केंद्रातील प्रयोगशाळांच्या इमारती फारच जुन्या झालेल्या आहेत त्यांची दुरुस्ती व प्रयोगशाळेतील आधुनिक यंत्र सामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी वाढीव निधीची आवश्यकता आहे. कृषि विद्यापीठातर्फे राबविण्यात येणाऱ्या कृषि संशोधनाच्या योजनांना मंजुर झालेला निधी प्राप्त होण्यास बऱ्याच वेळा विलंब होतो.

अखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने मंजुर केलेल्या संशोधन प्रकल्पासाठी खर्च होणाऱ्या निधीतील २५ टक्के वाटा राज्य शासनाचा असतो. तो निधी प्राप्त होण्यास बऱ्याच वेळा विलंब होतो. त्यामुळे संशोधन कार्याची प्रभावी पणे अमलबजावणी करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. म्हणून तो निधी वेळोवेळी उपलब्ध

झाल्यास संशोधन कार्य कार्यक्षमपणे करता येऊ शकेल.

दिनांक १३ ऑक्टोंबर, २०११ रोजी समितीने परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठा अंतर्गत असलेल्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, पीक प्रात्याक्षिक प्रक्षेत्र, राजमाता जिजाऊ मुलींचे वसतिगृह, गृहविज्ञान महाविद्यालय, अन्नतंत्र महाविद्यालय, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय अशा विविध ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली.

समितीने कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राला भेट दिली असता कृषि विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला पुढील प्रमाणे माहिती दिली. मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. १.१.२००० रोजी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्रामुळे विद्यापीठात विकसित झालेले तंत्रज्ञान, बी-बियाणे, रोपे व कलमांची विक्री, कृषि औजारे विक्री प्रशिक्षण, माती तपासणी, पिकांवरील कीड व रोग निदान व सल्ला सेवा इत्यादी सुविधा एकाच ठिकाणी शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत. कृषि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कृषि माहिती वाहिनी व किसान कॉल सेंटर सुरु केलेले आहेत. या वाहिनीद्वारे दर शुक्रवारी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळात कृषि विषयातील तज्ञ ०२४५२-२२९००० या दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध असतात. या वेळात शेतकऱ्यांनी विचारलेल्या कृषि विषयक प्रश्नांची उत्तरे दूरध्वनीवरुन दिली जातात. केंद्र शासनाने दिनांक २१ जानेवारी, २००४ पासून किसान कॉल सेंटर या उपक्रमातंर्गत शेतकऱ्यांसाठी मोफत कॉल सेवा देशपातळीवरुन सुरु केलेली आहे. या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना किसान कॉल सेंटरवरुन माहिती दिली जाते. शेतकऱ्यांना विनामूल्य सेवा १५५१ दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध

आहे. ज्या प्रश्नांना प्रथम स्तरावर उत्तरे देता येणार नाहीत, त्यासाठी दुसऱ्या स्तरावर कृषि विद्यापीठातील विषय तज्ज्ञांकडून माहिती दिली जाते.

यानंतर समितीने सीएएच-२५ वाणाच्या ज्वारी पिकाची पाहणी केली असता, संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला पुढील प्रमाणे माहिती दिली. सदर पीक तयार होण्यास ११५ ते १२० दिवसांचा कालावधी लागतो. सदर वाणाच्या ज्वारीचे उत्पन्न ४० ते ४२ हेक्टरमध्ये घेतलेले आहे. सीएएच-२५ वाणाच्या ज्वारीचे प्रमुख वैशिष्ट असे आहे की, ते दुहेरी उपयुक्त संकरीत वाण असून, बुरशी रोगास अतिशय प्रतिकारक्षम असे आहे. कडब्याचे उत्पादन ११० ते ११५ क्विंटल प्रति हेक्टरी होते. सदर ज्वारी व कडब्याची प्रत अतिशय चांगली आहे. समितीने सोयाबीन पिकाची पाहणी केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशी माहिती दिली की, येथे सोयाबीनचे ८ वाण विकसित केलेले आहेत. एमएयुएस-४७ वाण असलेल्या सोयाबीन वाणाचे प्रति हेक्टरी २० ते २५ क्विंटल उत्पन्न होते. त्यासाठी साधारणपणे ८० ते ८५ दिवसांचा कालावधी लागतो. सोयाबीनवर रोगापेक्षा उंटाळी स्टोडो नावाची किड जास्त प्रमाणात असल्यामुळे त्यावर औषधांची फवारणी केली जाते. समितीने तूर पिकाची पाहणी केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशी माहिती दिली की, येथे तुरीचे ५ वाण विकसित केलेले आहेत. बदनापूर-२ वाण असलेल्या तुरीचे प्रति हेक्टरी १० ते ११ क्विंटल उत्पन्न होते. त्यासाठी साधारणपणे १६० ते १६५ दिवसांचा कालावधी लागतो.

त्यानंतर समितीने राजमाता जिजाऊ मुलींच्या वसतिगृहाची पाहणी केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशी माहिती दिली की, येथे वसतिगृहातील विद्यार्थीनी स्वतः मेस चालवितात. प्रत्येक विद्यार्थीनीला दरमहा ५०० रुपयांमध्ये दोन्ही वेळचे जेवण दिले जाते. तेथे समितीला चांगल्या प्रकारे स्वच्छता असल्याचे आढळून आले. एका रुममध्ये तीन विद्यार्थीनी अशा एकूण ९० विद्यार्थीनी राहतात.

त्यानंतर समितीने अन्नतंत्र महाविद्यालयाची पाहणी केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशी माहिती दिली की, नोनी नावाचे फळ अतिशय उपयुक्त असून, त्या फळापासून तयार केलेल्या ज्युसच्या सेवनाने जवळपास २०० आजार बरे होण्यास मदत होते. तसेच शरीरातील रोग प्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते. नोनी फळाचे ज्युस या ठिकाणी तयार केले जाते व त्याची स्टॉलच्या माध्यमातून विक्री केली जाते.

त्यानंतर समितीने गृहविज्ञान महाविद्यालयाची पाहणी केली असता त्या परिसरात लहान मुलांसाठी असलेला झोका व घसरगुंडी तसेच खेळ साहित्याची अवस्था चांगली नव्हती. त्यासंबंधी तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यासाठी समितीने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केली. त्यानंतर समितीने कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाची पाहणी केली असता तेथील काही विद्यार्थींनी अशी मागणी केली की, त्या ठिकाणी प्लेसमेंट उपलब्ध नाही. परिणामी नोकरी मिळण्यास विलंब लागतो. या ठिकाणी इतर महाविद्यालयाप्रमाणे प्लसमेंट रोजगार व स्वंयरोजगार केंद्र असावे. त्याच परिसरात असलेल्या मदर कॉटेजची समितीने पाहणी केली

असता, तेथे समितीला अस्वच्छता असल्याचे आढळून आले. तेथे नाश्तासाठी तयार केलेले खाद्यपदार्थ उघड्यावरच ठेवलेली होती.

त्यानंतर समितीने अपारंपारिक ऊर्जा उद्यानातील सौर पंपाची पाहणी केली असता, संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला अशी माहिती दिली की, सौर पंपाद्वारे प्रति दिन ३०,००० लिटरपर्यंत पाणी उपसता येते. सदर पंपासाठी साधारणपणे २.८३ लक्ष रुपयांचा खर्च येतो. या पंपाची एकूण ५ मीटर उंचीवर पाणी उपसण्याची क्षमता आहे. स्वच्छ सूर्यप्रकाशाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत अंदाजे ३०,००० लिटर पाणी उपसले जाऊ शकते. अपारंपारिक ऊर्जेमुळे निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होते, पर्यावरणाचा ऱ्हास होत नाही, वातावरण स्वच्छ व प्रदूषण विरहित राहण्यास मदत होते. त्यानंतर समितीने तेथे असलेल्या बैलशक्तीवर चालणाऱ्या फवारणी यंत्राची समितीने पाहणी केली. त्याच्या एकाच चाकाला पुली लावलेली होती, त्यामुळे एका चाकावर जास्त भार येत असल्याचे समितीने मत व्यक्त केले. त्यासाठी साधारणपणे ४५,००० रुपयांचा खर्च येत असल्याची संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला माहिती दिली. त्याद्वारे सोयाबीन, उडीद पिकांमध्ये फवारणी करता येऊ शकते. यानंतर समितीने फुड प्रोसेसिंग युनिटला भेट दिली. मात्र तेथील युनिट सुरु नव्हते. तेथे टोमॅटो केचप तयार केला जात असल्याची समितीला माहिती देण्यात आली. यानंतर समितीने मराठवाडा कृषि विद्यापीठामार्फत संशोधित शेतीची उपयुक्त अवजारे व यंत्रांची पाहणी केली. त्यात पुढील अवजारे व यंत्रांचा समावेश होता. धसकटे गोळा करण्यासाठी असलेले यंत्र, भुईमूग शेंगा तोडणी चौकट (स्ट्रिपींग फ्रेम), शेंगा फोडणी यंत्र, बहुउद्देशीय औजार वाहक, भुईमूग टोकण यंत्र, भुईमूग काढणी यंत्र, बांबू हात कोळपे, खत कोळपे, विळा-खुरपी, बी व खत पेरणी यंत्र, टोकण यंत्र, मका सोलणी यंत्र, ट्रॅक्टर अशा प्रकारे विविध अवजारे व यंत्राची पाहणी केली.

त्यानंतर समितीने दिलेल्या भेटीच्या संदर्भात आढळून आलेल्या त्रुटी तसेच कृषि विभागाकडून मराठवाडा कृषि विद्यापीठासंदर्भात प्राप्त झालेल्या लेखी स्वरुपातील माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली सदरहू बैठकीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी विद्यापीठास सादरीकरणाद्वारे विद्यापीठाविषयी माहिती दिली.

मराठवाडा कृषि विद्यापीठातंर्गत औरंगाबाद, जालना, हिंगोली, परभणी, बीड, अंबाजोगाई, नांदेड, लातूर व उस्मानाबाद येथे एकूण ११ घटक महाविद्यालये व २९ संलग्न महाविद्यालये आहेत.

१९५६ साली कृषि महाविद्यालय, परभणी येथे पदवी अभ्यासक्रमास सुरुवात झाली. १९७० साली परभणी येथे ९ विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमास सुरुवात झाली. १९७२ साली मराठवाडा कृषि विद्यापीठाची स्थापना झाली. परभणी येथे १९७६ मध्ये गृहविज्ञान व अन्नतंत्र महाविद्यालय, १९८४ मध्ये उद्यानविद्या महाविद्यालय, १९८७ मध्ये कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु झाले. त्याचप्रमाणे १९८७ मध्ये लातूर येथे व

सन २००० मध्ये उस्मानाबाद, अंबाजोगाई व बदनापूर येथे कृषि महाविद्यालये सुरु झाली. सन २००६ मध्ये लातूर येथे कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय सुरु झाले. सन २००८ मध्ये कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था सुरु झाली, सन २००२ ते २०१० पर्यंत कृषि व संलग्न २९ खाजगी महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली.

कृषि विद्यापीठाचे मुख्ये उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत. कृषि व तत्सम विषयाची निगडीत शिक्षण, संशोधन व विस्तार कार्य करणे, कृषि व संलग्न विषयात तांत्रिक मनुष्यबळ विकसित करणे, कृषि व तत्सम विषयातील गरजेनुसार मूलभूत व उपयोजित शिक्षण देणे, स्वयंरोजगार निर्मिती व उद्योजकता वाढीस चालना देणे, कृषि व तत्सम क्षेत्रातील संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे. कृषि विद्यापीठातंर्गत कृषि, अन्न तंत्रज्ञान, गृह विज्ञान, कृषि अभियांत्रिकी, उद्यान विद्या, कृषि व जैव तंत्रज्ञान तसेच कृषि पणन व व्यवसाय व्यवस्थापन अशाप्रकारे ७ विद्या शाखा, ११ घटक महाविद्यालये, २९ संलग्न खाजगी महाविद्यालये आहेत. या विद्यापीठातंर्गत घटक महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमासाठी ७३२ विद्यार्थ्यांची व संलग्न महाविद्यालयात २०२० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता पुढील प्रमाणे आहे. पदव्युत्तर - ३३८ व आचार्य - २९ इतकी आहे. २२ घटक महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण अभ्यासक्रम कार्यान्वित आहे. या विद्यापीठातंर्गत कृषि महाविद्यालयांमध्ये ५ घटक व १५ खाजगी अशी एकूण २० महाविद्यालये आहेत. घटक महाविद्यालयामध्ये एक उद्यान विद्या महाविद्यालय आणि गृह विज्ञान महाविद्यालय आहे. अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये १ घटक व ७ खाजगी अशी एकूण ८ महाविद्यालये आहेत. कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये १ घटक व १ खाजगी अशी एकूण २ महाविद्यालये आहेत. कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये १ घटक व ५ खाजगी अशी एकूण ६ महाविद्यालये आहेत. कृषि विपणन व व्यवस्थापन महाविद्यालयांमध्ये १ घटक व १ खाजगी अशी एकूण २ महाविद्यालये आहेत. अशा प्रकारे एकूण ११ घटक व २९ खाजगी महाविद्यालये आहेत. विद्याशाखेत एम.एस्सीमध्ये (कृषि) २११ ची प्रवेश क्षमता आहे. विद्याशाखेत एम.एस्सीमध्ये (उद्यानविद्या) ३१ ची प्रवेश क्षमता आहे. विद्याशाखेत एम.टेकमध्ये (अन्न तंत्रज्ञान) १५ ची प्रवेश क्षमता आहे. विद्याशाखेत एम.एस्सीमध्ये (कृषि जैवतंत्रज्ञान) १८ ची प्रवेश क्षमता आहे. विद्याशाखेत एम.टेकमध्ये (कृषि अभियांत्रिकी) १६ ची प्रवेश क्षमता आहे. विद्याशाखेत एम.एस्सीमध्ये (गृह विज्ञान) १२ ची प्रवेश क्षमता आहे. विद्याशाखेत एम.बी.एम.मध्ये (कृषि) ३५१ ची प्रवेश क्षमता आहे.

विद्यापीठात संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि) चे एक पद आहे. सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्याची १० पदे आहेत. विभाग प्रमुखांची १० पदे आहेत. सहयोगी प्राध्यापकाची ११३ पदे आहेत. सहाय्यक प्राध्यापकाची १७५ पदे आहे. सन २००५ ते २००९ मध्ये पदवी परिक्षेत एकूण ४३९१ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले

आहेत. पदव्युतरमध्ये ८६७ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. आचार्यमध्ये एकूण ८६ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. कृषि पदविकास / माळीमध्ये एकूण १३४७५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. औरंगाबादमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) २ असून, प्रवेश क्षमता १२० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ९ असून प्रवेश क्षमता ५४० इतकी आहे. जालनामध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ६ असून प्रवेश क्षमता ३६० इतकी आहे. परभणीमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ५ असून प्रवेश क्षमता ३०० इतकी आहे. हिंगोलीमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ५ असून प्रवेश क्षमता ३०० इतकी आहे. बीडमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ६ असून प्रवेश क्षमता ३६० इतकी आहे. नांदेडमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ८ असून प्रवेश क्षमता ४८० इतकी आहे. उस्मानाबादमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ७ असून प्रवेश क्षमता ४२० इतकी आहे. लातूरमध्ये घटक विद्यालयांची संख्या (अनुदानीत विना अनुदानीत) १ असून, प्रवेक्ष क्षमता ६० इतकी आहे. यामध्ये विना अनुदानीत विद्यालयांची संख्या ७ असून प्रवेश क्षमता ४२० इतकी आहे.

भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत विद्यापीठाचे मूल्यांकन झालेले आहे. मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांना भारतीय कृषि अनुसंधान परिषद मेरीट शिष्यवृत्ती, भारत सरकारची मेरीट शिष्यवृत्ती, राज्य सरकारची ओपन मेरीट शिष्यवृत्ती, विद्यापीठ मेरीट शिष्यवृत्ती, राष्ट्रीय ओपन मेरीट शिष्यवृत्ती, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, स्वातंत्र सैनिक शिष्यवृत्ती, ॲस्पी कृषी संशोधन विकास स्थापन फेलोशिप, भारत सरकारची मेरीट कम मिन्स शिष्यवृत्ती (एस.सी.,एस.टी.) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर मेरीट शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यापीठ परिसरात मध्यवर्ती ग्रंथालयाची सुसज्ज इमारत असून त्यामध्ये एकूण ६६८८२ पुस्तके आहेत. एकूण २५१८६ नियतकालिके आहेत. एकूण ५८६१ प्रबंध आहेत. सदर ग्रंथालयात एकूण २१५४ विद्यार्थी सदस्य आहेत. प्राध्यापक व अन्य कर्मचाऱ्यांची संख्या ३०० असून तात्पुरत्या स्वरुपाच्या सदस्यत्वाची संख्या १८९ इतकी आहे. ग्रंथालयात अद्ययावत संगणक केंद्र कार्यान्वित आहे. सीसीटीव्ही कॅमेरा आहे. संगणीकृत ग्रंथालय सेवा आहे.

वाचन साहित्याची संगणकीकृत सूची आहे. ग्रंथालय सभासदांसाठी इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. डाटाबेसस ऑफलाईन व ऑनलाईनची सुविधा आहे.

विद्यापीठाने सिताफळ गर निर्मिती अन्नतंत्र महाविद्यालय, सिताफळ प्रक्रिया विकर निर्मिती अन्नतंत्र महाविद्यालय, पनीर निर्जलीकरण तंत्रज्ञान पशु संवर्धन विभाग, कृषि महाविद्यालयात स्वामित्वहक्क (पेटेंटस्) मिळविलेले आहे. नांदेडमध्ये कृषि विद्यापीठांची जागा असून त्या ठिकाणी असलेल्या कापूस संशोधन केंद्राच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. समितीने कृषि विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्या उपरोक्त बाब निदर्शनास आणली असता सदरहू जागेवर एका सरदाराने अतिक्रमण केले असून तो त्याबाबत न्यायालयात गेला असता त्यासंदर्भात विद्यापीठाच्या बाजूने निकाल लागलेला आहे. त्यानुसार अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येईल, असे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

मात्र सदर उत्तराने समितीचे समाधान न झाल्याने समितीने आणखी विचारणा केली की, विद्यापीठाकडे इतक्या मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ असताना तेथे अनधिकृत बांधकाम कसे झाले व किती क्षेत्रात त्या व्यक्तीने अतिक्रमण केलेले आहे. तसेच या प्रकरणी कोर्टात केव्हापासून केस सुरु आहे? कोर्टात केस सुरु असताना दुसऱ्या ठिकाणी बांधकाम सुरु असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे काय? त्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, नांदेड येथील कापूस संशोधन केंद्राच्या जागेवर एका निवृत्त सैनिकाने अतिक्रमण केले असून सदरहू व्यक्ती न्यायालयात गेला असता सदरहू प्रकरणी कृषि विद्यापीठाच्या बाजूने निकाल लागला आहे व त्यानुसार अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली जाईल. उपरोक्त प्रकरणी न्यायालयात १० ते १५ वर्षापासून खटला सुरु असून अन्य ठिकाणी बांधकाम सुरु असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. सदरहू ठिकाणी त्या व्यक्तीने २८ गुठ्यांवर अतिक्रमण केले आहे. या संदर्भात समितीने विभागीय प्रतिनिधीच्या निदर्शनास आणून देताना सदरहू ठिकाणी संरक्षक भिंत नसल्यामुळे अतिक्रमण होत आहे, तरी सदरहू ठिकाणी संरक्षक भिंत तातडीने बांधण्यात यावी असे सूचित केले असता त्याबाबत शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यावर संरक्षक भिंतीचे काम पूर्ण करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वासन देण्यात आले.

विद्यापीठाला महसूली उत्पन्न कशापासून मिळत आहे तसेच सन २००७-२००८ मध्ये विद्यापीठाचा किती खर्च होता अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, सन २००७-२००८ मध्ये ८.६२ कोटी रुपयांचे महसूल उत्पन्न मिळाले सदर उत्पन्न शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त मिळालेले आहे. सन २००७-२००८ मध्ये विद्यापीठाचा एकूण खर्च ८.७१ कोटी रुपये इतका होता. त्यासंदर्भात समितीने निदर्शनस आणून दिले की, मराठवाडा कृषि विद्यापीठास योजनातंर्गत प्लॅनमध्ये सन २००६-०७ मध्ये रु.१४,६७,९५,०००/- रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. मात्र खर्च रु.१९,३१,९७,०००/- इतका करण्यात

आलेला आहे. सन २००७-०८ मध्ये रु.१०,४०,००,०००/- रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. मात्र खर्च रु.१५,९४,७८,०००/- इतका करण्यात आला. सन २००९-१० मध्ये रु.१६,४०,००,०००/- रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. मात्र खर्च रु.२०,५६,०४,०००/- इतका करण्यात आला. अशा प्रकारे अनुदानापेक्षा जास्त खर्च कसा दर्शविलेला आहे ? जास्त खर्च केलेल्या रकमेचा अनुशेष कशा प्रकारे भरुन काढला ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला योजनातंर्गत प्लॅनमध्ये सन २००६-०७ मध्ये रु.१४,६७,९५,०००/- रुपयांचे अनुदान प्राप्त झाले व रु.१९,३१,९७,०००/- इतका खर्च करण्यात आला गेल्या वर्षातील शिल्लक असलेली साडे सात ते आठ कोटी रुपये खर्च केलेला आहे. विद्यापीठ महसूल अनुदानातून जास्तीचा खर्च केलेला असून त्यासाठी बोर्डाची मान्यता घेतली होती. कमी किंवा जास्त प्रमाणात खर्च करण्यासाठी माननीय कुलगुरुंना पूर्ण अधिकार प्रदान केलेले आहेत तसेच ही बाब विद्यापीठाच्या सारसंग्रहामध्ये नमूद केलेली आहे. त्यावर कमी किंवा जास्त खर्च करण्यासाठी बोर्डाला अधिकार आहेत का? सन २००६-०७ ते सन २०१०-११ पर्यंत विद्यापीठाने अनुदानापेक्षा जास्त खर्च केलेला असल्याने त्याबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता विभागीय अधिकाऱ्यांनी विदित केले की, पूर्वी मशिनरी किंवा स्टेशनरी असो, इत्यादी बाबींची ४०,००० ते ५०,००० रुपयांची तुकडे पाडून खरेदी केली जात असे. परंतु लेखापरिक्षण करीत असताना, संबंधितांनी एकूण वर्षातील खरेदीचा विचार करुन, निविदा पध्दतीने खरेदी न केल्यासंबंधी आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यानंतर आता निविदा पध्दतीने एकत्रितपणे खरेदीची कार्यवाही केली जात आहे. कृषि विद्यापीठाच्या आवारात समितीला अर्धवट स्थितीत असलेले बांधकाम आढळून आले ते बांधकाम कशातून केले जात आहे? विद्यापीठाची कामे मंजूर झाल्यानंतर चार ते पाच कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे. विद्यापीठास स्वतःचा निधी आहे काय ? विद्यापीठांतर्गत कोठे बांधकाम सुरु आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, सदर बांधकाम म्युझियमचे आहे. आय.सी.आर. मधून गेल्या ३ महिन्यांपासून सदर बांधकाम सुरु असून त्यासाठी आतापर्यंत ८५ लक्ष रुपये खर्च झाला आहे. तसेच अन्य मंजूर झालेली कामे सुरु आहेत. कृषि जैवतंत्रज्ञान आणि कृषि व्यवसाय व्यवस्थापनाच्या संदर्भातील इमारतीचे कृषि मंत्री महोदयांनी लातुर येथे उद्घाटन केलेले आहे. विद्यापीठाला राज्य शासनाकडून अनुदान मिळालेले आहे काय? विद्यापीठाने मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च केलेला आहे ही बाब समितीच्या निदर्शनास आली आहे त्याबाबत विभागीलय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेस ३० हजार २२२ रुपयांचे अनुदान मिळालेले आहे.

कृषि विद्यापीठाची जागा इतरांना दिलेली आहे किंवा कसे? तसेच विद्यापीठाच्या जागे भोवताली संरक्षक भिंत (कंपाऊड) बांधण्यात आले आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विद्यापीठाकडून परभणी येथील जागा जवाहर विद्यालयासाठी देण्यात आली आहे.

तसेच विद्यापीठाच्या जागे भोवती संरक्षक भिंत पूर्णपणे बांधण्यात आलेली नसून तिचे काम प्रगतीपथावर आहे. संरक्षक भिंतीचे जवळपास ३७ कि.मी. पर्यंतचे काम बाकी आहे.

कृषि विद्यापीठाचे लेखा परिक्षण करण्यात येत काय? असल्यास कोणामार्फत? तसेच लेखा परिक्षण कोणत्या वर्षापर्यंत वा कालावधीत पूर्ण झालेले आहे? विद्यापीठामध्ये भ्रष्टाचाराची प्रकरणे घडलेली आहेत काय? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, कृषि विद्यापीठाचे अंतर्गत लेखा परिक्षण सीए मार्फत केले जाते तसेच दरवर्षी महालेखापाल यांच्या कार्यालयामार्फत लेखापरिक्षण केले जाते. श्री.एम.व्ही.ढोबळे, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि महाविद्यालय यांनी जिमखाना फंडामधील कुलगुरुंच्या परवानगीशिवाय व राष्ट्रीयकृत बँक नसतानाही यशवंत अर्बन सहकारी बॅक, परभणी येथे रक्कम रुपये ३,५०,०००/- गुंतविले. सदरहू रक्कम ३,५०,०००/- व त्यावरील १३ टक्के व्याज दराने जानेवारी, २००९ अखेरीस होणारी व्याजासहीत एकूण रक्कम रुपये ९,६३,२५७/- वसूलपात्र होती, या पैकी रुपये दोन लाख रुपये यशवंत अर्बन सहकारी बँकेकडून प्राप्त झालेली असून रुपये ७,६३,२५७/- इतकी रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदरील प्रकरण सद्य:स्थितीमध्ये न्यायप्रविष्ट आहे.

विद्यापीठातून शिक्षण प्राप्त केल्यानंतर विद्यार्थ्यांना चांगल्या नोकऱ्या मिळतात काय ? चांगल्या नोकऱ्या मिळण्याकरिता विद्यार्थ्यांना कोणते अतिरिक्त प्रशिक्षण विद्यापीठात दिले जाते ? अशी समितीने माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, मराठवाड्यात परभणी येथे १८ मे, १९७२ रोजी अलग कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. मराठवाड्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात औरंगाबाद, परभणी, लातूर, नांदेड, बीड, जालना, उस्मानाबाद व हिंगोली या आठ जिल्ह्यांचा समावेश होता. कृषि आणि अनुषंगिक क्षेत्रातील शाखांचे शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण ही विद्यापीठांची तीन प्रमुख कार्य आहेत. कृषि विद्यापीठाच्या विविध शाखामध्ये समन्वय साधून कृषि आणि अनुषंगिक क्षेत्रात शिक्षण देणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे पदविका / पदवी प्रमाणपत्र प्रदान केले जातात. फुड इंडस्ट्रीमध्ये जनरल मॅनेजर, क्वॉलिटी कंट्रोल म्हणून परभणी विद्यापीठातील एका विद्यार्थ्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत.

समितीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण विद्यापीठ, दापोली येथे ज्यावेळी भेट दिली होती, त्यावेळी त्यांची फुड प्रोसेसिंगची सिस्टिम पाहिलेली होती आणि ती अतिशय चांगली होती. त्यांनी तयार केलेले पदार्थ, वस्तू (प्रोडक्ट) बाजारात विकले जात असल्यामुळे त्यांच्या महसूलात बरीच वाढ होत आहे. अशा प्रकारचा उपक्रम मराठवाडा विद्यापीठात राबविला जात असल्याचे समितीला आढळून आले नाही. मराठवाडा कृषि विद्यापीठाने जास्तीत जास्त कृषि उत्पादनाची निर्मिती करुन, त्यातून महसूल वाढविण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. विद्यापीठाकडे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ सुध्दा उपलब्ध आहे. कोकण कृषि विद्यापीठामध्ये विविध

भाजीपाला विकण्यासाठी स्टॉल ठेवला जातो. परंतु समितीला अशा प्रकारचे युनिट मराठवाडा कृषि विद्यापीठामध्ये आढळून आले नाही असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कृषि विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या प्रॉडक्टसची निर्मिती करुन त्यांची विक्री करण्यासाठी स्टॉल निर्माण केलेले आहेत. या विद्यापीठात टॉमेटो केचअप तसेच कॅण्डीचे उत्पादन करुन त्याची विक्री केली जाते.

दापोली येथील विद्यापीठाच्या भेटीच्या वेळी तेथे विळा, जोखड, नांगर, धस्कटे काढणी अवजार, बंड फार्मर, कोसूल चिखलणी अवजार, पंकज चिखलणी अवजार, ड्रम सिडर, भात लावणी चौकट, भात लावणी यंत्र, खत लावणी यंत्र, तीन फणी पेरणी यंत्र, एक फणी पेरणी यंत्र, लाकडी नांगर, कोळपणी अवजार, जपानी कोळपे, स्वस्तिक अवजार अशा प्रकारची विविध अवजारे तयार केली जात असून, त्यांचे प्रॉडक्टसची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जाते. त्यातून त्यांना कोट्यवधी रुपयांचा महसूल प्राप्त होत आहे. त्याचप्रमाणे या विद्यापीठात शेतकऱ्यांना उपयोगी पडणारी अवजारे विकसित केली जातात काय व ती शेतकऱ्यांना मुबलक किंमतीमध्ये दिली जातात काय? शेतकरी त्या अवजारांचा शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग करतात का? मराठवाडा कृषि विद्यापीठात अवजारे तयार करण्याचे वर्कशॉप सुरु असल्याचे आढळून आले नाही असेही समितीने विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणले असता त्यांनी त्याबाबत सांगितले की, या विद्यापीठात संशोधन केंद्र आहेत. परंतु ते अपुरे आहे. खाजगी सीड कंपन्या व कृषि विद्यापीठामध्ये खूप फरक आहे. त्यांच्याकडून अनेक प्रकारचे सीडस् बाजारात विक्रीसाठी पाठविली जातात. मराठवाडा कृषि विद्यापीठातंर्गत बी-बियाणे तयार करण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविले जातात. त्यावर समितीने सूचित केले की, कृषि विद्यापीठातून तयार केलेले बी-बियाणे महाराष्ट्रात पाठविल्यानंतर एका दिवसात संपून जाते. सध्या शेतकऱ्यांची खाजगी बी-बियाणांच्या कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. खाजगी कंपन्यांच्या बी-बियाणांसाठी जास्त रक्कम देऊन सुध्दा शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. परिणामी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. कृषि विद्यापीठाचे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बी-बियाणांची निर्मिती करणे आवश्यक आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठाचे एकूण क्षेत्र व उत्पन्न किती आहे? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, मराठवाडा कृषि विद्यापीठाची एकूण १७०० हेक्टर जागा आहे. तसेच ५ कोटी रुपयांपर्यंत एकूण वार्षिक उत्पन्न आहे. त्यावर समितीने निदर्शनास आणले की, कृषि विद्यापीठाच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार केल्यास त्या तुलनेने मिळणारे उत्पन्न फार कमी आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठाला केंद्र व राज्य सरकारकडून किती अनुदान मिळाते, अशी समितीने माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींना प्रतिपादन केले की, सन २००६-०७ मध्ये केंद्र शासनाकडून रु.१६,२५,९८,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले व रु.१९,८२,७२,०००/- इतका खर्च झाला. राज्य शासनाकडून

रु.६७,४७,९५,००० इतके अनुदान प्राप्त झाले होते व रु.७२,०४,४३,०००/- इतक्या रकमेचा खर्च झाला. त्यात सन २००५-०६ मधील शिल्लक रक्कम रु.८,७५,९८,०००/- इतकी रक्कम सन २००५-०६ मध्ये खर्च केल्यामुळे जास्त खर्च झाल्याचे दिसून येते. मात्र विकास कामाचा निधी दोन वर्षे खर्च करण्यास महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाची मंजुरी आहे. सन २०१०-११ मध्ये केंद्र शासनाकडून रु.४१,७४,६४,०००/- प्राप्त झाले व रु.४१,७५,६४,०००/- इतका खर्च झाला. जास्तीचा खर्च महसूलातून केला आहे. तसेच राज्य शासनाकडून रु.१,३९,१४,३४,००० प्राप्त झाले होते व रु.१,३४,१७,२६,०००/- इतक्या रकमेचा खर्च झाला. "ब-१" निविदा करारामुळे कामाचे पेमेंट विहित पध्दतीने करावे लागत असल्यामुळे जास्त झालेला खर्च महसूलातून केलेला आहे.

पूर्वी मशिनरी किंवा स्टेशनरी असो, इत्यादी बाबींची ४०,००० ते ५०,००० रुपयांची तुकडे पाडून खरेदी केली जात असे. परंतु लेखा परिक्षणामध्ये एकूण वर्षातील खरेदीचा विचार करुन, निविदा पध्दतीने खरेदी न केल्याचे आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यानंतर आता निविदा पध्दतीने एकत्रितपणे खरेदीची कार्यवाही केली जात आहे.

सन २००८-०९, २००९-१०, तसेच सन २०१०-११ या तिन्ही वर्षांचे लेखा परीक्षण समितीला सादर करावे. त्यात वर्षनिहाय केंद्र व राज्य शासनाकडून किती निधी प्राप्त झाला, त्यापैकी खर्च किती झाला ? खर्च कमी किंवा जास्त झाला असल्यास त्याची कारणे द्यावी असे समितीने सूचित केल्यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, विद्यापीठाकडे जशीजशी ग्रँट उपलब्ध होते त्यानुसार खर्च केला जातो. त्यामुळे तुकडे पाडून खरेदी केली जात होती. परंतु या संदर्भात लेखापरिक्षणमध्ये आक्षेप घेण्यात आले. त्यामुळे आता एकत्रितपणे खरेदी केली जात आहे. सन २००९-२०१० चे लेखापरीक्षण चालू आहे. विद्यापीठाचा १२५ कोटी ९५ लाख रुपयांचा फंड आहे. तसेच खर्च १२८ कोटी ३६ लाख रुपये आहे. सदरहू उत्तराने समितीचे समाधान न झाल्याने यासंदर्भातील अत्यावश्यक कागदपत्रे समितीस देण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

विद्यापीठाने नवीन संशोधन केंद्रे हाती घेतले आहे काय ? विद्यापीठात राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पासून शेतकऱ्यांना फायदा होणार आहे काय ? असा समितीने प्रश्न केला असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, केळी संशोधन केंद्र बदनापूर येथे सुरु केलेले आहे. मराठवाड्यात केळीचे पीक २० हजार हेक्टर क्षेत्रामध्ये घेतले जाते. त्यासाठी विद्यापीठाने सन २००६ मध्ये नांदेडला संशोधन केंद्र सुरु केलेले आहे. या ठिकाणी टिश्यू कल्चरची लॅन्ड आहे. तेथे गेल्या ६ वर्षापूर्वीच प्रयोग सुरु केलेला आहे. याकरिता साधारणपणे ४ कोटी रुपयांचा खर्च आलेला होता. त्यामाध्यमातून दरवर्षी ३ लाखांची रोपे तयार केली जातात. सदर रोपांची विक्री मराठवाड्यात केली जाते. कृषि विद्यापीठाने १२० पिकांचे वाण तयार केलेले असून त्यांचा

शेतकरी वापर करीत आहेत. तसेच "विद्यापीठ आपल्या दारी" या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत संशोधन पोहचविण्याचे काम विद्यापीठामार्फत केले जात आहे.

विद्यापीठाकडे खूप मोठ्या प्रमाणात जमिन आहे. पण त्याचा म्हणावा तसा उपयोग करुन घेतला जात नाही, ही वस्तुस्थिती आहे तसेच या ठिकाणच्या स्थानिक शेतकऱ्यांनी बियाणांमध्ये फसवणूक झाल्याची माहिती समितीला मिळालेली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी असे प्रतिपादन केले की, टिश्यू कल्चरचे सेंटर विद्यापीठात असून ते वेळेअभावी समितीला पाहता आले नाही. त्या ठिकाणी दरवर्षी ३ लाख रोपे तयार करुन ती शेतकऱ्यांना दिली जातात. तसेच शासनाकडे केळी संशोधन केंद्राच्या संदर्भातील प्रस्ताव पाठविलेला आहे. केळी संशोधन केंद्राची लॅब विद्यापीठाने नांदेडला सुरु केलेली आहे. शासनाने टिश्यू कल्चरसाठी विद्यापीठाला १ कोटी रुपये दिलेले आहे. त्यानंतर काही अवधीतच मोसंबी (प्रोडक्शन) सुरु झाल्याचे चित्र समोर येईल. विद्यापीठाचा बियाणे उत्पादनामध्ये राज्यात दुसरा क्रमांक लागतो. तसेच सोयाबिनमध्येही विद्यापीठाचा दुसरा क्रमांक लागतो. विद्यापीठाने चांगल्या दर्जाच्या जाती विकसित केलेल्या आहेत. वेगवेगळी रिसर्च करण्यासाठी सेंटर्स आहेत. कापसाच्या अनेक जाती सुरु केलेल्या आहेत. वेगवेगळ्या पिकांचे १२० वाण शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेले असून शेतकरी ते स्विकार करीत आहेत. पेरणी कधी आणि केव्हा करायला पाहिजे यासंदर्भातील तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहोत. विद्यापीठाने विकसित केलेली वाण शेतकऱ्यापर्यंत पोहचण्यासाठी शास्त्रज्ञ प्रयत्न करण्यात येत आहे. विद्यापीठात चांगल्या प्रकारे शिक्षण, संशोधन सुरु आहे. विद्यापीठातील काही विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर आयएएस दर्जाचे अधिकारी म्हणून कार्यरत आहे. विद्यापीठ कशामध्येही मागे नाही. सिड्स प्रोडक्शसाठी विद्यापीठ जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहे. शेतकऱ्यांना अत्यावश्यक लागणाऱ्या गोष्टी विद्यापीठाने नेहमीच विचारात घेतलेल्या आहेत. विद्यापीठ चांगल्या प्रकारे काम करण्याचा प्रयत्न करीत आहे.

शेळ्या, मेंढ्या आणि गायींच्या बाबतचे संशोधन समितीने पाहिलेले आहे. विद्यापीठाने चांगला उपक्रम राबवावा आणि त्या माध्यमातून काही तरी फायदा करावा. जगातील दुसरी राष्ट्रे प्रगती करीत आहेत. परभणी विद्यापीठाकडे मोठ्या प्रमाणात जमिन आहे. विद्यापीठाला राज्य आणि केंद्र शासनाकडून निधी मिळत आहे. विद्यापीठाने काही तरी वेगळे करुन दाखविले पाहिजे अशी समितीची इच्छा आहे. दरवर्षी परदेशात माल पाठविला जातो. पण तो माल काही कारणास्तव परत पाठविला जातो. याचा अर्थ भारत जगाच्या पातळीवर कोठे तरी कमी पडत आहे हेच सिध्द होते. अमेरिका, जपान ही मोठी राष्ट्रे भारतातील फळे स्वीकारत नाहीत असे का होते? याचा विद्यापीठाने शोध घेतला पाहिजे, यासाठी काही तरी तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे. भारतातील आंब्याचे उत्पादन अमेरिका आणि जपान स्वीकारत नाही याची कारणे शोधली पाहिजे. जगात जसा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, त्याप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे असे

समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, भारतातून उत्पादित झालेल्या मालाला परदेशात अतिशय कमी प्रमाणात मागणी असते. प्रत्येक देशातून परदेशात होणाऱ्या मालाच्या आयात व निर्यातीचे प्रमाण वेगवेगळे आहे. अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर हापूस आंब्याची मागणी असते. परंतु तो कॅनडामधून मागविला जातो. आंब्याच्या आत किडा असतो, त्या अनुषंगाने विद्यापीठाकडून कार्यक्रम तयार करुन संबंधित संस्थेला माहिती दिली जाते. सदर कार्यक्रमांस "बेस्ट प्रोजेक्ट" म्हणून ॲवॉर्ड मिळाला आहे. अशा प्रकारे विद्यापीठाला संधी मिळाल्यास त्याचा निश्चितपणे फायदा घेतला जातो. शेतीच्या अनुषंगाने विचार केल्यास युरोप आणि भारतातील शेतीमध्ये खूप फरक आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठाने जास्तीत जास्त चांगले काम करण्यासाठी एनर्जी वाढवावी. राज्य शासनाकडून प्राप्त झालेला निधी व्यवस्थितपणे खर्च होतो किंवा नाही, यासंबंधी अंदाज समिती काम करीत असते. या राज्यातील जनता शासनाकडे कर भरत असते. त्यातून आपल्याला सोयीसुविधा मिळाव्यात अशी त्यांची अपेक्षा असते. आपल्या कृषि विद्यापीठाच्या लेखा परीक्षणाव्यतिरिक्त अजून काही चुका झाल्या असतील, त्यांचा शोध घेऊन त्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. राज्य शासनाकडून प्राप्त झालेला निधी योग्य प्रकारे खर्च होणार नसल्यास, ही बाब योग्य नाही. बी-बियाणांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होणे, परिणामी त्यांचे आर्थिक नुकसान होणे योग्य नसल्याचे समितीने निदर्शनास आणले. अनेक खाजगी कंपन्यांकडून शेतकऱ्यांना जास्त दराने बी-बियाणांची विक्री केली जाते. मोठ्या प्रमाणावर खर्च करुन सुध्दा चांगली फळे येऊ न शकल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक व आर्थिक नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत कृषि विद्यापीठाने मोठ्या प्रमाणावर दर्जेदार बी-बियाणांची निर्मिती केल्यास शेतकऱ्यांना हक्काचे व चांगल्या दर्जाचे बी-बियाणे मिळण्यास मदत होईल. कृषि विद्यापीठाकडे मोठ्या प्रमाणावर क्षेत्र उपलब्ध आहे. तेथे मोठ्या प्रमाणावर इंफ्रास्ट्रक्चर उपलब्ध आहे. त्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याचा प्रयत्न करावा, अशी समितीची सूचना आहे.

समितीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ रोजी मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने विभागाकडून पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे.

- मदर कॉटेजच्या अस्वच्छतेबाबत संबंधिताना सूचना देवून कॉटेजची स्वच्छता करुन घेण्यात आली आहे. तसेस कॅन्टीन मध्ये आवश्यक त्या सुविधा पुरविलेल्या आहेत. (नवीन फर्निचर, उत्तम प्रतिची क्रॉकरी, बैठक व्यवस्था, मुलींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, उत्तम प्रतिचे खाद्य पदार्थ झाकून ठेवणे इत्यादी)
- मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत नांदेड येथे विद्यापीठाच्या इतर कार्यालयासह कापूस संशोधन केंद्र कार्यरत आहे. त्या संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर २८ गुठ्यांवर श्री.शेरसिंग फौजी याने अतिक्रमण केले होते. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा.उच्च न्यायालयात या खटल्याचा निकाल विद्यापीठाच्या बाजूने

लागला होता. संबंधिताने सर्वोच्च न्यायालयात दिवाणी अर्ज करुन मनाई हुकूम मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्वोच्च न्यायालयात विद्यापीठ प्रशासन व पोलीस यंत्रणा एकत्रित करुन पालीस संरक्षणात २८ गुंठ्यावरील अतिक्रमण दि.१९ डिसेंबर २०११ रोजी हटविले आहे. तसेच सदरील जागेवर संरक्षण भिंतीचे काम देखील पूर्ण करण्यात आलेले आहे. श्री.शेरसिंग फौजी यांनी विद्यापीठ अधिकांऱ्यावर वैयक्तिक दावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरण सत्र न्यायालय, नांदेड येथे न्यायप्रविष्ठ आहे.

- समितीला भेटीच्या वेळी अर्धवट स्थितीत आढळलेले बांधकाम हे कृषि विद्यापाठाचे शैक्षणिक संग्रहालय उभारणीचे असलेले इमारतीचे काम आहे. या कामास महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी दिनांक २४ जानेवारी, २०१० रोजी झालेल्या ८१ व्या बैठकीत रु. ५०० लक्ष इतक्या रकमेस मान्यता दिली आहे. या कामास भाकृअप नवी दिल्ली यांचे कडून रु. १०० लक्ष इतकी रक्कम मंजूर झाली आहे. या कामाची सर्वसाधारण स्थिती खालील प्रमाणे आहे.

तळमजला : स्वागत कक्ष, कॅमेरा रुम, ग्रंथालय, स्वच्छतागृह, प्रस्तकाचे दुकान, फोटोग्राफीक स्टुडीओ, परिरक्षणगृह, फुड कोर्ट, गॅलरीज.

पहिला मजला : संग्रहालय, अधिकारी कक्ष, सभागृह खोली, प्रशासकीय कार्यालय, अभ्यागत कक्ष, व गॅलरीज. या इमारतीचे जाते क्षेत्रफळ हे २८७८.२५ वर्ग मिटर आहे. या कामास भाकृअप नवि दिल्ली कडून खालील प्रमाणे निधी उपलब्ध झाला.

सन २००९-१०	३५.०० लक्ष
सन २०१०-११	३५.०० लक्ष
सन २०११-१२	३०.०० लक्ष
एकूण	९०.०० लक्ष

रु.९०.०० लक्ष भाकृअप, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त झाले आहेत. या कामावर रु. ८७.२९ लक्ष इतका खर्च टप्पा १ मध्ये झाला आहे. त्यातून तळमजल्याचे छतापर्यतचे काम पूर्ण झाले आहे. तर टप्पा २ मध्ये उर्वरीत कामास रु. ११४.५९ लक्ष निधी लागणार आहे. त्यातून पहिल्या मजल्याचे छतापर्यतचे काम हाती घेण्यात येईल. जेणे करुन ही इमारत लवकरात लवकर शैक्षणिक संग्रहालय म्हणून उपयोगी पडेल.

- विद्यापीठात भ्रष्टाचाराची प्रकरणे घडलेली नाहीत. तथापि, परभणी येथील कृषि महाविद्यालयाचे तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, डॉ. एम.व्ही. ढोबळे यानी जिमखाना फंडातील रक्कम रु.३,५०,०००/- राष्ट्रीयकृत बँकेत ठेव स्वरुपात ठेवण्याऐवजी यशवंत अर्बन सहकारी बँक, परभणी येथे विद्यापाठाच्या परवानगी शिवाय गुंतविले होते. सदर बँक नादारी ठरल्याने सन २०१०-२०११ पर्यत २,००,०००/- बँकेकडून विद्यापाठास परत मिळाले व रु. १,५०,०००/- सदर बँकेकडे बाकी आहे. सदर प्रकरणी भ्रष्टाचार झालेला नसून अनियमितता झालेली आहे.

- मराठवाडा कृषि विद्यापीठातील अन्नतंत्र महाविद्यालयात आवळा, नोनी, टोमॅटो इत्यादी फळ पिकावर प्रक्रिया केली जात असून त्यापासून आवळा कँडी, आवळा रस नोनी रस, टोमॅटो केचप यासारखे विविध पदार्थ नियमितपणे तयार केली जातात. याशिवाय **"कमवा व शिका"** व **"अनुभवातून शिक्षण"** या उपक्रमाद्वारे स्वत: विद्यार्थी अशी उत्पादने तयार करतात व त्याची विक्री विविध ठिकाणी केली जाते. तसेच सोयाबीन पासून सोयापनिर, सोयादूध, दूधापासून पनिर, खवा इत्यादी उत्पादने तयार करुन विद्यापीठात विविध ठिकाणी विक्री करिता ठेवण्यात येतात. या उपक्रमातून विद्यापीठाचा महसूल वाढीचा प्रयत्न होत आहे.

अखिल भारतीय समन्वीत भाजीपाला संशोधन प्रकल्पातील प्रक्षेत्रावर संशोधन कार्यातून हंगामनिहाय मिळणाऱ्या भाजीपाल्यांचे व फळांचे उत्पादन केले जाते व त्याची विक्री नियमीतपणे विद्यापीठाच्या गेटवर केली जाते. या शिवाय परभणी येथील कृषि महाविद्यालयाच्या परिसरात स्टॉल बांधण्यात आले असून तेथे भाजीपाला, फळे व इतर उत्पादनांची विक्री करण्याची सुविधा आहे.

कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी येथे विकसीत केलेल्या व शेतकऱ्यासाठी उपयुक्त असलेल्या आजपर्यंत १८ विविध औजारांची शिफारस संयुक्त कृषि संशोधन परिषदेने केलेली असून त्याचे उत्पादन व विक्री विद्यापीठामार्फत केली जाते. या शिवाय राष्ट्रीय कृषि विकास योजनेत शासनाने कृषि औजारे व यंत्र तपासणी केंद्रास सन २०११ मध्ये मदत मंजूर केली असून त्याद्वारे विद्यापीठाने विकासीत केलेल्या औजारे व यंत्राची निर्मिती करण्यास मोठ्या प्रमाणावर मदत मिळणार आहे व नजिकच्या काळात त्याचा उपयोग शेतकऱ्यासाठी होणार आहे.

जमिनीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे. शिक्षण ५६९.४६ हे. २) संशोधन २९२५.९४ हे. ३) विस्तार शिक्षण ६०.०० हे. एकूण ३५५५.४० हे. उपरोक्त जमिनीपैकी २६४.०८ हे. क्षेत्र रस्ते, इमारती इत्यादीखाली असून उपरोक्त आकडेवारित समाविष्ट आहे.

- कृषि विद्यापीठाअंतर्गत बहुतांशी क्षेत्राचा उपयोग शिक्षण, संशोधन व शेतकऱ्याच्या प्रात्यक्षिकासाठी होत असून राहिलेल्या क्षेत्रावर बिजोत्पादन घेतले जात आहे. या बिजोत्पादनातून मिळणारे महसूली उत्पन्न सतत वाढत आहे. देशपातळीवर भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने सन २०१० मध्ये बीज परिभ्रमण कोषवृध्दीसाठी या विद्यापाठास पुरस्कृत केलेले आहे.
- अपूर्ण नोंदवह्या पूर्ण करुन घेण्यास सुचविण्यात आले. विद्यापीठांतर्गत विविध स्वरुपाची जवळपास ६० कार्यालये कार्यान्वित आहेत. त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे व नियमाप्रमाणे दरपत्रके मागवून खरेदी केली जात होती. तथापि, यापुढे समितीच्या निर्देशाप्रमाणे खरेदी निविदा मागवून तसेच रेटकॉंट्रॅक्टवर काम

करण्याचे आदेश सर्वांना दिलेले आहेत. दरपत्रकावर स्टेशनरी वगैरे खरेदी केल्यामुळे व नोंदवह्या अपूर्ण असल्यामुळे भ्रष्टाचार झालेला नाही.

- पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय संशोधनाविषयी महाराष्ट्रात पशु वैद्यकीय विद्यापीठ, नागपूर हे कार्यरत असून याशिवाय मराठवाडा कृषि विद्यापीठात मराठवाडा मूळस्थान असलेल्या देवणी या गाईचा संकर होलस्टेन, फ्रीझीयन या विदेशी जातीशी संकर करुन त्यापासून तयार झालेल्या होलदेव या संकरीत गायी मराठवाड्याच्या वातावरणात उत्कृष्ट प्रतिसाद देत असल्यामुळे संयुक्त कृषि संशोधन परिषदेने होलदेव या संकरीत जातीची मराठवाड्यासाठी शिफारस २०११ मध्ये केली आहे. याशिवाय उस्मानाबादी शेळी संगोपनाबाबत संशोधन करुन शेतकऱ्यांना उपयुक्त शिफारशी विद्यापीठाने केलेल्या असल्याने त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.
- **फळ संशोधन केंद्र,** औरंगाबाद येथे केशर आंबा गुणवान केंद्र स्थापन करण्याबाबत इंन्डो इस्त्राईल प्रकल्प समन्वयातून भारत सरकारने मान्यता दिलेली असून त्याबाबत संबंधीतांनी या केंद्रास प्राथमिक भेट दिलेली आहे. या गुणवत्ता केद्राद्वारे भविष्यकाळात परदेशातील आंबा निर्यातीमधील तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना मिळून त्याप्रमाणे निर्यातक्षम आंबा उत्पादन शेतकरी करतील. या केंद्रासाठी ७ कोटी ४४ लक्ष अनुदान प्राप्त झालेले आहे.
- मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे विविध पिकांच्या वाणांचे पैदासकार व पायाभूत बियाणांचे दर्जेदार उत्पादन घेतले जात असून दरवर्षी त्याची पूर्तता देखील केली जात आहे. उत्पादन जवळपास सव्वापटीने जास्तीचे घेण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांना काही प्रमाणात सत्यतादर्शक बियाणे खरीप व रब्बी हंगामात वाटप केले जाते. विद्यापीठाचा सोयाबीन बिजोत्पादन कार्यक्रमास देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोत्कृष्ट केंद्र म्हणून पुरस्कृत केलेले आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून प्राप्त झालेल्या मेगा सिड प्रकल्पांतर्गत व महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेल्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत विद्यापीठास मोठया प्रमाणात अनुदान उपलब्ध झाल्यामुळे विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्यात येत आहे व त्याचबरोबर उपयुक्त यंत्रसामुग्रीही खरेदी करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व काही खाजगी कंपन्याबरोबर विद्यापीठाने सामंजस्य करार केल्यामुळे बिजोत्पादनात वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. भविष्यकाळात या सर्व बाबीचा विद्यापीठाच्या बिजोत्पादन कार्यक्रमावर निश्चित चांगला परिणाम दिसून येईल.

- मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत **अ, ब, क** व **ड** संवर्गातील एकूण **२८११** मंजूर पदे आहेत. त्यापैकी **१८२६** पदे भरलेली असून **९८५** पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत. त्यापैकी गट अ संवर्गातील ६ पदांसाठी गट ब क आणि ड संवर्गातील एकूण ७२ पदे (अपंग ३१ व अनुशेष ४१) अशी एकूण **७८** पदे भरण्यासाठी जाहिरात दिलेली आहे. एकूण **९०७** पदे रिक्त आहेत.
- मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत कृषि संशोधन क्षेत्र सोमनाथनूर उदगीर फळ संशोधन केंद्र हिमायतबाग औरगाबाद, कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद,कृषि विद्यालय बसमत, कृषि महाविद्यालय अंबेजोगाई कंपनीबाग, कृषि विद्यालय तुळजापुर बाजरा संशोधन प्रक्षेत्रांवर संरक्षण भिंत बांधण्याच्या रु ३१४.६७ लक्ष इतक्या किंमतीच अंदाजपत्रकांना दिनांक २ जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर संरक्षक भिंतीच्या कामांना वित्तीय मान्यता देण्याबाबत व सन २०११-१२ मध्ये योजनांतर्गत तरतूदीतून अनुदान उपलब्ध करुन देण्यातबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.
- तथापि, कृषि विद्यापीठांचा योजनांतर्गत निधी प्राथम्याने शिक्षण व संशोधनावर खर्च करणे अपेक्षित आहे. विद्यापीठांची इतर दायित्वे प्रलंबित आहेत. अशा स्थितीत संरक्षण भिंतीसाठी खर्च करणे प्राथम्यक्रमात बसणार नाही या कारणास्त्व वित्त विभागाने सदर प्रस्तावास मान्यता दिलेली नाही.
- मराठवाडा कृषि विद्यापीठाने मंजूर अनुदानापेक्षा केलेल्या जादा खर्चाबाबत विद्यापीठाने सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.३ मधील विवरणपत्र १ ते ४ मध्ये स्पष्टीकरण केले आहे.
- मराठवाडा कृषि विद्यापीठाने परभणी येथील सर्व्हे क्रमांक ८०, ८१ व ८२ मधील एकूण ३० एकर जमिन जवाहर नवोदय विद्यालयाच्या स्थापनेसाठी हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला होता. सदर जमिन हस्तांतरीत करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, २०१२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
- परभणी येथील कृषि महाविद्यालयाचे तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, डॉ. एम. व्ही. ढोबळे यांनी जिमखाना फंडातील रक्कम रु. ३,५०,०००/- राष्ट्रीयकृत बैंकेत ठेव स्वरुपात ठेवण्याऐवजी यशवंत अर्बन सहकारी बँक, परभणी येथे विद्यापीठाच्या परवानगीशिवाय गुंतविले होते. सदर बँक नादार ठरल्याने सन २०१०-११ पर्यंत रु. २,००,०००/- बँकेकडून कृषि विद्यापीठास परत मिळाले, व रु. १,५०,०००/- बँककडे बाकी आहेत. या प्रकरणी श्री.ढोबळे यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचे संवानिवृत्ती उपदानातील आवश्यक ती रक्कम रोखून ठेवण्यात आलेली आहे.
- मराठवाडा कृषि विद्यापीठाचे सन २००८-०९ पर्यंतचे लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे.

- मराठवाडा कृषि विद्यापीठाकडे एकूण ३५५५.४० हेक्टर इतकी जमिन आहे. त्यापैकी शिक्षणासाठी ५६९.४६ हेक्टर, संशोधनासाठी २९२५.९४ हेक्टर,विस्तार शिक्षणासाठी ६०.०० हेक्टर जमिनीचा वापर केला जातो.

समितीने दिलेल्या भेटीच्या व विभागाकडून प्राप्त झालेल्या आश्वासीत माहितीच्या अनुषंगाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ रोजी विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली.

समितीने परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठाला भेट दिली त्यावेळी झालेल्या बैठकीमध्ये नांदेड येथील कृषि विद्यापीठाच्या कापूस संशोधन केंद्राच्या जागेमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्या अनधिकृत बांधकामाला कोण जबाबदार आहे? सदरचे अतिक्रमण हटविण्याकरिता विद्यापीठाने कोणते प्रयत्न केले किंवा करण्यात येणार आहेत? याची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, त्या ठिकाणी जे अनधिकृत बांधकाम झाले त्याला जबाबदार असे कुणीही नाही. त्या ठिकाणी झालेले अतिक्रमण हटविण्यासाठी विद्यापीठाकडून सुरुवातीपासून प्रयत्न सुरु होते. श्री. शेरसिंग हिरासिंग फौजी नावाच्या स्थानिक व्यक्तीने २८ गुंठे जमिनीवर अतिक्रमण केले होते. विद्यापीठाने गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून ते अतिक्रमण हटविण्यासाठी प्रयत्न केले परंतु त्या व्यक्तीने त्याला दाद दिली नाही. सदर प्रकरणी विद्यापीठाने उच्च न्यायालयामध्ये दाद मागितल्यानंतर विद्यापीठाच्या बाजूने निकाल लागला. त्या विरुध्द संबंधिताने सर्वोच्च न्यायालयामध्ये दिवाणी अर्ज करुन मनाई हुकूम मिळविण्याचा प्रयत्न केला. पंरतू सर्वोच्य न्यायालयात देखील विद्यापीठाच्या बाजूने निकाल लागलेला आहे. त्यानंतर विद्यापीठाकडून जिल्हा प्रशासन, महानगरपालिका प्रशासन, विद्यापीठ प्रशासन आणि पोलीस यंत्रणेच्या मदतीने सदरचे अतिक्रमण दिनांक १९ डिसेंबर २०११ रोजी हटविण्यात आले आहे. त्यानंतर विद्यापीठाच्या जागेवरील संरक्षण भिंतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

सन २००६ ते २०१०-११ पर्यन्त प्राप्त झालेले अनुदान व झालेल्या खर्चाची माहिती समितीने विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, सन २००७-०८ मध्ये नॉन प्लॅनमध्ये ५३ कोटी ६८ लाख १७ हजार अनुदान प्राप्त झाले व ५१ कोटी ९० लाख ६४ हजार इतके खर्च झाले. त्याचप्रमाणे सन २००८-०९ मध्ये ६६ कोटी ६२ लाख ८९ हजार इतके अनुदान प्राप्त झाले व ६६ कोटी, ६६ लाख, ६२ हजार इतके खर्च झाले. सन २००९-१० मध्ये ८४ कोटी, ६३ हजार इतके अनुदान प्राप्त झाले व ८१ कोटी ९ लाख २७ हजार इतके खर्च झाले, सन २०१०-११ मध्ये १२१ कोटी ५९ लाख, ३५ हजार अनुदान प्राप्त झाले व ११६ कोटी, ७७ लाख, ७७ हजार इतके खर्च झाले. त्यानंतर प्लॅनमध्ये सन २००७-०८ मध्ये १० कोटी ४० लाख इतके अनुदान प्राप्त झाले व १५ कोटी ९४ लाख ७८ हजार इतका खर्च झाला. सन २००८-०९ मध्ये १७ कोटी १२ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले व १४ कोटी ४१ लाख ५२ हजार इतका खर्च झाला. सन २००९-१० मध्ये १६ कोटी

४० लाख इतके अनुदान प्राप्त झाले व २० कोटी ५६ लाख ४ हजार इतका खर्च झाला. त्यानंतर, सन २०१०-११ मध्ये २१ कोटी १९ लाख १० हजार इतके अनुदान प्राप्त झाले व २१ कोटी ८८ लाख ८३ हजार इतका खर्च

झाला.

शासनाच्या नियमानुसार ३१ मार्च अखेर अखर्चित राहिलेली रक्कम शासनाला समर्पित केली पाहिजे. त्याकरिता विद्यापीठाला काही सवलत देण्यात आली आहे काय? तसेच अखर्चित राहिलेली रक्कम अकाऊंटमध्ये ठेवता येते परंतु ती खर्च करण्यास शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागते तशी मान्यता आपण घेतली आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, शासनाच्या दि. ६ जून २००८ च्या शासन निर्णयानुसार प्लॅनमधील अखर्चित रक्कम पुढील वर्षी खर्च केली पाहिजे. नॉन प्लॅनमधील शिल्लक राहिलेली रक्कम ३१ मार्च अखेर खर्च न झाल्यास ती शासनाकडे समर्पित केली पाहिजे. परंतु प्लॅनमधील रक्कम अखर्चित राहिल्यास ती पुढील वर्षी खर्च करण्यासशासन निर्णयानुसार मुभा आहे. विद्यापीठाकडे प्रचंड प्रमाणात जागा उपलब्ध आहे. परंतु विद्यापीठाचे महसूली उत्पन्न बघितले तर ते अत्यंत कमी आहे.

मराठवाडा विद्यापीठाच्या महसूली उत्पन्नामध्ये वाढ न होण्याची कारणे काय आहेत? हे विद्यापीठ शासनाच्या अनुदानावर अजून किती वर्षे अवलंबून राहणार आहे? विद्यापीठामध्ये संशोधनाबरोबर उत्पादन देखील वाढले पाहिजे त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी यावर असे सांगितले की, विद्यापीठाकडे एकूण ३५५५.४० हेक्टर जमिन आहे. विद्यापीठाकडे एकूण ११ कॉलेज आहेत त्यासाठी ५६९.९४ हेक्टर जमिन गेली आहे, त्याचप्रमाणे ३ ट्रेनिंग सेंटर्स आहेत त्यासाठी ६० हेक्टर जमिन गेली आहे, संशोधनासाठी २ हजार ९२५.९४ हेक्टर जमिन गेली आहे. नॅशनल सीड डेव्हलपमेंट प्रोग्रामखाली २४ योजना आहेत. त्याकरिता वेगवेगळया एक्सपरिमेंटकरिता ५० टक्के जमिन वापरली जाते. नॅशनल सीड डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये जे उद्दिष्ट विद्यापीठाला देण्यात आले होते त्याच्या दीड पट अधिक उत्पादन विद्यापीठाने काढले आहे. यामध्ये विद्यापीठाला देश पातळीवर जबलपूर नंतर दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले. त्याचप्रमाणे महाबीजचे फाऊंडेशन सीड बनवितो. त्यामधून दीड ते पावणे दोन कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. एकंदरीत कमर्शिअल सीड विद्यापीठाकडून बनविले जाते. प्रॉडक्शन आणि डेअरी प्रॉडक्शनमधून दरवर्षी ६ कोटी पर्यन्त उत्पन्न मिळते.

विद्यापीठाचा एकूण खर्च किती आहे? विद्यापीठाकडील जमिनीमधून एक टक्का देखील उत्पन्न मिळत नसेल तर आपण राज्यातील शेतकऱ्यांना काय माहिती देणार आहात. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, विद्यापीठामध्ये एकूण ११ घटक महाविद्यालये आहेत आणि २९

संलग्न महाविद्यालये आहेत. ११ घटक महाविद्यालयांमध्ये जमिनीची विभागणी झाली आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार मिळून सीड प्रोग्राम राबविण्यात येतो, त्यामध्ये ठरवून दिलेल्या उद्दिष्टाच्या सव्वा पट अधिक सीड प्रॉडक्शन केले जाते. विद्यापीठाचे महसूली उत्पन्न सन २००७-०८ मध्ये ८ कोटी ६२ लाख ६८ हजार होते, सन २००८-०९ मध्ये ९ कोटी ८८ लाख २० हजार होते, सन २००९-१० मध्ये १० कोटी ६१ लाख ६५ हजार होते आणि सन २०१०-११ मध्ये १० कोटी ८४ लाख ८२ हजार होते. अशाप्रकारे महसूली उत्पन्न विद्यापीठाकडून वाढविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सन २००७-०८ मध्ये ८ कोटी ७१ लाख ६१ हजार खर्च झाला, सन २००८-०९ मध्ये ७ कोटी ७५ लाख ७१ हजार खर्च झाला, २००९-१० मध्ये ९ कोटी २० लाख ५७ हजार खर्च झाला, सन २०१०-११ मध्ये १० कोटी ८३ लाख ७५ हजार खर्च झाला. यामध्ये विद्यापीठाचे जे मॅनेजमेंट आहे त्यामध्ये एज्युकेशन रिसर्च आणि एक्सटेंशन हा महत्वाचा भाग आहे.

विद्यापीठाच्या ताब्यात असलेल्या जमिनीमधून विद्यापीठाला उत्पन्न का मिळत नाही? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, विद्यापीठाचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न सुरु आहेत. शासनाच्या सन २००८-०९, २००९-१० पासून सेंट्रल फार्मची ग्रँट विथड्रॉ केली असून हा सर्व खर्च विद्यापीठाच्या महसूलातून करण्यात येत आहे. बियाण्यांच्या उत्पादनाकरिता जायकवाडी प्रकल्पाच्या कालव्यातून पाणी आणण्याचा प्रयत्न असून त्यामधून ४०० हेक्टर क्षेत्रामध्ये रब्बी पिक घेण्यात येत आहे. अशाप्रकारे जास्तीत जास्त महसूल वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या मालाची ज्या विक्री केंद्रामधून विक्री केली जाते त्यामधून विद्यापीठाला किती महसूली उत्पन्न मिळते? लेखापरीक्षकांच्या आक्षेपाचे निराकरण कशाप्रकारे केले आहे. विवरण पत्र क्र. ४ मध्ये महसूली उत्पन्न व खर्च दिलेला आहे. यामध्ये मिळणारे उत्पन्न आणि यामध्ये ज्या मालाची विक्री करावयाची आहे ती कोणत्या दराने केली जाते त्याचा तपशील कां दिला नाही? तसेच विवरणपत्र ५ मध्ये सन २००७-२००८ या वर्षाची माहिती देण्यात आली आहे. प्रक्षेत्र व बियाणे यांचे उत्पन्न, शैक्षणिक आणि इतर महसूल अशा तीन भागात उत्पन्न विभागून दाखविण्यात आले आहे. अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दिनांक १ एप्रिल, २०११ ते १० फेब्रुवारी, २०१२ या काळातील दाखविलेले उत्पन्न व खर्च यामध्ये तफावत आहे. तसेच विद्यापीठास एकूण उत्पनाच्या ५० टक्के खर्च होतो विद्यापीठाकडे ३५०० हेक्टर जमिन असल्याचे विभागीय प्रतिनिधीने साक्षीच्यावेळी सांगितले आहे. तथापि, विद्यापीठाकडे आणखी ५०० हेक्टर जमिन असल्याचे समितीस आढळून आलेले आहे. अशा प्रकारे विभागीय प्रतिनिधीकडून समितीस विसंगत आणि दिशाभूल करणारी माहिती देण्यात आल्याने समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

विद्यापीठाला कोणकोणत्या माध्यमातून उत्पन्न मिळते, त्याची विक्री केंद्रे किती आहेत, त्यामधून किती महसूल प्राप्त होतो, अशी सर्व बाबनिहाय माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता विभागीय

प्रतिनिधींने प्रतिपादन केले की, विद्यापीठाला एकूण १० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. यापैकी शेतकरी, महाबीज व केंद्रीय कृषि केंद्रे यामधून १.५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. पशुसंवर्धन फार्म विद्यापीठ स्तरावर आहेत. विविध प्रकारचे खाद्य पदार्थ जसे, पनीर, मिठाई वगैरे बनविली जातात. त्यामधून १७ ते १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे हॉर्टिकल्चरच्या माध्यमातून नर्सरी तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये आंबा, संत्री, चिकु वगैरे रोपे बनविली जातात व त्यांच्या विक्रीतून ६० लक्ष रुपये दरवर्षी विद्यापीठाला मिळतात. शैक्षणिक शुल्क ३५६ लक्ष रुपये प्राप्त होते व इतर उत्पन्नामधून १.५० लक्ष रुपये प्राप्त होतात. अशा प्रकारे १० कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न विद्यापीठाला मिळते.

लेखा परीक्षक (स्थानिक निधी) यांच्याकडून विद्यापीठाचे कोणत्या वर्षापर्यन्तचे लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे ? अशी समितीने माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २००८-२००९ पर्यन्तचे लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे. अद्याप सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण झालेले नाही. त्यावर विद्यापीठाचे लेखापरीक्षण ३-३ वर्षे होत नसेल तर ती बाब गंभीर आहे. याबाबत शासनाने लक्ष घालावे अशी समितीने सूचना केली.

विद्यापीठाकडून संशोधन व उत्पादन अशी दोन प्रकारची कामे केली जातात. संशोधनावर वार्षिक खर्च किती केला जातो, उत्पादन घेण्यासाठी किती खर्च केला जातो आणि आस्थापनेवर किती खर्च केला जातो तसेच विद्यापीठामध्ये एकूण किती शास्त्रज्ञ कार्यरत आहेत व त्यांच्या वेतन व भत्त्यांवर किती खर्च केला जातो, अशी समितीने तपशिलवार माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, विद्यापीठात एकूण १६५ शास्त्रज्ञ कार्यरत आहेत. वेतन व भत्त्यापोटी येणाऱ्या खर्चासाठी केंद्र शासनाकडून ७५ टक्के व राज्य शासनाकडून २५ टक्के अनुदान प्राप्त होते. सहायक प्रोफेसर यांचे सरासरी वार्षिक वेतन ५० हजार व असोसिएट प्रोफेसर यांचे सरासरी वार्षिक वेतन ७० हजार रुपये एवढे आहे. विद्यापीठास मिळणाऱ्या अनुदानाबाबची माहिती विवरणपत्र क्रमांक ३ मध्ये ही माहिती देण्यात आली आहे. सन २००७-२००८ मध्ये केंद्र शासनाकडून १२ कोटी ७० लाख ९४ हजार व सन २००८-२००९ मध्ये १७ कोटी ४१ लाख रुपये प्राप्त झाले आहेत.

राज्यात कृषि विभागाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट संदर्भात अनेकदा बैठका होतात. गेल्या अनेक दिवसांपासून रिसर्च अँड डेव्हलपमेंटच्या बाबतीत केवळ चर्चा झालेली आहे. कृषि क्षेत्रातील तज्ञांच्या मते कृषि क्षेत्रातील संशोधन व विकासासाठी पैसे कमी पडतात. कृषि क्षेत्रामध्ये जेवढे संशोधन व्हावयास हवे होते तेवढ्या प्रमाणात झाले नाही. इस्त्रायल येथे जे संशोधन होते त्याचे पेटंट संबंधित शास्त्रज्ञाला दिले जाते. भारतात संशोधनाचे काम हाती घेतले तर त्यावर खर्च केला जातो, परंतु तद्नंतर त्या अनुषंगाने काहीही कार्यवाही केली जात नाही. कृषि अवजारे किंवा खतांच्या संशोधनानंतर त्याचे पेटंट संबंधित शास्त्रज्ञाला

देण्यासंदर्भात काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. या राज्यात कृषि खात्यांतर्गत पुरविण्यात येणारी बियाणे चांगल्या दर्जाची नसल्यामुळेच आज कृषि विभाग मोडकळीस आलेला आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करताना असे सांगितले की, मराठवाडा कृषि विद्यापीठाने १२० पेक्षा अधिक पिकांच्या वाणांचे संशोधन केलेले आहे. तसेच ६०० पेक्षा जास्त तंत्रज्ञांच्या बाबतीत शिफारशी केलेल्या आहेत. या बरोबरच १८ प्रकारचे कृषि यंत्र व अवजारे विकसित केली आहेत. केंद्र सरकारचा ७५ टक्के आणि राज्य सरकारचा २५ टक्के हिस्सा असणाऱ्या विविध प्रकारच्या योजना विद्यापीठाकडून राबविल्या जात आहेत. केंद्र सरकारच्या एकूण २४ संशोधन योजना आहेत. त्याद्वारे मराठवाडा कृषि विद्यापीठामध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन चालते. विद्यापीठाकडे अशा प्रकारच्या ७ योजना आहेत. विद्यापीठाच्या सह संचालकांकडून १२० वेगवेगळ्या पिकांचे वाण प्रस्तावित केले आहे. मराठवाड्यात तूर पिकाचे क्षेत्र ५ लाख हेक्टर आहे. त्यामध्ये विद्यापीठाने संशोधन केलेले ७३६, ८५३, ७०८ इ. वाण पूर्णपणे मराठवाड्यात पसरलेले आहे. साधारणत: मराठवाड्यातील तूर पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ५०-६० टक्के क्षेत्र मराठवाडा कृषि विद्यापीठाने संशोधन केलेल्या बियाण्यांच्या वाणाने व्यापलेले आहे. शिवाय मराठवाड्यामध्ये ११ लाख हेक्टर ज्वारीचे क्षेत्र आहे.

समितीने विद्यापीठाला दिलेल्या भेटीच्या वेळी विद्यापीठातील भ्रष्टाचाराचे प्रकरण निदर्शनास आणून दिले होते. डॉ.एम.व्ही.ढोबळे, तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य यांनी जिमखाना फंडातील ३.५ लाख रुपयांची ठेव राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याऐवजी, विद्यापीठाची परवानगी न घेता यशवंत अर्बन सहकारी बँक, परभणी येथे ठेवली होती. या संदर्भात डॉ.ढोबळे यांच्यावर काय कारवाई केली ? त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, डॉ.ढोबळे यांनी यशवंत अर्बन सहकारी बँकेत ३.५ लाख रुपये ठेव म्हणून ठेवले होते. वास्तविक पाहता शासनाच्या निर्देशानुसार सहकारी बँकेत पैसे ठेवता येत नाहीत. परंतु डॉ.ढोबळे यांनी जास्त व्याज मिळण्यासाठी सहकारी बँकेत पैसे ठेवले होते. ३.५ लाख रुपयांपैकी विद्यापीठाला बँकेकडून व्याजासह २.९५ लाख रुपये प्राप्त झालेले आहेत. आता डॉ.ढोबळे सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांची उपदानाची रक्कम रोखून ठेवलेली आहे.

डॉ.ढोबळे यांच्याविरुध्द पोलीस कारवाई केली नाही. परंतु त्यांची विभागीय चौकशी केली आहे. डॉ.ढोबळे यांच्या विरोधात केलेल्या कारवाईला त्यांनी न्यायालयात दाद मागितलेली असून, सध्या सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यावर विद्यापीठाला ९ लाख रुपये व्याजासह परत मिळावयास हवे होते. ती रक्कम परत का मिळाली नाही? तसेच सध्या त्या बँकेची स्थिती कशी आहे ? ज्या सहकारी बँकेत रक्कम ठेवली होती ती यशवंत अर्बन सहकारी बँक, परभणी नादार ठरलेली आहे. उपरोक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी

कामामध्ये कसूर केली त्यामुळे विद्यापीठाचे नुकसान झाले असा त्यांच्यावर ठपका ठेवून त्यांना मिळणारी प्रॉव्हीडंड फंड आणि ग्रॅज्युएटीची रक्कम अडविता आली असती. अनियमितता केली म्हणून विद्यापीठ त्यांचे पैसे अडवू शकत नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी अनियमितता केली, भ्रष्टाचार केला नाही आणि हे विद्यापीठाकडून न्यायालयात सांगितले तर विद्यापीठास त्यांचे अडविलेले १० लाख रुपये द्यावे लागतील. या प्रकरणी न्यायालयाने काय निकाल दिलेला आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीला समाधानकारक उत्तरे दिले नाहीत. त्यामुळे सदरहू साक्ष अपूर्ण ठेवण्यात आली.

दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या साक्षीच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती खालील प्रमाणे.

सन २००६ ते २०१०-२०११ पर्यंत प्राप्त झालेले अनुदान व झालेल्या खर्चाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.४ मधील विवरणपत्र क्र.१ ते ४ मध्ये दिली आहे. विवरणपत्र क्र .४ मध्ये विद्यापीठाच्या महसूलच्या सविस्तर जमेची माहिती विवरणपत्र क्र .५ मध्ये व सविस्तर खर्चाची माहिती विवरण पत्र क्रं. ६ मध्ये दिली आहे. शासनाच्या नियमानुसार दिनांक ३१ मार्च, अखेर अखर्चित राहिलेली रक्कम शासनाला सूपुर्द केली पाहिजे अशी समितीने सूचित केले असता वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ अन्वये अशी सवलत दिली आहे परंतु विद्यापीठ हे प्राधिकरणामध्ये येते किंवा नाही याबाबत शासनाकडे विचारणा केली आहे परंतु उत्तर अप्राप्त आहे. तथापि, त्या त्या वेळीच्या नियंत्रकांनी पूर्व परवानगी घेतली असावी असे वाटते. तथापि, पूर्व परवानगी घेण्याबाबतच्या संचिका कार्यालयात सापडत नाहीत. शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय नियंत्रक खर्च करु शकणार नाहीत.

- मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत एकूण ३५५५.४० हेक्टर क्षेत्रापैकी संशोधन विभागाकडे एकूण २९२५.९४ हेक्टर क्षेत्र आहे. सदर जमिनीचा हेतू महसूली उत्पन्न वाढविणे हा नाही. उपलब्ध जमिनीचा वापर खालील गोषवाऱ्या प्रमाणे करण्यात येत आहे.

१)	नियमीत प्रयोग व प्रात्यक्षिकाखाली	:	४५५.९३ हे.
२)	फळबाग मातृवृक्ष व रोपवाटीकाखाली	:	१३१.८० हे.
३)	चराऊ कुरण व चारा पिकाखाली	:	९०.०० हे.
४)	नदी, नाले, पोटखराब खाली	:	३५०.८० हे.
५)	निवास स्थाने, कार्यालये, प्रयोगशाळा, इमारती, रस्ते खाली	:	१६४.४९ हे.
६)	निव्वळ बिजोत्पादनासाठी उपलब्ध क्षेत्र	:	१७३२.९२ हे.

विद्यापीठाचे उत्पन्न वाढविण्यासाठी २०११-२०१२ या वर्षी राष्ट्रीय कृषि विकास योजना (आरकेव्हीवाय) अंतर्गत एकूण रु. १३.०२ चा प्रस्ताव शासनाकडून मंजूर झाला. या योजनेंतर्गत अधिक बियाणे उत्पादन, सिंचनस्त्रोत विकसीत करणे इत्यादी कामे सुरु आहेत. पैदासकार बिजोत्पादनाचे उदिष्ट, प्रत्यक्ष उत्पादन,

मंजूर परिभ्रमण कोष व महसूली उत्पन्न (लक्ष रुपये) याची सन २००६-२००७ ते २०१०-२०११ पर्यंतची माहिती देण्यात आली आहे.

अ.क्र.	वर्ष	उदिष्ट (क्विं.)	प्रत्यक्ष उत्पादन (क्विं)	परिभ्रमण कोषातून झालेला खर्च	महसूली उत्पन्न
१.	२००६-०७	१४००.००	२७४२.०१	४९.५५	१८३.६६
२.	२००७-०८	१३०८.२१	३०२१.९६	५३.३५	२३१.१८
३.	२००८-०९	१८४०.५८	२६१४.८९	६४.९४	१९५.८९
४.	२००९-१०	१८४७.९८	२६०८.६१	६५.०८	२११.४७
५.	२०१०-११	१२९३.१०	३४८९.३३	९०.६८	३११.८६

- मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत एकूण ३५५५.४० हेक्टर जमिन आहे. त्यापैकी शिक्षणासाठी ५६९.४६ हे, संशोधनासाठी २९२५.९४ व विस्तार शिक्षणासाठी ६० हे. जमिन उपलब्ध आहे.
- विविध संशोधन केंद्रावर पिकानिहाय प्रयोगासाठी एकूण ४५५.९३ हेक्टर क्षेत्र उपलब्ध असून प्रयोगाचे नियोजन दरवर्षी होणाऱ्या संशोधन आराखडयाप्रमाणे करावे लागते व त्यातील मिळणारे उत्पादन बऱ्याच वेळा अखिल भारतीय पातळीवर परत दुसऱ्या हंगामातील प्रयोगासाठी वाटप करावे लागते किंवा प्रात्यक्षिकासाठी वापरले जाते. त्यामुळे त्यापासून बहुतांश वेळा महसूल प्राप्त होत नाही. फळ पिकावरील उदा. आंबा, मोंसबी, चिकू, पेरु, डाळिंब, चिंच या पिकाच्या बऱ्याचश्या बागा उत्पादनात आलेल्या नसल्यामुळे त्यांनी वापरलेल्या क्षेत्रातून सध्या तरी महसूली उत्पन्न मिळत नाही. रोप वाटीकेत मातृवृक्ष म्हणून लागवड केलेल्या झाडापासून निर्माण होणाऱ्या काडयाचा उपयोग नवीन रोप निर्मितीसाठी करण्यात येत आहे. त्यासाठी एकूण १३१.८० हेक्टर क्षेत्र उपलब्ध करण्यात आले आहे. विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या ंसकरीत गोपैदास प्रकल्पात देवणी व संकरीत (होलदेव) जातीची एकूण १६० जनावरे असून त्याचा चाऱ्यासाठी व कुरणासाठी ९० हेक्टर क्षेत्र राखीव ठेवले आहे. विद्यापीठातील संशोधन केंद्राच्या विविध इमारती, प्रयोगशाळा, रस्ते इत्यादी खालील १६४.४९ हेक्टर व नदी, नाले, पोटखराब या खाली एकत्रित ३५०.८० हेक्टर क्षेत्र व्यापले आहे. ते वगळता बिजोत्पादन कार्यक्रमासाठी दरवर्षी १७३२.९२ हेक्टर क्षेत्र उपलब्ध आहे. त्यापैकी दरवर्षी अंदाजे १००.०० हेक्टर क्षेत्रावर हिरवळीची पिके घेतली जातात व काही क्षेत्र पिक फेरपालटीखाली राखून ठेवून त्यावर अलटून पालटून खरीब किंवा रब्बी च्या एकाच हंगामात बिजोत्पादन घेतले जाते. सर्वसाधारणपणे १००० ते ११०० हेक्टर क्षेत्रावर विविध पिकांचे बिजोत्पादन घेण्यात येते. कमर्शियल सीड प्रोडक्शन आणि डेअरी प्राडेक्शन मधून ६ कोटी पर्यंतचे उत्पन्न प्राप्त करण्यासाठी विद्यापीठाला सर्वसाधारण दोन ते अडीच कोटी रुपये खर्च येतो.

विद्यापीठ स्थापनेपासून आजतागायत विद्यापीठाने २६ पीकांच्या १२० संशोधीत वाणांची व १८ शेती अवजारांची निर्मिती केली असून त्यापैकी १२ पीकांच्या ५० वाणांची नोंदणी राष्ट्रीय स्तरावरील वनस्पती जनुकीय संशोधन मंडळ नवी दिल्ली येथे झालेले असून पीक उत्पादन वाढीसाठी आजपर्यंत विद्यापीठाने जवळपास ७०० तंत्रज्ञानाच्या शिफारसी शेतकऱ्यासाठी केलेल्या आहेत व त्यास महाराष्ट्र राज्य कृषि संशोधन व विकास परिषदेच्या वेळोवेळी होणाऱ्या वार्षिक बैठकीत मंजूरी मिळालेली आहे. त्यामुळे विभागातील व राज्यातील शेती उत्पादनात भरीव वाढ झालेली आहे. त्यामुळे विद्यापीठाने संशोधीत केलेल्या वाणांचा सिंहाचा वाटा आहे. विद्यापीठ स्थापनेपूर्वीच्या व सद्यस्थितीत पिक उत्पादकतेत भरीव वाढ झालेली आहे. उदा. गहु, ज्वारी मध्ये चार ते साडेचार पट, तुर व कापसामध्ये दुप्पट, सोयाबीन मध्ये तिप्पटपेक्षा जास्त वाढ झाल्याचे आढळून येते त्याबाबतचा एकत्रित गोषवारा प्रपत्र क्र.४ मधील जोड पत्र २ मध्ये दिलेला आहे. देशातील सोयाबीन लागवडीत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागत असून ते देशाच्या ३० टक्के क्षेत्र आहे. मराठवाड्यात कोरडवाहू मध्ये कापसानंतर सोयाबीन हे दुसरे नगदी पिक म्हणून ओळखले जात आहे व त्याचा पेरा दरवर्षी वाढत आहे. मराठवाडा कृषि विद्यापीठाने संशोधीत केलेल्या चार वाणांच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ होत असून त्या वाणाच्या पैदासकार बिजोत्पादनाची निर्मिती केल्यामुळे विद्यापीठास देश पातळीवर सन २००८-०९ मध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने सन २००५-०६ ते २०११-१२ या कालावधीत विद्यापीठाने संशोधीत केलेल्या चार जातींचे जवळपास १,१४,२२७ क्विंटल बियाणे शेतकऱ्यांना विक्री केलेले आहे. जवळपास अशाच प्रकारची प्रगती केंद्र व राज्य पातळीवर तुरीच्या व इतर पिकांच्या संशोधीत वाणाच्या बाबतीत आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, अंतर्गत एकूण ११ घटक महाविद्यालय आणि २९ संलग्न महाविद्यालये आहेत. ११ घटक महाविद्यालयामध्ये जमिन विभागणी झालेली आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार मिळून बिजोत्पादन कार्येक्रम राबविण्यात येतो. त्यामध्ये ठरवुन दिलेल्या उद्दिष्टांच्या सव्वा पट अधिक सीड प्रॉडक्शन केले जाते.

अ.क्र.	वर्ष	महसुली उत्पन्न	महसुली खर्च
	२००७-२००८	८,६२,६८,०००	८,७१,६१,०००
	२००८-२००९	९,८८,२०,०००	७,७५,७१,०००
	२००९-२०१०	१०,६१,६५,०००	९,२०,५७,०००
	२०१०-२०११	१०,८४,८२,०००	१०,८३,७५,०००

विद्यापीठ उत्पादित केलेल्या मालाची विक्री केंद्रातून मिळणारे उत्पन्न पुढील प्रमाणे आहे.

२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११
२७९८२००	२४५४००००	२९४९५०००	२२८०९०००	२५९४३०००

लेखा परिक्षाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभाग प्रमुखांना आक्षेप कळवून बैठक घेवून उत्तरे प्राप्त केली जातात व ही उत्तरे योग्य असल्यास कार्यकारी परिषदेची मंजूरी घेवून निराकरण केले जाते. विद्यापीठाचा शेतमाल खरेदी विक्री संघात विकला जातो. दरवर्षी खरेदी विक्री संघाचे दर बदलत असल्याचे महसूली उत्पन्नात चढ-उतार दिसून येतो. एकूण महसूल उत्पन्नाच्या ५० टक्कें खर्च होत नाही तो निश्चितच जास्त होतो. खर्चाच्या ठळक बाबी अशा १. मजूर, २. बियाणे, खते, औषधे, ३. शेती मशागत, ४. पेट्रोल, तेल, वंगण, ५. पशुखाद्य व वैरण, ६. हत्यारे व औजारे ७. भू-सुधार, ८. पाणी व्यवस्थापन व पाईप लाईन इ.

- १ एप्रिल, २०११ ते १० फेब्रुवारी २०१२ चे केवळ उत्पन्न समितीला माहितीस्तव (वाढत आहे हे दाखविण्यासाठी) दिले आहे.
- विद्यापीठाने संपादीत केलेल्या जमिनीपैकी शेंद्रा गावाचे पुर्नवसन न झाल्याने सदर गाव अद्यापही विद्यापीठाच्या परिसरात वसलेले आहे. या गावा भोवतालची जवळपास ५०० हे. जमिन विद्यापीठाच्या ताब्यात असूनही त्यातून विद्यापीठास महसुली उत्पन्न किंवा संशोधनात्मक प्रयोग घेता येत नाही. कारण या गावातील लोकांचे पुर्नवसन न झाल्याने सदर जमिन वहीताखाली आणता येत नाही. पुर्नवसना संबंधिचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. विद्यापीठाकडे असलेल्या जमिनीपैकी काही क्षेत्र ओलिता खाली आणण्यात आले आहे जेणे करुन उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे. विद्यापीठाकडे संशोधन, शिक्षण व विस्तार ही महत्वाची कामे असल्यामुळे विद्यापीठाकडे असणाऱ्या जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग, संशोधन, शिक्षण व विस्तार या कार्यासाठी करण्यात येत असून व्यापारी तत्वावर उत्पादन घेतले जात नाही. विद्यापीठाच्या जमा खर्चाचे विवरणपत्र शासनास सादर करण्यात येते.

महसूल उत्पन्नाची आकडेवारी प्रपत्र क्र.४ मधील विवरणपत्र क्रं. ४ मध्ये नमूद केली आहे व विद्यापीठाला एकूण १० कोटी रुपयांचा महसूल मिळतो. यापैकी शेतकरी, महाबीज व केंद्रिय कृषि केंद्रे यामधून १०५० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. पशु संवर्धन फार्म विद्यापीठ स्तरावर आहेत. विविध प्रकारचे खाद्य प्रदार्थ जसे, पनीर, मिठाई वगैरे बनविली जाते. त्यामधून १७ ते १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे हॉर्टिकल्चरच्या माध्यमातून नर्सरी तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये आंबा, संत्री, चिकू वगैरे रोपे बनविली जातात व त्याच्या विक्रीतून ६० लक्ष रुपये दरवर्षी विद्यापीठाला मिळतात. शैक्षणिक शुल्क ३५६ लक्ष रुपये होते व इतर उत्पन्नामधून १.५० लक्ष रुपये प्राप्त होतात. अशा प्रकारे १० कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न मिळते. त्याबाबत प्रपत्र क्र.४ मधील सविस्तर जमेचे विवरणपत्र ५ व सविस्तर खर्चाचे विवरणपत्र ६ मध्ये नमूद केली आहे. २००८-०९ चे लेखा परिक्षण पूर्ण होवून अहवाल प्राप्त आहे व २००९-१० चे लेखा परिक्षण चालू आहे.

सन २००८-२००९ पर्यंतचे लेखा परिक्षण पूर्ण झाले आहे. अद्याप सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झालेले नाही. याबाबत शासनाने लक्ष पुरविणे अपेक्षित आहे तथापि, शासनाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे लेखा परिक्षणाची कामे प्रलंबित रहात आहेत असे दिसून आले आहे.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी पत्र क्र.२०००/आर. बी./डेस्क-लँड-१/१७५, दिनांक २९.३.२००० नुसार मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ३० एकर जमिन विनामूल्य जवाहर नवोदय विद्यालयाच्या स्थापनेसाठी देणे बाबत विनंती केली होती. सदर मागणीच्या अनुषंगाने हा विषय दि.१.४.२००० रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेच्या सभेत विचारार्थ सादर करण्यात आला होता. कार्यकारी परिषदेने ठराव क्र.१८/२००० नुसार मान्यता दिली. उक्त ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठ पत्र क्र.अेअे-२/क्यू-४२८, दि.६.९.२००१ नुसार सविस्तर प्रस्ताव शासनकाडे मंजूरीस्तव सादर करण्यात आलेला होता. शासनाने शासन निर्णय क्र.मकृवि-२६०१/सीआर-१८२/१९-अे, दि.२५.१.२००१ नुसार मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे बसला (खुर्द), ता. जि. परभणी येथील स.न.८०,८१ व ८२ मधील ३० एकर जमिन जवाहर नवोदय विद्यायाच्या स्थापनेसाठी देणे बाबत विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. उपरोक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने उक्त जमिन हस्तांतरणासाठी विद्यापीठाच्या वतीने डॉ. के.आर. मिटकरी, जेष्ठ शास्त्रज्ञ, संकरीत गो-पैदास प्रकल्प, मकृवि, परभणी यांना प्राधिकृत केले. तर जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय अधिकारी, परभणी यांना प्राधिकृत केले. सदर जमिन दि.५.८.२००२ रोजी उपविभगीय अधिकारी, परभणी यांनी विद्यापीठाकडून ताब्यात घेतली. मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी पत्र दि.५.४.२००४ नुसार उपविभागीय अधिकारी यांना मराठवाडा कृषि विद्यापीठाची ताब्यात घेतलेली ३० एकर जमिन जवाहर नवोदय विद्यालयास हस्तांतरीत करण्याच्या सूचना केल्या व त्यानुसार कार्यवाही झाली आहे. सद्या विद्यापीठातील विविध संशोधन केंद्रात संशोधनाचे कार्य सतत चालू असून त्याशिवाय भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी खालील चार प्रकल्प मंजुर केले आहेत. अंबाजोगाई येथे सिताफळ संशोधन केंद्र प्रकल्प सन २०१० मध्ये मंजूर केला असून त्यामध्ये सिताफळाच्या नवीन वाणाची निर्मिती करणे व उत्पादनवाढीबाबत व सिताफळ प्रक्रियेबाबतच्या संशोधनाचे कार्य हाती घेतले आहे. कृषि क्षेत्रात पशु शक्तीचा वापर कार्यक्षमपणे कसा करता येईल याबाबतचा कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय परभणी येथे प्रकल्प मंजुर झाला असून (२०१०) त्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रासाठी असल्यामुळे त्यातील शिफारशींचा उपयोग संबंध महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी होणार आहे. बदलत्या हवामानाचा पिकावर होणारा अनिष्ट परिणाम व त्यानुरुप शेतकऱ्यास उपयुक्त बदल करण्याबाबतचा संशोधन प्रकल्प परभणी येथील कोरडवाहू संशोधन केंद्रास मंजुर झाला असून त्याबाबतचे संशोधन कार्य प्रगतीपथावर आहे. बदनापूर येथे तुर या डाळवर्गीय पिकात संकरीकरण करुन जास्त उत्पादन व किडींस प्रतिकारक संकरीत वाण तयार करण्यासाठी संशोधन प्रकल्प मंजुर झालेला आहे व

त्याबाबतचे संशोधन कार्य प्रभावीपणे चालू आहे. कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर येथे जैवतंत्रज्ञानाच्या साह्याने किड व रोग प्रतिकारक व अधिक उत्पादन क्षमता असलेल्या वाणांची निर्मिती करण्याच्या दृष्टीने मूलभूत संशोधन कार्य विद्यापीठाने हाती घेतले आहे. वरील सर्व संशोधन प्रकल्पाच्या निष्कर्षातून येणाऱ्या शिफारशी भविष्यकाळात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना निश्चित उपयुक्त ठरतील यात शंका नाही.

मराठवाडा कृषि विद्यापीठात सद्य:स्थितीत परभणी मुख्यालयी टिश्यू कल्चर (उती संवर्धन) ची एक प्रयोगशाळा कार्यरत असून तेथे शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे उच्च दर्जाची केळीची रोपे तयार केली जातात. साधारणपणे दरवर्षी या प्रयोगशाळेतून ३ लाख रोपाची विक्री केली जात आहे. याशिवाय शासनाने केळी संशोधन केंद्र, नांदेड व मोसंबी संशोधन केंद्र, बदनापूर येथे प्रत्येकी एक उती संवर्धन प्रयोगशाळा मंजुर केली असून त्या दोन्ही केंद्रावर भविष्यकाळात मोठ्या प्रमाणात केळी, मोसंबी व इतर पिकांची रोपे निर्मिती केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार रोपे मिळतील व या विक्रीतून विद्यापीठाच्या महसुली उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे एका प्रयोगशाळेसाठी अंदाजे रु. ४ कोटी खर्च येतो. दरवर्षी विद्यापीठास रु. ३० ते ३४ लक्ष उत्पन्न यापासून मिळते. कृषि विद्यापीठाअंतर्गत बहुतांशी क्षेत्राचा उपयोग शिक्षण, संशोधन व शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी होत असून राहिलेल्या क्षेत्रावर बिजोत्पादन घेतले जात आहे. या बिजोत्पादनातून मिळणारे महसूली उत्पन्न सतत वाढत आहे. देशपातळीवर भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने सन २०१० मध्ये बीज परिभ्रमण कोषवृध्दीसाठी या विद्यापीठास पुरस्कृत केलेले आहे. पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय संशोधनासंबंधी महाराष्ट्रात पशु वैद्यकिय विद्यापीठ, नागपूर हे कार्यरत असून याशिवाय मराठवाडा कृषि विद्यापीठात मराठवाडा मुळस्थान असलेल्या देवणी या गाईचा संकर होलस्टेन फ्रीझीयन या विदेशी जातीशी करुन त्यापासून तयार झालेल्या होलदेव या संकरीत गायी मराठवाड्याच्या वातावरणात उत्कृष्ठ प्रतीसाद देत असल्यामुळे संयुक्त कृषि संशोधन परिषदेने, होलदेव या संकरित जातीची मराठवाड्यासाठी शिफारस २०११ मध्ये केली आहे. होलदेव या संकरित गायीचा विस्तार शेतकऱ्याकडे करण्यासाठीची योजना पुढील काळात विद्यापीठ कार्यान्वित करत आहे. या शिवाय उस्मानाबादी शेळी संगोपनाबाबत संशोधन करुन शेतकऱ्यांना उपयुक्त शिफारशी विद्यापीठाने दिलेल्या आहेत. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. फळ संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे केशर आंबा गुणवत्ता केंद्र स्थापन करण्यात बाबत इंन्डो इस्त्राईल प्रकल्प समन्वयातुन भारत सरकारने मान्यता दिलेली असून त्याबाबत संबंधीतांनी या केंद्रास प्राथमिक भेट दिलेली आहे. या गुणवत्ता केंद्राद्वारे भविष्यकाळात परदेशातील आंबा निर्यातीमधील तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना मिळून त्याप्रमाणे निर्यातक्षम उत्पादन शेतकरी करतील. या केंद्रासाठी ७ कोटी ४४ लक्ष अनुदान प्राप्त झालेले आहे.

- शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ६ जून, २००८ अन्वये शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षातून मुक्त केलेला व अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात आली असून सदरचा निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेर खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार आधीच्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे.
- माहे मार्च, ३१ पर्यंत वाटप झालेल्या निधीचे धनादेश तीन महिन्यांपर्यंत वठविले जातात. या सर्व खर्चाचा तपशील आहरण व संवितरण अधिकारी मागवितात अशा खर्चाची विवरणपत्रे प्राप्त होण्यापूर्वी विद्यापीठाच्या पूर्व लेखा परीक्षण पथकाकडून तपासली जातात. वार्षिक योजना व योजनेत्तर खर्चाचे लेखे राज्य शासनाच्या स्थानिक निधी लेखापरीक्षकांमार्फत परीक्षण करुन घेतले जातात. व त्यानंतर हे लेखे विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेसमोर सादर केले जातात. स्थानिक निधी लेखापरीक्षकांकडून हे लेखे लवकर तपासून मिळत नाहीत. त्यामुळे विद्यापीठांचे लेखे सादर करण्यास विलंब होतो. कार्यकारी परिषदेच्या मान्यतेनंतर असे लेखे छपाई करुन घेण्यासाठी निविदा मागविल्या जातात. त्यामुळे लेख्यांची छपाई करण्यास पाच ते सहा महिन्यांचा कालावधी लागतो. सर्व कृषि विद्यापीठांना वार्षिक अहवाल व लेखापरीक्षा अहवाल सादर करण्यास शासनाच्या दिनांक १४ डिसेंबर, २०११ च्या पत्रान्वये सूचना संबधिताना दिल्या आहेत.

मराठवाडा कृषि विद्यापीठास समितीने दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या साक्षीमध्ये अपूर्ण राहिलेल्या मुद्द्यांच्या संदर्भात दिनांक ११ सप्टेंबर, २०१२ रोजी विभागीय सचिववांची साक्ष घेण्यात आली.

सदरहू साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीला पुढील प्रमाणे माहिती दिली कृषि विद्यापीठास विविध माध्यमातून मिळणारे अनुदान व होणारा खर्च किती आहे? त्यामध्ये विद्यापीठाचे उत्पन्न, उत्पन्नाच्या बाबी, बाबनिहाय खर्च या संदर्भातील मागील तीन वर्षाची माहिती द्यावी असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, सन २००६-२००७ मध्ये एकंदर महसूल ९.१४ कोटी रुपये होता. सन २००७-२००८ मध्ये ८.६२ कोटी रुपये, सन २००८-२००९ मध्ये ८.८८ कोटी रुपये, सन २००९-२०१० मध्ये १०.६१ कोटी रुपये, सन २०१०-२०११ मध्ये १०.८४ कोटी रुपये आणि फेब्रुवारी अखेरपर्यंत ८.२५ कोटी रुपये, महसूल मिळाला होता. याबाबतची आकडेवारी प्रपत्र क्र.४ मधील विवरणपत्र क्रमांक ५ मध्ये दिलेली आहे. त्यासंदर्भात समितीने अशीही विचारणा केली की, कृषि विद्यापीठास एकूण मिळणारे अनुदान किती आणि एकूण किती खर्च झाला ?त्याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, नॉन प्लॅन आणि प्लॅन अशा स्वरुपात कृषि

विद्यापीठास रक्कम मिळत असते. सन २००८ मध्ये ६६ कोटी ६२ लाख ८९ हजार रुपये अनुदान मिळाले होते त्यापैकी जवळपास ६६ कोटी रुपये खर्च झाले आहेत. सन २००९-२०१० मध्ये ८४ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले होते व त्यापैकी ८१ कोटी रुपये खर्च झाले. सन २०१०-२०११ मध्ये १२१.५९ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले व त्यापैकी ११६ कोटी रुपये नॉन प्लॅनसाठी खर्च झालेला आहे. सन २००८-२००९ मध्ये १७.१२ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले होते त्यापैकी १४.४१ कोटी रुपये खर्च झालेला आहे. राहिलेले अनुदान पुढील वर्षी खर्च करण्यात येते. पुढील वर्ष १६.४० कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले होते. या वर्षी २.५६ कोटी रुपये खर्च झाले. सन २०१०-२०११ मध्ये २१.१९ कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले होते त्यापैकी २१.८८ कोटी रुपये खर्च झाले. ही गेल्या तीन वर्षातील आकडेवारी आहे. प्रपत्र क्र.४ मधील विवरण पत्र क्रमांक १ व विवरण पत्र क्रमांक २ मध्ये नॉन प्लॅन आणि प्लॅनबाबतची माहिती दिलेली आहे.

सन २००७ ते सन २०१०-२०११ मध्ये योजना (PLAN) अंतर्गत प्राप्त अनुदानापेक्षा अनुक्रमे रु.५ कोटी ५४ लाख ७८ हजार, ४ कोटी १६ लाख ४० हजार व ६९ लाख ७३ हजार इतका जास्त खर्च झाला आहे. सदर खर्च अखर्चित रक्कमेमधून व महसूलामधून केला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. असा खर्च करता येतो का? तसेच असा खर्च करण्यास शासनाची मान्यता घेण्यात आली होती का? असे समितीने प्रश्न विचारला असता विभागीय सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, अशा प्रकारची अडचण महानगरपालिका, नगरपालिका यांना नेहमी येत होती म्हणून शासनाने जून २००८ मध्ये यावर विचार करुन शासन निर्णय निर्गमित केला आहे. सन २००८-२००९ पासून मार्चअखेर मिळणारी रक्कम ३१ मार्च पर्यंत खर्च केली नाही तर ती पुढील वर्षी जमा दाखवून खर्च करता येतो, परंतु यासाठी वित्त विभागाची विशेष मान्यता घेणे आवश्यक आहे. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात मिळणारी रक्कम खर्च करता येत नाही अशा प्रकारच्या तक्रारी अनेक संस्थांनी केल्या होत्या म्हणून शासनाने वरीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. नॉन प्लॅनसाठीच्या रक्कमेमध्ये कर्मचाऱ्यांचा पगार इत्यादी बाबी येतात त्यामुळे ती रक्कम खर्च करण्याचे कारण नाही. ती रक्कम कॅपिटल एक्सपिन्डेचर नसल्यामुळे ती रक्कम अखर्चित राहते. त्यासंदर्भात समितीने अशी विचारना केली की, सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात जास्तीची रक्कम कशी खर्च केली? त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात १७.१२ कोटी रुपये अनुदान मिळाले होते, त्यापैकी १४.४१ कोटी रुपये खर्च झाले आहे. तेव्हा २.७० कोटी रुपयांची बचत झाली असल्यामुळे ती रक्कम पुढील वर्षी वापरण्याची मुभा होती. महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न यामध्ये दोन कोटी रुपयांची तफावत आहे. यात काही रक्कम महसुली खर्चामधील अतिरिक्त खर्च झालेली आहे. विद्यापीठास वेगवेगळया प्रकारचे अनुदान प्राप्त होते. आयसीआरकडूनही अनुदान मिळत असते. विद्यापीठाला महसुली उत्पन्नाशिवाय दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे जे अनुदान मिळाले आहे तेच खर्च केलेले आहे. ती रक्कम सानुग्रह

अनुदान म्हणून मिळाली होती. या रकमेसंदर्भात युटिलायझेशन सर्टिफिकेट सादर करणे बंधनकारक असते. इतर कुठल्याही बाबींवर रक्कम खर्च केल्यावर युटिलायझेशन सर्टिफिकेट देता येत नाही.

कृषि विद्यापीठाचे उत्पन्नाचे मार्ग वाढविण्याबाबत कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, ९.१४ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता, त्यापैकी ८.६२ कोटी रुपये खर्च झाले. त्यानंतर ९.८८ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता, त्यापैकी १०.६१ कोटी रुपये खर्च झाले. १४ टक्के, ७ टक्के, २ टक्के, ३ टक्के अशा प्रमाणात उत्पन्नात वाढ झाली आहे. ही वाढ पुरेशी नाही, विद्यमान माननीय कृषि मंत्री महोदयांचा असा मानस आहे की, या विद्यापीठातील काही जमिनी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपसाठी देण्यात याव्यात. विद्यापीठामार्फत जी कामे चालविली जातात त्या कामांसाठी येणाऱ्यां खर्चाची रक्कम सार्वजनिक संस्थांनी गुंतवावी आणि त्यांतून विद्यापीठाला उत्पन्न मिळावे, असा त्यामागील उद्देश आहे. महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषदेचाही अशा स्वरुपाचा प्रस्ताव आहे. विद्यापीठाच्या जमिनीवर खाजगी उद्योजक प्रकल्प उभारण्यासाठी तयार असतील तर त्यांनी त्यात रक्कम गुंतवून त्यातून येणारे उत्पन्न विद्यापीठाला मिळाले पाहिजे. अशा प्रकारचे उत्पन्न मिळाले तर त्यातून विद्यार्थ्यांना नवीन बाबी शिकण्यासाठी तसेच नवीन तंत्रज्ञान देखील उपलब्ध करुन घेता येऊ शकेल. त्याबाबत खाजगी प्रकल्प उभे करण्यासाठी विद्यापीठाच्या जमिनी दिल्या तर त्यातून वेगवेगळ्या समस्या निर्माण होतील असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवानी विदित केले की, खाजगी उद्योजकांना जमिनी न देता तेथील स्थानिक शेतकऱ्यांना किंवा स्थानिक लोकांच्या संस्थांना सीड प्लॉटसाठी उपलब्ध करुन दिल्या तर त्याचा फायदा स्थानिक लोकांना होईल. या जमिनी शेतकऱ्यांकडून नाममात्र दराने घेतल्या असल्याने त्यावर प्रकल्प उभारण्यासाठी कोठल्याही उद्योजकाला या जमिनी देण्यात येऊ नयेत. अशी माझी सूचना आहे. खाजगी सार्वजनिक भागिदारांना प्रकल्प उभारण्यासाठी जमिन द्यावयाची असल्यास त्यासाठी करारनामा करण्यात येतो, त्यामुळे जमिन परत येणार नाही असे नाही. शेतकऱ्यांना एकत्रित येऊन इंडियन कंपनीज ॲक्टच्या सेक्शन २५ व चॅप्टर IX-A अन्वये कंपनीची स्थापना करता येते, परंतु यासबंधीची काही मार्गदर्शक तत्वे आहेत. समितीने केलेली सूचना अतिशय चांगली आहे. यासाठी त्या भागातील शेतकरी अणि शेतकऱ्यांच्या संस्थांना जमिनी देण्यात येतील. त्यांना यामध्ये गुंतवणुक करावी लागणार आहे. इस्त्राईल सारख्या देशात हाय डेन्सिटी प्लॉन्टेशनचा प्रयोग करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या सूचनेवरुन करारनामे केलेले आहेत. ४ पैकी ३ प्रोजेक्टचे काम चालू आहे. अशा संस्थांकडून विद्यापीठाच्या जमिनी परत मिळणार नाही असे होणार नाही, यासाठी दहा ते पंधरा वर्षाचा कालावधी आपण घालून देणार आहोत त्यामुळे त्या कालावधीनंतर ती संपूर्ण मालमत्ता विद्यापीठाकडे परत येणारच आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मराठवाडा कृषि विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या ७ शाखांचे ११ घटक महाविद्यालये आणि ३२ संलग्न

महाविद्यालये आहेत. त्याबाबत समितीने सूचना केली की, या महाविद्यालयांना कृषि विषयक संशोधनासाठी लगतच्या काळात विद्यापीठाच्या जमिनी लागणार आहेत. विद्यापीठाच्या जमिनी पी.पी.पी. अंतर्गत स्पर्धात्मकरित्या खाजगी लोकांना दिल्या जाणार आहेत आणि विद्यापीठाचे कुलगुरु सांगत आहेत की, विद्यापीठाच्या जमिनी कृषि विषयक संशोधनासाठी विद्यापीठ स्वतःच वापरणार आहे. विद्यापीठाच्या जमिनीचा नेमका कसा उपयोग केला जाणार आहे हे स्पष्ट करण्यात यावे असे समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विद्यापीठाला कृषि संशोधनासाठी जमिन लागणार आहे. मराठवाडा कृषि विद्यापीठाचे १७ संशोधन केंद्र आहेत. शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमध्ये वेगवेगळे एक्स्पर्ट घेतले आहेत. विद्यापीठाची जमिन ही विद्यापीठाचीच राहणार आहे.

त्यावर समितीने अशी ही सूचना केली की, विद्यापीठाची जमिन खाजगी तत्त्वावर किंवा जॉईंट व्हेंचर तत्त्वावर देऊ नये. कारण राज्यात या तत्त्वांचा अनुभव फारसा चांगला नाही. अनेक विद्यापीठांच्या जमिनींवर उद्योगपतींचे लक्ष आहे. विद्यापीठाचा उद्देश चांगला असला तरी खाजगी लोक विद्यापीठाचा मूळ उद्देश बाजूला ठेवून स्वतःचा उद्देश साध्य करतील. तसेच समितीने अशीही विचारणा केली की, पी.पी.पी.तत्त्वावर करार केल्यानंतर विद्यापीठाच्या जागेची मालकी खाजगी लोकांना हस्तांतरित करणार आहात काय ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केली की, विद्यापीठाच्या जमिनीची मालकी विद्यापीठाकडेच राहणार आहे. तसेच विभागीय सचिवांनी त्यासंदर्भात प्रतिपादन केले की, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपमध्ये जागेची मालकी शेवटपर्यंत शासनाचीच राहते. १९७०-७२ पासून विद्यापीठाच्या ताब्यात मोठ्या प्रमाणावर जमिनी आहेत. आज इतर देशातील विद्यापीठे स्वयंपूर्ण झालेली आहेत. परंतु आपल्या देशातील कोणत्याही राज्यातील विद्यापीठे स्वयंपूर्ण होऊ शकली नाहीत. त्याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक कारण असे आहे की, इतर देशात अनेक खाजगी संस्था विद्यापीठांबरोबर कोलॅबरेशन करुन नवीन तंत्रज्ञान आणि नवीन उत्पन्नाची साधने शोधतात. अशा प्रकारचे अनेक प्रयोग त्या त्या देशांत झालेले आहेत. या माध्यमातून त्या देशांतील विद्यापीठे स्वयंपूर्ण झालेली आहेत. आपल्या राज्यात सुध्दा मोठ्या प्रमाणावर जमिनी ताब्यात घेऊन व त्या जमिनीवर जास्तीत जास्त उत्पन्न घेऊन विद्यापीठे स्वयंपूर्ण व्हावीत असा उद्देश होता. आपण विद्यापीठाचा ताळेबंद पाहिला तर तो १५०-२०० कोटी रुपयांचा आहे. शासनाकडून २०० कोटी रुपयांचे अनुदान दिल्यानंतर विद्यापीठाचा नेट रेव्हेन्यू केवळ २-३ कोटी रुपये आहे. एका बाजूला शासनाकडून विद्यापीठावर २०० कोटी रुपये खर्च केला जातो आणि दुसऱ्या बाजूला विद्यापीठाचे उत्पन्न केवळ २-३ कोटी रुपये आहे. या सर्व बाबींचा विचार करुनच विभागाचे मा.मंत्री या विषयी विचार विनिमय करीत असून या संदर्भातील अंतिम निर्णय मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतरच होणार आहे. विद्यापीठावर प्रत्येक बाबतीत बंधन आणता कामा नये. शासनाने दिलेल्या अनुदानाच्या तुलनेत विद्यापीठाला अमुक इतकेच उत्पन्न मिळाले याचा आढावा घेता कामा नये.

त्यावर समितीने सूचना केले की, याबाबत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे समितीचे मत विभागास कळविण्यात यावे. परदेशातील कायद्यांमध्ये आणि आपल्या देशातील कायद्यांमध्ये फरक आहे. आपल्याकडे विद्यापीठाचा स्टाफ आणि जमिन भरपूर आहे. शिवाय विद्यापीठाला शासनाचे संरक्षण सुध्दा आहे. विद्यापीठासाठी एखादी चांगली योजना सुरु केली तर विद्यापीठाच्या इन्फ्रास्ट्रक्चर आणि जमिनीतून महसूल मिळून विद्यापीठाचे उत्पन्न वाढू शकेल. अशी समितीने सूचना केली असता विभागीय सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, विद्यापीठ जेव्हा शासनाकडे कोणत्याही प्रकारची मागणी करते तेव्हा विद्यापीठाला विचारले जात की, विद्यापीठाकडे असलेल्या ३ हजार हेक्टर जमिनीतून किती उत्पन्न मिळते ? तथापि, राज्यातील सर्वसामान्य विद्यापीठे किंवा तांत्रिक विद्यापीठांना विचारले जात नाही. कृषि विद्यापीठाने पैसे मागितले तर विद्यापीठाला दिलेल्या जमिनीतून अपेक्षित उत्पन्नच मिळाले नाही तर पैसे कसे देणार, असा प्रश्न उपस्थित केला जातो. कृषि विद्यापीठाची वार्षिक योजना १०-१२ कोटी रुपयांपेक्षा जास्त नाही. विद्यापीठातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पगारावर १५०-२०० कोटी रुपये खर्च होत असतील तर त्यांना संशोधनासाठी सुध्दा १५०-२०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले पाहिजेत. त्यांना पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला तरच संशोधनाचे काम चांगल्याप्रकारे होऊ शकेल. त्यावर समितीने सहमती दर्शवून कृषि विद्यापीठाला संशोधनासाठी आवश्यक तेवढे पैसे उपलब्ध करुन द्यावे अशी सूचना केली.

कृषि विद्यापीठाने संशोधनाच्या माध्यमातून वेगवेगळ्या जातीची बियाणे तयार केली आहेत. विद्यापीठाने संशोधनासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन शिक्षण व संशोधनाचे काम केले आहे. तसेच दुसरी बाब अशी की, कृषि विद्यापीठाला संशोधनासाठी लागणारी प्रयोगशाळा खूप जुनी आहे. समितीची अपेक्षा अशी आहे की, ती प्रयोगशाळा अद्ययावत करणे आवश्यक आहे. कृषि विद्यापीठाला अत्याधुनिक व सोयीसुविधायुक्त प्रयोगशाळेसाठी पुरेसे अनुदान दिले तर संशोधनाच्या कामाला नवीन दिशा देणे शक्य होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. इस्त्रायलमध्ये एक किलो बियाण्यांमध्ये ६० क्विंटल कापसाचे उत्पादन होते आणि आपल्याकडे त्याच बियाण्यांमध्ये केवळ ७ क्विंटल कापूस पिकतो. इस्त्रायलमधील लोक बियाण्यांकडे जितक्या बारकाईने पाहतात तितक्या बारकाईने भारतातील लोक पाहत नाहीत किंवा काम करीत नाहीत. तसेच इस्त्रायलमध्ये विद्यापीठात संप पुकारला गेला तर कर्मचारी काळ्या फिती लावून कामावर येतात आणि शेतीकडे लक्ष देतात, परंतु भारतात तसे होत नाही. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर १५० कोटी रुपये खर्च केले जात असतील तर त्यांच्याकडून नवीन संशोधन का करुन घेतले जात नाही ? विद्यापीठाच्या आस्थापनेचा उपयोग उत्पन्न वाढीसाठी होत नसेल तर अर्थ नाही. या सर्व कारणांमुळेच विद्यापीठाच्या जमिनींवर खाजगी लोकांचा डोळा असतो. प्रत्येक वेळी पी.पी.पी. तत्त्वाचा अवलंब करण्याऐवजी विद्यापीठाने स्वतः सक्षम का होऊ नये ? या अनुषंगाने विद्यापीठाची जमिन खाजगी व्यक्तींना पी.पी.पी. तत्त्वावर देण्यास

व्यक्तीशः विरोध आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींने खुलासा करुन सांगितले की, आता महाराष्ट्रमध्ये हाय डेन्सिटी प्लांटेशन मोठ्या प्रमाणावर होत आहे. राज्यात हाय डेन्सिटी प्लांटेशनचा प्रयोग व्हावा म्हणून केंद्र सरकारने नॅशनल हॉल्टीकल्चर मिशन बरोबर करार केला आहे. त्यानुसार कोकण कृषि विद्यापीठात आंबा, अकोला कृषि विद्यापीठात संत्रा यांचे हाय डेन्सिटी प्लांटेशन होणार आहे. प्रत्येक ठिकाणी खाजगी लोकांबरोबर वेगवेगळे आणि टेक्नीकल कोलॅबरेशन करण्यात येणार आहे. टेक्नीकल कोलॅबरेशनसाठी विद्यापीठाच्या जमिनी वापण्यात येणार आहे. कृषि विद्यापीठ ही अत्युच्च दर्जाचे तंत्रज्ञान विकसित करणारी संस्था असून नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रात्यक्षिके आयोजित केली आहेत. त्यातून जे उत्पन्न मिळेल ते विद्यापीठाला मिळणार आहे. यामुळे एकंदरीत विद्यापीठाच्या अडचणी सोडविण्यास तसेच संशोधनाच्या कामास मदत होईल.

विद्यापीठाच्या जमिनी संदर्भात विद्यापीठाने संशोधन करुन कोणकोणते व किती वाण शोधले आहे, बिजोत्पादनात वाढ करण्याबाबत कोणकोणते प्रयत्न केले आहेत, विद्यापीठाने कोणकोणती अवजारे विकसित केली आहेत व त्यांचा वापर कसा उपयुक्त ठरणार आहे ? तसेच कृषि विद्यापीठाने मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांत जे संशोधन केलेले आहे ते त्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे काय ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींने सांगितले की, मराठवाड्यामध्ये ८६ टक्के जमिन कोरडवाहू व १४ टक्के जमिन ओलिताखालील आहे. मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत १२० वाणांचे संशोधन करण्यात आले असून, ६०० पेक्षा जास्त तंत्रज्ञान शिफारशी करण्यात आल्या आहेत. तसेच १८ प्रकारची शेती विषयक अवजारे विकसित करण्यात आली आहेत. मराठवाड्यात ३०-४० टक्के क्षेत्र सोयाबीन पिकाने व्यापलेले आहे. त्यामुळे सोयाबीन पिकाच्या नवीन जाती विकसीत केल्या आहेत. तसेच एमएईएस-८१ आणि एमएईएस-११२ या जातीचे बियाणे सुध्दा विकसित केले आहे. राज्य आणि देश पातळीवर तुरीच्या पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. मराठवाड्यामध्ये देखील तुरीच्या पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. बीएसएम ४३६ हे तुरीचे वाण प्रसिध्द आहे. या तुरीच्या वाणाला राज्य शासनाचे पारितोषिकही मिळालेले आहे. मूग, उडीद या डाळींचे वेगवेगळे वाण विकसित करण्यावर संशोधन चालू आहे. मराठवाड्यामध्ये शेतीखालील एकूण क्षेत्र किती आहे ? तेथे प्रामुख्याने कोणते पीक घेतले जाते ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, मराठवाड्याचे भौगोलिक क्षेत्र ६३ लाख हेक्टर असून खरीपाखालील क्षेत्र ४२ लाख हेक्टर आणि रब्बीखालील क्षेत्र २० लाख हेक्टर आहे. साधारणतः ५० ते ६० टक्के क्षेत्रामध्ये सोयाबीन आणि कापसाचे पीक घेतले जाते. रब्बीमध्ये हरभरा, ज्वारी ही पिके घेतली जातात. मराठवाडा कृषि विद्यापीठाने हरभऱ्यांचे आणि ज्वारीचे वाण विकसित केलेले आहेत. ज्वारीची मोती आणि ज्योती ही नवीन वाणे विकसित केलेली आहेत. तसेच समितीने अशीही विचारणा केली की, कोकणामध्ये आंबा, काजू, फणस, नारळ ही

फळपिके घेतली जातात. मराठवाड्याचे भौगोलिक क्षेत्र आणि हवामान विचारात घेता तेथे कोणती फळपिके घेता येण्यासारखी आहेत ? त्याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, मराठवाड्यात डाळिंब, बोर, सीताफळ तसेच पपई, पेरु, मोसंबी आणि केशर आंबा ही फळपिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. केशर आंब्याला परदेशातूनही मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. जालना, नांदेड, परभणी या भागात केळीच्या पिकाखालील क्षेत्र जास्त आहे. मराठवाड्यामध्ये विशिष्ट प्रकारची फळपिके घेणारे काही पॉकेटस् आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात मोसंबी पिकाखालील क्षेत्र मराठवाड्यामध्ये जास्त आहे. केशर आंब्याचे पिक इतर भागामध्ये घेतले जात असले तरी मराठवाड्यातील केशर आंब्याला जी चव आहे ती चव इतर भागात पिकणाऱ्यां केशर आंब्याला नाही. आता विदेशामध्ये हापूस आंब्याऐवजी केशर आंब्याला जास्त मागणी आहे. मराठवाड्यात पिकणाऱ्यां केशर आंब्याची चव विदेशी लोकांना अधिक आवडते. सीताफळाचे क्षेत्र वाढत आहे. डाळिंबासाठी अजून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळालेला नाही. डाळिंबावर रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे ही फळपिके घेण्याचे प्रमाण कमी आहे. सोलापूर, सांगोला या भागात डाळिंबाचे पीक घेतले जाते.

कृषि विद्यापीठातून कोणकोणती रोपे तयार केली जातात ? दरवर्षी किती रोपांची विक्री केली जाते ? जिल्हानिहाय विक्री केंद्रे आहेत काय ? गेल्या वर्षी किती रोपांची विक्री करण्यात आली ? रोपांची विक्री करण्यासाठी जिल्हानिहाय अथवा तालुकानिहाय विक्री केन्द्रे का सुरु करण्यात आली नाहीत ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मोसंबी आणि आंब्याची रोपे करण्यावर जास्त भर दिला जातो. जिल्हानिहाय विक्री केंद्रे नाहीत. अकोला येथे संशोधन केंद्र आहे. त्या ठिकाणी टिश्यु कल्चरची ३ लाख रोपे तयार केली जातात. अकोला येथील संशोधन केंद्रातून ३ लाख रोपे विकण्यात आली. रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबागासाठी रोपे तयार केली जातात. तीन प्रकारच्या नर्सरी आहेत. सर्वसाधारणपणे दरवर्षी १ कोटी रोपांची व्यवस्था करावी लागते. कृषि विभागाच्या १३४ नर्सरी असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये नर्सरी उपलब्ध आहे. १ हजार नर्सरी रजिस्टर झालेल्या आहेत. विद्यापीठाच्या नर्सरी मार्फत जवळपास २० लाख रोपे तयार केली जातात. ८० लाख रोपे राज्य शासनाच्या नर्सरी मार्फत तयार केली जातात. १ कोटी रोपे खाजगी नर्सरीमधून तयार केली जातात. रोजगार हमी योजनेअंतर्गत शासन स्वत: वाहतुकीचा खर्च सोसून शेतकऱ्यांना रोपे पुरविले जातात. जेथे विद्यापीठाची नर्सरी नाही तेथे कृषि विभागाची किंवा खाजगी नर्सरी असते. अन्य ठिकाणी तीन ते चार लाख रोपे कृषि विद्यापीठा मार्फत तयार केली जातात.

उस्मानाबाद आणि सोलापूर जिल्ह्याच्या बॉर्डरवर असलेल्या तुळजापूरमधील शेतकऱ्यांसाठी तसेच जळगाव जिल्ह्याच्या बॉर्डरवर असलेल्या वैजापूर येथील शेतकऱ्यांसाठी हे कृषि विद्यापीठ फार दूर अंतरावर आहे. म्हणून जिल्हानिहाय किंवा तालुकानिहाय विक्री केन्द्रे करण्यास कोणती हरकत नसावी अशी समितीने

सूचना केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नाही, परंतु जेथे संशोधन केन्द्रे आहेत त्याठिकाणी विक्री केन्द्रे सुरु करण्याचा प्रयत्न करता येईल.

मराठवाडा कृषि विद्यापीठाकडे मोठ्या प्रमाणात जमिन असून त्यापासून मिळणारे उत्पन्न अत्यंत कमी आहे. कृषि विद्यापीठामार्फत वेगवेगळया प्रकारची १२० वाणे तयार करण्यात आलेली आहेत. या विकसित केलेल्या वाणांचा शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे असे दिसत नाही. कृषि विद्यापीठातर्फे विकसित केलेल्या वाणांचा शेतकऱ्यांना फायदा झाला असता तर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या. केळीचे टिश्यु कल्चर बाजारात न मिळण्याची कारणे काय आहेत ? मुंबईमध्ये बाहेरच्या राज्यातील इलायची केळी येतात. आपल्या राज्यात तयार होणारी इलायची केळी मुंबईमध्ये विक्रीसाठी न येण्याची कारणे काय आहेत ? अवजारांच्या विक्रीतून कृषि विद्यापीठाला केवळ १ लाख ४१ हजार रुपये उत्पन्न प्राप्त झालेले आहे. कोकणामध्ये कृषि मेळावे घेतले जातात त्यावेळी एकेका दिवशी ५०-६० हजार रुपयाच्या अवजारांची विक्री होत असते.

सन २०१०-२०११ मध्ये देशांतर्गत डाळींचे उत्पादन ३० लाख मे.टन इतके होते. उत्पादकतेमध्ये १५ ते २० टक्के वाढ झालेली आहे. त्यासंदर्भात समितीने निदर्शनास आणून दिले की, उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये वाढ झालेली असूनही त्या प्रमाणात कृषि उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून येत नाही. त्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, नवीन बियाणांच्या संदर्भात विद्यापीठाद्वारे संशोधन केले जाते. दर वर्षी किती टक्के नवीन बियाणे वापरले जाते त्यावर पिकाची उत्पादकता अवलंबून असते. विद्यापीठामध्ये मागील ४ वर्षापासून ही योजना राबविण्याकरिता दर वर्षी ५० कोटी रुपये खर्च केले व शेतकऱ्यांना नवीन बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले. नवीन बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर तूर, सोयाबीन, कापूस इ. पिकांच्या उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून आले. सन २००९-१० मध्ये सोयाबीन पिकाचे तुलनेने कमी उत्पादन कमी झाले. कारण की, साधारणपणे ८३ टक्के क्षेत्रामध्ये कृषि उत्पादन घेतले जाते. यंदाच्या वर्षी राज्यामध्ये व देशामधील अनेक भागामध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे सर्वच उत्पादनामध्ये घट येणार आहे.

सन २००८-०९ व सन २००९-१० मध्ये दुष्काळी परिस्थिती होती तर सन २०१०-११ मध्ये सामान्य परिस्थिती हाती. सन २०११-१२ मध्ये राज्यातील जवळजवळ ७ ते ७.५ हजार गावांमध्ये पैसेवारी ५० पेक्षाही कमी आहे. दर वर्षी राज्यात साधारणपणे १५ ते २० टक्के गावे कोणत्या ना कोणत्या स्वरुपात दुष्काळग्रस्त असतात. यामुळे कृषि उत्पादनाची सरासरी काढली तर तो आकडा कमी झाल्याचा आपल्याला दिसून येते. राज्यात पाऊस चांगला झाल्यास उत्पादनामध्ये वाढ होते. राज्यातील बहुतांश शेतकरी उद्योगक्षम आहेत. काही ठिकाणी दुप्पट व तिप्पट उत्पन्न वाढल्याचे आपल्याला दिसून येईल. ठिबक सिंचनामुळे उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे आपल्याला दिसून येते. विद्यापीठाने शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबाबत मदत

केली पाहिजे. त्यांना ठिबक व तुषार सिंचनाबाबत माहिती दिली पाहिजे व सबसिडी देण्याबाबत सूचना देखील केली पाहिजे. असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत ३ गोष्टी प्रामुख्याने करण्याचे निश्चित करण्यात आले होते. १) विद्यापीठाने तयार केलेले वाण जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यत पोहचवणे २) शेतकऱ्यांनी विद्यापीठाला केलेल्या सूचनेप्रमाणे त्यांना प्रात्यक्षिक दाखविणे ३) नवीन अवजारे तयार करणे. या कामासाठी राज्यातील ४ कृषि विद्यापीठांना एकूण ७० कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार यंदा २० कोटी रुपये देण्यात आलेले आहे. यंदा बियाण्यांच्या निर्मितीचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. प्रत्येक ठिकाणी अवजारे निर्मितीसाठी युनिट तयार करण्याकरिता रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या पूर्वी बजेटमधील प्लान खर्च १० कोटी रुपयांपेक्षा अधिक केला जात नसे. मात्र यंदा बजेटमध्ये ५० कोटी रुपयांची रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. दर्जा वाढवण्याकरिता शासनाने जास्तीत जास्त निधी दिलेला आहे. मात्र त्यामध्ये अद्याप आपल्याला यश प्राप्त झालेले नाही. साधारणपणे कृषिप्रधान राज्यामध्ये जास्त रक्कम ही कृषि उत्पादन व संशोधनाकरिता उपलब्ध करुन दिली पाहिजे. यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होऊन समृध्दी निर्माण होऊ शकेल. राज्य शासनाच्या तुलनेत केंद्र शासनामार्फत मिळणारी मदत अधिक आहे. राज्य शासनाकडून १८०० कोटी रुपये व केंद्र शासनाकडून २००० कोटी रुपये मदत मिळत आहे. बियाणे निर्मितीचे कार्य केव्हा पासून सुरु आहे ? विद्यापीठाने उद्दीष्ट कमी का ठेवले ? असे समितीने प्रश्न विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, लेखी माहिती मधील पृ.क्र २ वर दिलेल्या आकडेवारी विद्यापीठाने उत्पादन कमी ठेवले असले तरी देखील प्रत्यक्षात अधिक उत्पादन केलेले आहे.
सन २०१०-२०११ मध्ये उद्दीष्ट १२९३ क्विं. ठेवले असून प्रत्यक्ष उत्पादन ३४८९ क्विं. एवढे केलेले आहे. खरे तर उद्दीष्ट कमी ठेवण्याचे काहीच कारण नव्हते. मागील वर्षीपेक्षा जास्त उद्दीष्ट निश्चित करणे अपेक्षित आहे.

अवजारांच्या विक्रीच्या माध्यमातून विद्यापीठाला किती उत्पन्न मिळालेले आहे? अवजारे निर्माण करण्यापूर्वी त्यांचे पेटंट घेण्यात आले होते काय ? तसेच संकरित बियाण्यांचे पेटंट घेतले होते काय ? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विळा व खुरपे, हात कोळपे, धसकट गोळा करण्याचे औजार, भुईमूग शेंगा तोडणी चौकट, खत कोळपे, बैलचलित हळद काढणी यंत्र, बैलाच्या शक्तीवर चालणारे फवारणी यंत्र, बी व खत पेरणी यंत्र, भुईमूग शेंगा फोडणी यंत्र, रबी पेरणी यंत्र इ. अवजारे कृषि विद्यापीठाने तयार केलेली आहेत. नवीन प्रोजेक्टमध्ये ही अवजारे तयार केली जाणार आहेत. या अवजारांची निर्मिती मोठया प्रमाणात करण्याबाबतचा प्रस्ताव या पूर्वी हाच प्रश्न राज्य शासनाने कृषि विद्यापीठाकडे मांडला होता. अवजारे कायमस्वरुपी घेण्यात आलेले नाहीत.

आज मजुरांच्या उपलब्धतेमध्ये घट झालेली आहे. शेतकऱ्यांना मजूर मिळत नाहीत. तण काढण्यासाठी, सोयाबीन व ज्वारी काढण्यासाठी कोणती अवजारे निर्माण करण्यात आली आहेत ? काही खाजगी कंपन्या तण काढण्यासाठी अवजारे निर्मित करतात. याकरिता ४० हजार रुपये रक्कम निश्चित करण्याची सूचना कृषि विभागाने केलेली आहे. एका व्यक्तीला चालवता येईल अशा प्रकारची तण काढणाऱ्या यंत्राची निर्मिती मराठवाडा कृषि विद्यापीठाने केली आहे काय ? अशा अवजारांची निर्मिती मोठया प्रमाणात केल्यास शेतकऱ्यांचा फायदा होऊ शकेल. तसेच पीपीपीच्या माध्यमातून अवजारांची निर्मिती केली जाणार आहे काय ? केवळ कृषि अधिकारी व कृषि सहाय्यक निर्माण करण्यासाठी विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली आहे काय? असा समितीने प्रश्न केला असता विभागीय प्रतिनिधींकडून समितीस समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

महाविद्यालयाकडे केवळ पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे ते मोठया प्रमाणात अवजारे विकसित करु शकत नाही यासंदर्भात समितीने असमाधान व्यक्त करुन असेही सूचित केले की, सदरहू विद्यापीठाची निर्मिती होऊन आता जवळजवळ ४० ते ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र या कृषि महाविद्यालयाचे काम अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढया पुरतेच मर्यादित राहिले आहे. विशेषत: शेतकी विद्यापीठाकडून फार मोठया अपेक्षा आहेत. मात्र ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही. विद्यापीठाला मार्केटींगची जोड नसणे ही यामधील एक प्रमुख अडचण आहे. व्यावसायिक दृष्टीने विद्यापीठातील वातावरण पोषक नाही. कृषि विभागाने याकडे लक्ष देऊन पीपीपी अंतर्गत योजना राबवून प्रसार व प्रचार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे काम केवळ विद्यापीठावर सोडले तर काहीच होऊ शकणार नाही. या संदर्भात धोरणात्मक निर्णय शासनामार्फत घेतला जाणार आहे काय ? विद्यापीठाला भेट दिल्यानंतर समितीच्या असे लक्षात आले की, त्यांनी आतापर्यंत चांगल्या प्रकारच्या अवजारांची निर्मिती केली असून नवनवीन वाणांची देखील निर्मिती केलेली आहे. मात्र त्यांना मार्केटींगचे तंत्र अवगत नसल्यामुळे त्यांना प्रगती करता आलेली नाही व ते शेतकऱ्यांपर्यत पोहचू शकले नाही. या संदर्भात शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेतला जाईल काय ? याबाबत विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, पीपीपी अंतर्गत प्रोजेक्ट तयार केल्याशिवाय हे शक्य होणार नाही. नवीन वाण तयार केल्यानंतर त्याचे मार्केटींग करण्यासाठी कार्यपद्धती तयार करणे देखील आवश्यक आहे. मात्र त्या दिशेने सध्या विद्यापीठाची वाटचाल सुरु असल्याचे दिसून येत नाही. नवीन अवजारांची निर्मिती केलेली आहे, मात्र त्यांचे अद्याप पेटंट घेतलेले नाही. अकोला विद्यापीठामध्ये तयार केलेली डाळीचे काही उद्योजक मार्केटींग करतात. याकरिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत निधी मंजूर केलेला आहे. उद्योजकांनी वर्कशॉप भाडे तत्वावर वापरुन स्वत:च्या निधीचा वापर करुन अवजारे निर्माण करावीत व त्यांची बाजारामध्ये विक्री करावी. आतापर्यंत विद्यापीठाने ज्या ज्या ठिकाणी विक्री करण्याची व्यवस्था केली तेथे काही स्वरुपाचे वाद निर्माण झाले. कोकण विद्यापीठाने तांदळाची एक जात तयार केली होती. त्याचे मार्केटींग करण्यासाठी एका खाजगी

कंपनीशी करार केला होता. मात्र या नंतर त्या कुलगुरुंना चौकशी समितीला सामोरे जावे लागले. मार्केटींग करिता पीपीपीद्वारे प्रयत्न करणे हे सध्या वैचारिक पातळीवर आहे. सध्या वेगवेगळे मतप्रवाह अस्तित्वात आहेत. काहींचे म्हणणे आहे की, हे काम पब्लिक कंपनीने करावे तर काहींचे मत आहे की, मार्केटींग व उत्पादनाचे काम पीपीपीद्वारे केल्यास फायदेशीर ठरू शकते. महाबीजने काही वाण विकसित केले होते. शासनाच्या मते पीपीपीद्वारे या वाणांचा अधिक चांगल्या प्रकारे संशोधन करता येईल.

यासंदर्भात खाजगी भागीदारी संस्थांना जमिन देण्याबाबत समितीचा विरोध आहे. एखाद्या यांत्रिक अवजाराचे पेटंट घेऊन त्याचे मार्केटिंग करणे, त्यासाठी मार्केटिंग ऑफिसर नेमणे या सर्व बाबी विद्यापीठानेच करणे आवश्यक आहेत. तसेच विद्यापीठाच्या जमिनी खाजगी व्यावसायिकांना द्यायला पाहिजे असे समितीचे मत नाही. परंतु विद्यापीठात एखाद्या बाबीचे संशोधन झाल्यावर त्याचे मार्केटिंग होणेही तेवढेच महत्वाचे आहे. विद्यापीठातून अनेक चांगले विद्यार्थी तयार होतात आणि ते विद्यार्थी खाजगी कंपनीत नोकरी करतात, त्यामुळे त्या कंपन्यांची चांगली भरभराट होते. आपल्या विद्यापीठातून जे विद्यार्थी पी.एच.डी करतात त्यांच्याच सहकार्याने एखादा प्रकल्प राबविला तर त्यांचे टॅलेंट आपल्याला चांगल्या रितीने वापरता येईल. विद्यापीठाचा जो मूळ उद्देश आहे तो सफल झाला पाहिजे, परंतु तो सफल होत नाही असे समितीच्या निदर्शनास येत आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठ राबवत असलेली **"विद्यापीठ आपल्या दारी"** या संकल्पनेची समितीस विस्तृत माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, आयसीआर ही संकल्पना आहे. पाठ्यक्रमाचा भाग म्हणून आयसीआर ही संकल्पना तयार केलेली असल्यामुळे ती विद्यापीठावर बंधनकारक आहे. मराठवाडा विद्यापीठाने एक मोहीम आखली आहे. विद्यापीठात वेगवेगळे प्रोजेक्ट तयार करण्यासाठी वेगवेगळे शास्त्रज्ञ उपलब्ध आहेत. रब्बी हंगामाच्या वेळी आणि खरीब हंगामाच्या वेळी शास्त्रज्ञ एक महिन्याचा कार्यक्रम राबवित असतात. यासाठी प्रत्येक तालूक्यातून दोन तीन गावे निवडली जातात. त्या गावांना भेटी देऊन तेथील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची मोहीम हाती घेतलेली आहे. शेतातील पिकांवर किडीचा होणारा प्रादुर्भाव, कोणत्या पिकांना कोणती खते द्यावती, अशा अडी-अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने तसेच शेतकऱ्यांचे समाधान करण्यासाठी हे शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन शेतकऱ्यांना सहकार्य करीत असतात.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये बैठक घेतल्या आहेत. मागील वर्षी दीड लाख शेतकऱ्यांना शास्त्रज्ञ भेटले होते. तेथे मेळावे घेऊन शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन ही मोहीम सुरु केलेली आहे. या मोहीमेसाठी तालुक्यातील काही गावे दत्तक घेतली आहेत का? कृषि तंत्र सप्ताह आपण कोणत्या तारखेला साजरा करतात? रब्बी हंगाम सुरु झाल्यानंतर एक महिन्याचा कार्यक्रम असतो. मागील वर्षी १९ ऑगस्टला हा कार्यक्रम सुरु केला होता. विद्यापीठात जवळपास ३० ते ४० टक्के पदे रिक्त आहेत. ७५ टक्के प्रयोगशाळा

अद्ययावत नाहीत. काही संशोधन केंद्रे ही १०० वर्षापूर्वीची जुनी झाली आहेत. या प्रयोगशाळा अद्ययावत झाल्या तर त्यामुळे विद्यापीठास संशोधन करण्याच्या दृष्टीने चांगल्या प्रकारे मदत होईल. विद्यापीठांना युजीसी कडून अनुदान मिळत नाही परंतु प्रयोगशाळेसाठी ठोक रक्कम मिळते. मागील पाच वर्षात पहिल्या दोन वर्षात दहा ते बारा कोटी रुपये मिळाले होते. मागील वर्षी ४१ कोटी रुपये मिळाले.

विद्यापीठांतील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, दिनांक ३० जून २०१२ पर्यंत नोकरभरतीवर बंदी होती. आता नव्याने दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी एकूण मंजूर पदाच्या तीन टक्के पदे भरण्याबाबत शासनाने मान्यता दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या मते दरवर्षी तीन टक्के कर्मचारी सेवानिवृत्त होतात. यामध्ये ३३ वर्षाची सेवा गृहित घरलेली आहे. विद्यापीठात अनेक वर्षापासून पदभरती न झाल्यामुळे जवळपास ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत पदे रिक्त आहेत. शासनाच्या सध्याच्या नियमाप्रमाणे तीन टक्के प्रमाणे पदभरती करण्याचे ठरविले तर त्यासाठी बऱ्यांच वर्षाचा कालावधी लागेल तरीही संपूर्ण रिक्त पदे भरणे शक्य होणार नाही. ही पदे एकाच वेळी भरणे कसे महत्वाचे आहे याबाबत विद्यापीठाने समर्थपणे आपले म्हणणे मांडले तर त्याचा विचार करता येईल असे विभागाकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार कृषि विभागाने या बाबीचा पाठपुरावा करुन तीन वर्षात पदांची भरती करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला आणि तीन वर्षात तीन हजार पदे भरण्याबाबत शासनाच्या समितीकडून मान्यता घेण्यात आली. याप्रमाणे आतापर्यंत दोन हजार पदांची भरती करण्यात आली असून एक हजार पदे शिल्लक आहेत. ती पदे लवकरच भरण्यात येतील. सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर आयसीआर ने अट घातली होती की, प्राध्यापकांनी पी.एच.डी. असणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे चारही विद्यापीठातून राज्य शासनाकडे अशा प्रकारची मागणी करण्यात आली की, ही अट लावण्यात येऊ नये. सहावा वेतन आयोग लागू केला तेव्हा राज्य शासनाने ही अट मान्य केलेली आहे. कारण आयसीआर च्या शिफारसीनुसार बदल करणे शक्य आहे. असा प्रस्ताव माननीय राज्यपाल महोदयांना सादर करण्यात आलेला आहे. या शेडयूल मध्ये बदल झाल्यानंतर वरिष्ठ स्तरावरील पदे आयसीआर कडून व अधिकारी व त्याखालील पदे विद्यापीठामार्फत भरण्यात येतील. शेतकऱ्यांच्या ज्या ज्वलंत समस्या आहेत त्या दूर करण्यात येतात. कपासीवर रोग पडला तर त्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. रब्बी आणि खरीब हंगामात अशा प्रकारचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. अशा प्रकारचा फिडबॅक आमच्याकडे आलेला आहे. रिक्त पदांमध्ये ९८५ पदांची आकडेवारी दिलेली आहे. ही रिक्त प्राध्यापकांची पदे न भरल्यामुळे त्याचा विद्यापीठावर परिणाम होणार आहे काय? औरंगाबाद येथील फळ संशोधन केंद्र केशर आंबा गुणवत्ता केंद्रास रुपये ७.४४ कोटी रुपये अनुदान प्राप्त झालेले आहे. ते कोणाकडून व केव्हा प्राप्त झाले व उक्त केंद्र स्थापन करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे? अशी समितीने माहिती

विचारली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, केशर आंबा गुणवत्ता केंद्र शासनाच्या नॅशनल हॉर्टिकल मिशनतर्फे पाच वर्षासाठी मंजूर केलेला आहे. केशर आंबा आता उपलब्ध होणार आहे.सदरहू कार्यक्रमातील ७.४४ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत व दरवर्षी ३० ते ४० लाख रुपये उपलब्ध होतील. संपूर्ण कार्यक्रम चार-पाच वर्षाचा असून हाय डेन्सिटी प्लॉन्टेशन करावयाचे आहे.

कृषि विद्यापीठामार्फत संशोधन केलेल्या वस्तूंच्या मालाची विक्री केली जाते काय? असल्यास, त्यासाठी किती विक्री केंद्र उभारण्यात आली आहेत व कोण कोणत्या ठिकाणी आहेत अशी समितीने माहिती विचारली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मराठवाड्यात खरीप हंगामात शेतकऱ्यांचे मेळावे घेतले जातात. विद्यापीठाच्या बियाणांसाठी शेतकरी वर्ग सोलापूर, विदर्भातून येत असतो. विद्यापीठाच्या मराठवाड्याच्या आठही जिल्ह्यात जमिनी आहेत. त्यावर समितीने सूचना केली की, कृषि विद्यापीठाने आठही जिल्ह्यातील कृषि सप्ताह कार्यक्रम सुरु करावे तसेच प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उप केंद्र सुरु करावे.

कृषि विद्यापीठात समन्वय राखण्यासाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण संशोधन परिषद आहे. त्या परिषदेचे सन्माननीय मंत्री अध्यक्ष आहेत. या परिषदेमध्ये सर्व विभागावर वेळोवेळी चर्चा होते आणि काही सूचना देखील केल्या जातात. माननीय राज्यपाल महोदयांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरुंची बैठक होते. सर्व विद्यापीठे राज्य शासनाच्या अखत्यारित येतात, परंतु हा विभाग अतिशय संवेदनशील आहे. विद्यापीठांचे म्हणणे आहे की, आम्ही स्वायत्त असून आम्ही कुलपती म्हणजेच माननीय राज्यपालांच्या अखत्यारीत येतो. विद्यापीठाला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असल्यामुळे ते त्यांना दिले पाहिजे. तसेच विद्यापीठांचे असेही म्हणणे आहे की, विद्यापीठांवर राज्य सरकारचे कमीत कमी नियंत्रण असावे. शिवाय विद्यापीठांवर शिक्षण परीषदेचे मुळीच नियंत्रण नसावे. या सर्व बाबतीत विद्यापीठांतील सर्व कुलगुरुंचे एकमत आहे. या सर्व बाबी शिक्षण परिषदेने शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. शिक्षण परीषदेने असेही निदर्शनास आणून दिले आहे की, शासनाच्या माध्यमातून ज्या सूचना दिल्या जातात त्या सूचनांची दखल विद्यापीठे गांभीर्याने घेत नाहीत. विद्यापीठांना केंद्र सरकारच्या आय.सी.आर. कडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या तुलनेत राज्य सरकारकडून अत्यल्प अनुदान प्राप्त होते. विद्यापीठांना राज्य सरकारकडून कमी अनुदान प्राप्त होत असल्यामुळे राज्य सरकारच्या सूचना जितक्या गांभीर्याने घ्यावयास पाहिजे तितक्या गांभीर्याने घेतल्या जात नाहीत. दुसऱ्या बाजूला राज्य सरकारचे म्हणणे आहे की, राज्य सरकारकडून विद्यापीठांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा दिल्या जातात. परंतु एखाद्या बाबतीत राज्य सरकारने विद्यापीठांना सूचना केल्यानंतर त्या अनुषंगाने त्यांनी जी कार्यवाही करणे अपेक्षित आहे ती होताना दिसत नाही. एकंदरीत विद्यापीठांवर कोणाचे नियंत्रण असावे हा विषय वादातीत आहे. विद्यापीठांवर नेमके कोणाचे नियंत्रण आहे या बाबत दुमत आहे. कारण विद्यापीठांकडून वारंवार हेच सांगितले जाते की, आमच्यावर कुलपतींचे नियंत्रण आहे. त्यावर राज्यांत शिक्षण परिषद आणि संशोधन परिषद अशा दोन परिषदा

आहेत. या संस्थांचे बाय-लॉज काय आहेत? अशी समितीने विचारणा केल्यावर विभागिय सचिवांनी सांगितले की, नियुक्तीचे अधिकार शिक्षण परिषदेला आहेत. त्यासाठी समिती कार्यरत आहे. त्या समितीमध्ये शासनाचे आणि आय.सी.आर.चे प्रतिनिधी असतात. शिक्षण परिषदेची सर्व जडणघडण ठरलेली आहे. त्यानुसार नियुक्त्या केल्या जातात. शिक्षण परिषदेच्या सूचनांची जेवढी दखल घ्यावयास पाहिजे तेवढी दखल विद्यापीठाकडून घेतली जात नाही. याबाबत समितीने खालील प्रमाणे मत व्यक्त केले आहे.

विद्यापीठाची जमिन शासनाची आहे. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा पगार शासन देते तसेच अनुदान सुध्दा शासनाकडूनच दिले जाते. शिवाय या विद्यापीठांमध्ये राज्यातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. विद्यापीठे राज्यात असताना सुध्दा ती राज्य सरकारचे ऐकत नाही असे चित्र आहे. राज्यातील विद्यापीठांवर राज्य सरकारचे नियंत्रण असावे अशी समिती परखडपणे मत मांडत आहे. यासंदर्भात विभाभागीय प्रतिनिधींने असे निदर्शनास आणून दिले की, विद्यापीठाकडे मुळात ४० टक्के स्टाफ कमी आहे. समिती सदस्यांची विद्यापीठाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. विद्यापीठ शेतकऱ्यांचे हीत लक्षात घेऊन शिक्षण आणि संशोधनाच्या बाबतीत आवश्यक ते काम करीत आहे. विद्यापीठातील रिक्त पदे भरली तर सर्व समस्या दूर होतील. तसेच विभागीय सचिवांनी असेही निदर्शनास आणून दिले आहे की, महाराष्ट्र शिक्षण व संशोधन परिषद ही विद्यापीठाच्या समन्वयासाठी स्थापन करण्यात आलेली आहे. या संरचनेच्या बाबतीत अनेक प्रवाह आहेत. त्यातील एक प्रवाह असा आहे की, या यंत्रणेचे विद्यापीठांवर फारसे नियंत्रण नसावे. कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सेवा देण्यासाठी महाराष्ट्र शिक्षण व संशोधन परिषद निर्माण केली आहे. उदा.विद्यापीठाने व्यापारी दृष्टिकोन न ठेवणे, जास्त प्रमाणात बियाण्यांचे उत्पादन करणे, शेती विषयक नवीन नवीन तंत्रज्ञान व अवजारे विकसित करणे, कृषि विस्ताराचे कार्यक्रम घेणे इ. परंतु कृषि विद्यापीठाकडून सांगितले जाते की, आम्ही केवळ कृषि विषयक शिक्षण देणार, कृषि विस्ताराचे काम आमचे नाही. अशा प्रकारचा वाद आहे. हा वाद केवळ राज्य स्तरावर नसून केंद्रीय स्तरावर सुरु आहे. कृषि विभागाच्या विभागीय सचिवांनी हा विषय केंद्र सरकारच्या स्तरावर एका कॉन्फरन्समध्ये उपस्थित केला होता. विद्यापीठाकडून कृषि विस्ताराला जी दुय्यम वागणूक दिली जाते ती दूर झाली पाहिजे. मुळात कृषि विस्तार हा कृषि विद्यापीठाचा गाभाच आहे.

कृषि उत्पादन वाढविण्यासाठी तसेच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन, कुकुटपालन, दुग्ध व्यवसाय, मधुमाशा पालन, फळबाग, फुल शेती, भाजीपाला इ. बाबीसाठी विद्यापीठाने कोणकोणते प्रयत्न केले आहेत ? मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमध्ये जनावरांची एकूण संख्या किती आहे ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मराठवाडा विभागात ८६ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. पावसाचे आगमन, निर्गमन, पावसाचा खंड या सर्व बाबी लक्षात घेऊन शेतीला पूरक जोडधंदे उपलब्ध करुन देणे

आवश्यक आहे. त्यासाठी नवीन संशोधन करुन शेतकऱ्यांसाठी गेल्या वर्षापासून छोटे व मध्यम उद्योगधंदे सुरु केले आहेत. कृषि विद्यापीठामध्ये पशु संवर्धन हा एक विभाग आहे. या विभागात पशु संवर्धनाच्या बाबतीत पदवी व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. तसेच, पीएच.डी. साठी मार्गदर्शन केले जाते.

मराठवाडा कृषि विद्यापीठ १९७२ साली स्थापन झाले आहे. विद्यापीठ स्थापनेचे उद्दिष्ट कुकुटपालन, शेती संशोधन, कृषि अवजारे संशोधन इ. प्रकारचे होते. १९७२ साली ठरविलेले उद्दिष्ट विद्यापीठाने गेल्या वर्षापासून साध्य करण्यास सुरुवात केली आहे. इतकी वर्षे विद्यापीठाने काय केले? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, चारही कृषि विद्यापीठामध्ये कृषि विषयक संशोधन व्हावयास पाहिजे. या क्षेत्रात ज्या पध्दतीने काम व्हावयास पाहिजे त्या पध्दतीने होत नाही असे समितीचे मत आहे ते योग्य आहे. पशु संवर्धनाचे उत्पादन कमी होत असल्यामुळे राज्य सरकारने त्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नागपूर येथे पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन केले आहे. त्या विद्यापीठामध्ये गवतावरील संशोधन करणे हा एक भाग आहे.

"होलदेव" या संकरीत गाईचा व "उस्मानाबादी" शेळीचा लाभ किती शेतकऱ्यांना देण्यात आलेला आहे व त्यापासून त्यांना किती उत्पन्न मिळत आहे, सदर गाईची व शेळीची सर्व शेतकऱ्यांना माहिती होण्यासाठी विद्यापीठाने कोणते प्रयत्न केले आहेत ? "होलदेव" गायीपासून सकाळी आणि संध्याकाळी किती लिटर दूध मिळते? बंदिस्त जागेत संगोपन केल्या जाणाऱ्यां शेळयांना कोणते खाद्य दिले जाते असे समितीने विचारले असता यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, "होलदेव" ही गायीची संकरित जात २०११ मध्ये विकसित झालेली आहे. या होलदेव गायीपासून दोन ते अडीच हजार लिटर दूध मिळते. काही शेतकऱ्यांना गायी दिलेल्या आहेत. गाय गाभण राहिल्यापासून दूध सुरु होते. एकदा गाभण राहिल्या नंतर दुसऱ्यां गाभणाच्या कालावधीत संकरित नसलेली सर्वसाधारण गाय ८०० ते ९०० लिटर दूध देते. हा कालखंड ३०० दिवस धरला तर प्रति दिवशी ३ लिटर दूध मिळते. संकरित गायीपासून ३०० दिवसामध्ये दोन ते अडीच हजार लिटर दूध मिळते म्हणजे प्रति दिवशी ७ ते ८ लिटर दूध मिळते. संकर हा स्थानिक जातीशी केला जातो. जास्त दूध देणाऱ्यां बाहेरच्या गायी आपल्याकडील वातावरणात टिकत नाहीत. म्हणून स्थानिक गायीशी संकर केला जातो. उस्मानाबाद शेळीमुळे पैदास वाढलेली आहे. उस्मानाबाद शेळी एकावेळी दोन-तीन करडूंना जन्म देते. संकरित बोकडापासून चांगल्या प्रकारचे मटण मिळावे यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. बोकडाच्या मटणाच्या क्वॉलिटीबाबत संशोधन सुरु आहे. शेळीचे बंदिस्त आणि मोकळया जागेत संगोपन केले जाते. संशोधनातून ज्या गोष्टी बाहेर येतात त्या विद्यापीठामार्फत पोहचवल्या जातात. शेतकऱ्यांपर्यंत शेळयांना झुडुपांचा पाला आवडत असल्याने बंदिस्त शेळयांना झुडुपांचा पाला दिला जातो.

विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या जमिनीच्या संदर्भात कोणकोणती प्रकरणे न्यायालयात आहेत, सदरहू प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, औरंगाबाद संशोधन केन्द्राचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, तसेच अंबेजोगाई संशोधन केन्द्राचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. नांदेड व चाकूर येथील अतिक्रमण काढलेले आहे. संरक्षक भिंत बांधण्यासाठी मागील वर्षी दोन ते तीन कोटी रु.चा प्रस्ताव पाठविला होता. परंतु निधी मिळाला नाही. प्रत्येक ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. या प्रकरणांचा पाठपुरावा रजिस्टर ऑफिसकडून केला जातो.

कृषि विद्यापीठाने किती शेतकऱ्यांची जमिन संपादित केली आहे, त्या जमिनीचा कोणता उपयोग केला जातो, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत, त्यामुळे किती कुटुंबे बाधित झाली व त्यांच्या पुनर्वसनाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? असे विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, ९६६ शेतकऱ्यांची २५८७ हेक्टर ७४ आर इतकी जमिन संपादित केलेली असून रु. २ कोटी १ लाख इतका मोबदला शेतकऱ्यांना दिलेला आहे. शेंद्रा गावाचा प्रश्न प्रलंबित आहे. स्थानिक वाद चालू आहे. अधिक मोबदला मिळण्यासाठी शेतकरी न्यायालयात गेले आहेत. काही शेतकऱ्यांचे निधन झालेले असून त्यांच्या वारसांनी जास्त प्लॉट मिळावा म्हणून मागणी केलेली आहे. या लोकांचे पुनर्वसन अजून झालेले नाही. नवीन ठिकाणी जेथे पुनर्वसन करावयाचे आहे त्या ठिकाणी सोयी सुविधा देण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ३ कोटी रु. अधिक निधीची मागणी केलेली आहे. मूळ मागणी नुसार सर्व रक्कम शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे. तत्कालीन कायद्याप्रमाणे शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आला. त्यांना राहाण्यासाठी प्लॉट आणि गावठाण देण्यात आले. तसेच त्याठिकाणी काही सोयी सुविधा देण्यात आल्या. परंतु शेतकरी त्या ठिकाणी राहाण्यासाठी गेले नाहीत. दरम्यानच्या काळात वडीलधारे शेतकरी वारले आणि त्यांच्या वारसांनी जास्तीच्या प्लॉटची मागणी केली. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी सुधारित प्रस्ताव पाठविला. राज्य शासनाचे म्हणणे असे आहे की, तत्कालीन कायद्याप्रमाणे प्लॉट दिलेले असल्यामुळे आता नवीन प्लॉट देणे कायद्याप्रमाणे शक्य नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी ३ कोटी रुपयाची अधिकची मागणी केलेली असून नव्याने जागा संपादित करण्याचा आणि नवीन प्लॉट देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. शेंद्रा या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी ५५ कुटुंबांनी संमती दिली असून १४४ कुटुंबांनी जास्तीचे प्लॉट्स द्यावेत अशी मागणी केली आहे. जिल्हाधिकारी मार्फत पुनर्वसनग्रस्त लोकांना जमिन देण्यात आलेली असून सदर योजना केंद्र शासनाच्या मालकीची आहे. शेंद्रा प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घेण्याकरिता सन २००९ मध्ये परीक्षा घेण्यात आली होती. ३ टक्के जागा पुनर्वसनग्रस्तांना देण्याच्या संदर्भात शासन निर्णय आहे.

दि.२५ जुलै, २०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की,

पदे भरण्याच्या संदर्भात शासनाने एक समिती नियुक्त केली असून त्या समितीचे अध्यक्ष मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग असून त्यांच्याकडे विद्यापीठाने विशेष परवानगी घ्यावयाची आहे. गट अ ते ड मध्ये ज्या पदांचा अनुशेष मोठया प्रमाणात आहे व जेथे पद भरण्याची जास्त गरज आहे तेथे पद भरण्याकरिता शासनाचे पूर्ण समर्थन आहे. शेंद्रा गावातील प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न देखील महत्वाचा असून त्यांनी प्रस्ताव सादर करुन उपरोक्त समिती समोर सादर केल्यास त्याला मान्यता दिली जाईल.

मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या मालकीची सर्व्हे क्र. ८०, ८१ व ८२ मधील ३० एकर जागा जवाहर नवोदय विद्यालयासाठी सन २००२ मध्ये हस्तांतरित केली आहे. सदर विद्यालय कोणामार्फत चालविण्यात येते व सदर जमिनीचा किती मोबदला विद्यापीठाला प्राप्त झाला? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, जवाहर नवोदय विद्यालयामध्ये केंद्र शासनातर्फे विद्यार्थ्यांकरिता होस्टेल व वसतिगृह निर्माण केले जाते. राज्य शासनाने ज्या जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध करुन दिली आहे, तेथे जवाहर विद्यालय तयार केले जातात. साधारणपणे ही जागा विद्यापीठाला लिजवर दिली जाते.

मराठवाडा कृषि विद्यापीठाअंतर्गत कोणकोणती बांधकामे चालू आहेत, त्यासाठी शासनाकडून किती निधी मिळालेला आहे या संदर्भात मागील ३ वर्षाची माहिती द्यावी. तसेच शैक्षणिक संग्रहालयाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता समितीला विद्यापीठाच्या कुलगुरु कडून योग्य उत्तरे मिळाले नाही. समितीच्या बैठकीला येण्यापूर्वी आदल्या दिवशी विभागीय अधिकाऱ्यांनी साक्षीबाबत तयारी करावयास हवी होती. त्यासंदर्भात समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. माहितीतील पृ.क्र.२७ वरील विवरणपत्र ७ मध्ये सदर बांधकाम करण्यासाठी टेंडर काढले होते काय, त्याची किंमत किती होती? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे प्रतिपादन केले की, सदर कामासाठी साधारणपणे प्लान्ड फंडमधून निधी दिला जातो. ४ विद्यापीठांना दर वर्षी ४० कोटी दिले जातात. बदनापूर कृषि महाविद्यालयाकरिता १ कोटी ९० लाख रुपयांची मंजुरी मिळाली असून १ कोटी ६० लाख रुपयांची निविदा काढण्यात आली होती. दि. ४ ऑक्टोबर २०१० रोजी सदर काम पूर्ण झाले आहे. विवरणपत्र ४ मध्ये सन २००६-०७ ते सन २०१० -११ पर्यंत संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यावर समितीने असे विचारले की, सदर कामाकरिता किती रुपये प्राप्त झाले? त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन २०१०-११ मध्ये १० कोटी ८३ लाख रुपये सदर कामा करिता प्राप्त झाले. किती क्षेत्रफळामध्ये बांधकाम केले, त्याचा दर काय होता? समितीने या ठिकाणी भेट दिली होती त्यावेळी तेथील बांधकाम निकृष्ट दर्जाचे दिसून आले. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१० - २०११ मध्ये ३१ कोटी रुपये प्राप्त झाले असून ही सर्व रक्कम खर्च झाली आहे. या ठिकाणी एकूण ८५५२ चौ.मी. चे बांधकाम करण्यात आले होते. या कामाचा दर सन २००६-०७ मधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डीएसआर प्रमाणे

ठरवण्यात आला होता. हा दर साधारणपणे ५०० रु. प्रती चौ.फू .होता. या नंतर रिव्हाईज्डची किंमत १३७० रुपये प्रती चौ.फू इतकी झाली. आता सदर महाविद्यालयाचे काम पूर्ण झाले असून वसतिगृहाचे काम देखील पूर्ण झाले आहे. सुरुवातीला अनुदान कमी प्राप्त झाल्यामुळे काम पूर्ण करता आले नाही. मात्र किंमतीमध्ये वाढ झाली नाही. सदर कामासाठी टेंडर काढले होते. साधारणपणे १ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कामाकरिता एस्कलेशन क्लॉज लावला जातो. सुरुवातीला ५०० रु.प्रति चौ.फू असणारी किंमत नंतर १३७० रु.प्रति चौ.फू एवढी वाढली. किंमतीमध्ये दुप्पट वाढ होण्याचे कारण काय आहे? नंतरच्या कालावधीमध्ये वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढली. सदर कामामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. याला कोण जबाबदार आहे? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केली की, अनेकदा शासनाकडून अनुदान मंजूर केले जाते मात्र ते वेळेत वितरित केले जात नाही. यामुळे कामे वेळेत पूर्ण होण्यास विलंब लागतो. तसेच राज्यामध्ये ३ नवीन महाविद्यालये निर्माण करावयाची निर्णय घेण्यात आला. त्यापैकी बदनापूर येथील महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाची निर्मिती करण्याकरिता अर्थसकल्पात तरतूद करण्यात आली होती. मात्र जितक्या रकमेची आवश्यकता होती, तेवढी तरतूद केली गेली नाही. अनेकदा काम लवकरात लवकर सुरु करण्याबाबत स्थानिक पातळीवरुन आग्रह धरला जातो. सध्या बांधकाम मोठया प्रमाणात सुरु झालेले आहे मात्र निधीचा प्रवाह ज्या प्रमाणात आवश्यक आहे, तेवढा उपलब्ध झाला नाही. सदर प्रकरणामध्ये सन २००६-०७ मध्ये काम सुरु करण्यात आले. हे काम सन २०१०-११ पर्यंत सुरु होते. या बाबत विभागाकडून संपूर्ण कामाचा अहवाल घेतला जातो, कोणत्या वर्षीचा डीएसआर प्रमाणे दर लावण्यात आला, कामाची मूळ किंमत काय होती, रिव्हाईज्ड कॉस्ट काय होती या सर्व गोष्टींना वित्त व नियोजन विभागाकडून मंजुरी दिल्यानंतर रक्कम वितरित केली जाते. सदर प्रकरण मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मांडण्यात यावे, असे सांगण्यात आले होते. या कामाकरिता पूर्वी ठरविण्यात आलेल्या अंदाज पत्रकामध्ये बराच फरक होता. काम सुरु करण्यापूर्वी त्यांचा आराखडा जुन्या पद्धतीचे होते. त्यामुळे अंदाज पत्रकामध्ये फरक झाला. साधारणपणे छानणी पूर्ण केल्यानंतर विभागीय पातळीवर वित्त व नियोजन विभागाकडून मंजुरी दिली जाते. तसेच पूर्व तपासणी केल्यानंतर रक्कम दिली जाते. बदनापूर महाविद्यालयाच्या संदर्भात स्वतंत्र अहवाल सादर केला जाईल. असे समितीला आश्वासन देण्यात आले. त्याच प्रमाणे ज्यावेळी वसतिगृहाच्या कामाला मंजुरी देण्यात आली होती, तेव्हा ३० विद्यार्थी संख्या मंजूर करण्यात आली होती. मात्र त्या नंतर तेथे ६० विद्यार्थ्यांना मान्यता देण्यात आली. येथे ८५६७ स्क्वे.फू.चे बांधकाम करावयाचे होते. मूळ बांधकाम किती व अंतिम बांधकाम किती झाले, डीएसआरचा दर किती होता असे समितीने विचारले असता या संदर्भात शासन स्तरावर चौकशी करण्यात येईल. असे समितीला आश्वासन देण्यात आले. तसेच ज्या संस्थेला काम देण्यात आले होते, त्यांनी ते काम पूर्ण केले आहे.

विद्यापीठाकडून कोणकोणत्या संस्थेस वा व्यक्तींना जागा भाड्याने दिली आहे किंवा विक्री केली आहे याबाबत समितीस माहिती देतांना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विद्यापीठाची फक्त जवाहर नवोदय विद्यालयाला लिज बेसवर जागा दिलेली आहे.

भारतीय कृषि अनुसंधान परिषदेकडून प्राप्त झालेला मेगा सीड प्रकल्पांतर्गत व राज्य शासनाने मंजूर केलेल्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत विद्यापीठास केव्हा व निश्चित किती अनुदान प्राप्त झाले आहे? महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व काही खाजगी कंपन्यांबरोबर विद्यापीठाने केलेल्या सामंजस्य कराराच्या अटी व शर्ती काय आहेत व या अनुषंगाने बिजोत्पादनात वाढ होण्यास कशा प्रकारे मदत होणार आहे? असे समितीने विचारल्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विद्यापीठाने जालना येथील सीड कंपनीबरोबर नवीन व्हेरायटीचे उत्पादन घेण्यासाठी करार केलेला आहे. तथापि, उपरोक्त प्रश्नासंदर्भात समितीला सविस्तर माहिती देण्यात आली नाही.

विद्यापीठाने ५० ते ५५ कॉलेज खाजगी संस्थांना चालवावयास दिलेली आहेत. तेथे जे शिक्षक आणि प्राध्यापक आहेत ते प्रशिक्षीत नाहीत. शिक्षण पध्दतीनुसार ज्या परीक्षा घेतल्या जातात त्यानुसार प्रॅक्टिकल्स परीक्षेसाठी ५० गुण, थिअरीसाठी ४० गुण व १० गुण महाविद्यालयामार्फत दिले जातात. अशी एकूण १०० गुणांची परीक्षा घेतली जाते. प्रशिक्षित शिक्षक किंवा प्राध्यापक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य गुणवत्तेचे शिक्षण मिळत नाही. प्रॅक्टिकल परीक्षेमध्ये ५० पैकी ३५ ते ४० गुण दिले जातात, १० गुण महाविद्यालयाकडून दिले जातात, त्यामुळे थिअरी परीक्षेमध्ये ४० पैकी कितीही गुण मिळाले तरी चालतात. विद्यापीठातील संशोधक स्वतः जाऊन थिअरी पेपर पाहतात. या पध्दतीमध्ये बदल केला जाणार आहे काय? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया पार पाडली जाते. विद्यार्थी काय शिकतात, कसे शिकतात हे पाहिले जात नाही. जे डीन आहेत त्यांच्या अखत्यारित संलग्न महाविद्यालये येतात. त्यांच्याकडून सुपरव्हिजन ठेवण्यात येते. परीक्षा पध्दतीमध्ये तफावत होती म्हणून ती या वर्षापासून कॉमन ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.सिस्टीममध्ये तफावत होती, ती दूर करण्याच्या दृष्टीने बदल करुन घेतला आहे. विषयाचे प्राध्यापक मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पूर्वी १० ते १५ विषय प्राध्यापक होते. आज ३ ते ४ प्राध्यापक आहेत. त्यामुळे कंत्राटी पध्दतीने प्राध्यापक नेमलेले आहेत. त्यांना एका सेमिस्टरपुरते नेमण्यात येते. प्रती सेमिस्टरसाठी ७५०० रुपये बेसवर क्वालिफाईड शिक्षक नेमले जातात. १+१ कोर्स असेल तर या पध्दतीने नेमण्याचा निर्णय घेतला जातो त्यामध्ये एका आठवड्यामध्ये एक थिअरी आणि एक प्रॅक्टिकल यानुसार एका व्यक्तीला ७५०० रुपये देण्यात येतात. या प्राध्यापकांनी दर आठवड्यामध्ये एक थिअरी आणि एक प्रॅक्टिकल घ्यायची असते. थिअरी आणि प्रॅक्टिकल्सचे दिवस ठरलेले असतात. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते व त्यांची दैनदिन हजेरीपटावर स्वाक्षरी घेण्यात येते.

मागील पाच वर्षात लेखा परिक्षणामध्ये कोणकोणते आक्षेप घेण्यात आले आहेत? कोणती कारवाई करण्यात आली व सद्य:स्थितीत किती प्रकरणे प्रलंबित आहेत? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, लेखापरिक्षण २००८-०९ पर्यंत पूर्ण झालेले आहे. २००९-१० चे लेखापरिक्षण सध्या सुरु आहे. स्थानिक निधी लेखा विभागामार्फत लेखापरिक्षण होते. स्थानिक निधी लेखा विभागामार्फत जिल्हा परिषदा, नगरपरिषदांचे लेखापरिक्षण केले जाते. अधिनियमातील तरतूदीप्रमाणे की, "लेखापरिक्षक हा शासनाने नेमावयाचा असतो. त्यानुसार स्थानिक निधी लेखा विभागाकडून विद्यापीठाचे लेखापरिक्षण केले जाते. त्यावर समितीने विचारणा केली की, २००९-१० व २०१०-११ चे अद्याप लेखापरिक्षण झालेले नाही. लेखा परिक्षण ठराविक काळात पूर्ण करणे स्थानिक निधी लेखा विभागाकडून बंधनकारक नाही का? त्यासदंर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, राज्य स्तरावर लेखा अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे वेळेवर लेखा परिक्षण होणे शक्य होत नाही. त्यांना १०० टक्के हे काम करावेच लागते. फक्त कालावधी मागेपुढे होऊ शकतो. लेखापरिक्षक कॅडर वित्त विभागांतर्गत येत असून त्यांच्याकडून ही पदे भरली जातात. मध्यंतरी पदे भरण्यावर निर्बंध घालण्यात आले होते. आता ३ टक्के पदे भरण्यास अनुमती दिलेली आहे. जिल्हा परिषदेच्या लेखापरिक्षण कामासाठी स्थानिक निधी लेखा विभागाची आडिटरची पदे भरली असून कृषि विद्यापीठाच्या लेखापरिक्षण कामासाठी निर्माण केलेली पदे एक वर्षापासून रिक्त आहेत. स्थानिक निधी लेखा विभागाकडे लेखापरिक्षणसंबंधीचा कार्यक्रम येत असतो. त्यांचे विभागीय नियंत्रक कार्यालय औरंगाबाद येथे आहे. वास्तविक वेळेवर लेखापरिक्षण होणे विद्यापीठाच्या दृष्टीने चांगले असते. २००८-०९ च्या लेखापरिक्षणामध्ये विविध प्रकारच्या त्रुटी आहेत. वर्षभरात ९० ते १०० प्रकारचे आक्षेप येतात. विद्यापीठाकडून कधी ३२ हजार रुपये तर कधी ४२ हजार रुपयांची स्टेशनरी खरेदी केली जाते. ५० हजार रुपयांपर्यंतची खरेदी कोटेशन मागवून केले जाते आणि ५० हजाराच्या वरील खरेदीसाठी टेंडर काढण्यात येते. आर.सी.प्रमाणे खरेदी केली जाते दोन प्रकारचे लेखापरिक्षण होत असते. स्थानिक निधी लेखा विभागामार्फत लेखापरिक्षण केले जाते. या शिवाय महालेखाकार कार्यालयाकडून देखील लेखापरिक्षण होत असते. ते विलंबाने होत असते. तीन-चार वर्षाचे लेखापरिक्षण एकत्रितपणे केले जाते. आतापर्यंत महालेखाकार कार्यालयाने १४७ आक्षेप घेतले होते, त्यापैकी ११२ आक्षेपांची पूर्तता केलेली असून ३५ आक्षेप प्रलंबित आहेत. विद्यापीठाच्या लेख्यांबद्दल स्थानिक निधी लेखा विभागाकडून दरवर्षी लेखापरिक्षण होत असते. या शिवाय महालेखाकार कार्यालयाचे देखील नियंत्रण आहे. राज्य शासनाचे मोठया प्रमाणात अनुदान मिळत असल्यामुळे शिक्षण परिषदेचे लक्ष असते. शिक्षण परिषदेमध्येही या विषयावर चर्चा होत असते. विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेला अहवाल सादर होत असतो. त्यांच्या पातळीवर कम्प्लायन्स पाहिले जातात. तसेच विधिमंडळाला देखील अहवाल सादर होतो. महालेखाकारांच्या लेखापरिक्षणमध्ये जे आक्षेप घेतले जातात त्याची पूर्तता

केल्याशिवाय पुढे जाता येत नाही, तो पॅरा ड्रॉप होत नाही. महालेखाकारांच्या लेखापरिक्षणमध्ये काही मुद्दे उपस्थित झाले आणि त्यांच्या पूर्ततेची कार्यवाही महालेखाकार कार्यालयास मान्य नसेल तर ते मुद्दे लोकलेखा समितीसमोर उपस्थित होतात.

१४७ आक्षेपांपैकी ११२ आक्षेपांची पूर्तता करण्यात आली. पंरतू उर्वरित आक्षेपांबाबत काय कार्यवाही केली? तुकडे पाडून खरेदी करणे, खरेदीचे नियम न पाळणे असेही आक्षेप आहेत. वैयक्तिक स्वरुपाचे आक्षेप काय आहेत? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, वैयक्तिक स्वरुपाच्या आक्षेपामध्ये टी.ए.डी.ए.ची रिकव्हरी, पे फिक्सेशनमधील चुका असतात. समितीच्या उपरोक्त प्रश्नासंदर्भात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, स्थानिक निधी लेखा विभागाकडून स्थानिक पातळीवर लेखा परिक्षण केले जाते. या शिवाय विद्यापीठाची इंटर्नल लेखापरिक्षण विंग आहे. त्यांच्याकडे ऑब्जेक्शन्स नोंदविले जातात. त्यांच्याकडून पाहणी केली जाते. समितीच्या सूचनेप्रमाणे या आक्षेपांचे सर्वसामान्य स्वरुप काय आहे, महालेखाकार यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची काय स्थिती आहे, त्यांचे अनुपालन कशा कारणामुळे झालेले नाही याबाबत विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त करुन घेऊन त्याबाबत समितीला माहिती देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासन दिले. कृषि विद्यापीठा मार्फत कमी कालावधीचे (उदा. १, २, ४, ६, १२ महिन्याचे) कोणकोणते अभ्यासक्रम शिकवले जातात, त्यांची कार्यपद्धती काय आहे? कमी कालावधीचे कृषि विषयक अभ्यासक्रम सुरू करुन विद्यार्थ्यांना कृषि विषयक प्रशिक्षण देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे? दापोली कृषि विद्यापीठात आयटीआय (ॲग्रो) नवीन प्रशिक्षण सुरू झाले आहे. त्या धर्तीवर परभणी कृषि विद्यापीठात अशा प्रकारचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे किंवा कसे? लहान लहान कोर्सेस सुरू केले आहेत काय याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी प्रतिपादन केले की, लहान लहान अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. त्याबाबत विभागीय सचिवांनी विदित केले की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विद्यापीठातर्फे १५ दिवस, १ महिना अशा प्रकारचे कोर्सेस आयोजित केले जातात. उदाहरणार्थ बीज उत्पादन कार्यक्रम, मशरूम शेती, गृहोपयोगी कार्यक्रम, शेतीवर आधारित छोटे छोटे कार्यक्रम. त्याच बरोबर कृषि परिषदेमध्ये झालेल्या चर्चेनंतर सध्याचे २ वर्षांचे ॲग्रिकल्चरचे डिप्लोमा कोर्सेस ॲग्रो पॉलिटेक्नीक कोर्समध्ये कन्व्हर्ट करण्याबाबत धोरणात्मक निर्णय झालेला आहे. जी खाजगी महाविद्यालये हे कोर्सेस दोन वर्षांपासून चालवित होती, त्यांना ते सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यावेळेस विद्यापीठांनी अशी भूमिका घेतली की, २ वर्षांचा अभ्यासक्रम ३ वर्षांचा करावयाचा झाला तर, राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळाली पाहिजे. कारण त्या करिता नवीन स्टाफ नेमावा लागेल, इमारत उभी करावी लागेल. त्या संदर्भात चारही विद्यापीठांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरहू अभ्यासक्रम खाजगी

विद्यापीठ व महाविद्यालयांनी या वर्षापासून सुरू करावा आणि शासकीय महाविद्यालयांनी पुढच्या वर्षापासून सुरु करावा असाही निर्णय झालेला आहे.

प्रत्यक्ष भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या दरम्यान समितीमध्ये अनेक मुद्यांवर चर्चा झाली. परंतु, त्या बाबत संबंधित अधिकाऱ्यांनी संपूर्ण माहिती दिलेली नाही असे समितीचे मत आहे. यातील काही मुद्यांबाबत समितीचे समाधान झालेले आहे. तर, काही मुद्यांच्या संदर्भात समितीचे विशेष समाधान झालेले नाही.

अभिप्राय व शिफारशी

(१) मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अखत्यारित ३५५०.४० हेक्टर जमिन आहे. या जमिनीवर ११ महाविद्यालये, ३ ट्रेनिंग सेंटर्स, संशोधन संस्था, प्रयोगशाळा, रोपवाटीका, निवासस्थाने, कार्यालये, बिजोत्पादन क्षेत्र, वसतिगृह इ. कारणासाठी सदर जमिनीचा वापर केला जात आहे. ऊर्वरित जमिन पडिक असून काही ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. उदा. नांदेड येथे २८ गुंठे जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम झाले आहे. सद्य:परिस्थितीमध्ये जमिनीचे वाढलेले दर लक्षात घेता विद्यापीठाकडे असलेली जमिन ही अतिशय मौल्यवान आहे. या जमिनीवर अतिक्रमण होऊ नये म्हणून खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकरणी दूर्लक्ष केल्यास निष्कारण वाद निर्माण होतात व बऱ्याच वेळा न्यायालयीन प्रक्रियेस सामोरे जावे लागते त्यामुळे वेळेचा, पैशाचा व यंत्रणेचा अपव्यय होतो. हा आजपर्यंतचा शासकीय जमिनीबाबतचा अनुभव आहे. हे लक्षात घेता विद्यापीठाच्या अखत्यारित असलेल्या जागेभोवती संरक्षक भिंत बांधण्याचे काम सूरू असून ते अपूर्णावस्थेत आहे. कृषि विद्यापीठांचा योजनांतर्गत निधी प्राथम्याने शिक्षण व संशोधनावर खर्च करणे अपेक्षित असून विद्यापीठांची इतर दायित्वे देखील प्रलंबित असल्यामुळे अशा स्थितीत संरक्षित भिंतीसाठी खर्च करणे प्राथम्यक्रमात बसत नसल्याचे कारणास्तव वित्त विभागाने सदर प्रस्तावास मान्यता दिलेली नाही. ही बाब योग्य नसून विद्यापीठाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने या प्रकरणी परिस्थिती विचारात घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे म्हणून **भविष्यात विद्यापीठाच्या जमिनीवर अतिक्रमण होऊ नये, संपूर्ण जमिन संरक्षित राहण्यासाठी तातडीची बाब म्हणून विद्यापीठाच्या अखत्यारितील सर्व जमिनीवर संरक्षण भिंत बांधण्यात यावी व त्याकरिता आवश्यक असल्यास विद्यापीठाने याबाबतची प्रशासकीय मंजूरी व निधीबाबतचा प्रस्ताव ३ महिन्याच्या आत शासनास सादर करावा व शासनाने यास विनाविलंब मंजूरी व निधी उपलब्ध करुन द्यावा अशी समिती शिफारस करित आहे.**

(२) राज्यात कृषि विभागाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट संदर्भात अनेक बैठक होतात गेल्या अनेक वर्षात याबाबतीत केवळ चर्चा झालेली आहे. कृषि क्षेत्रामध्ये जेवढे संशोधन होणे आवश्यक आहे तेवढ्या प्रमाणात ते झालेले नाही. ही निश्चितच कृषि प्रधान देशाला लांछनास्पद बाब आहे. विद्यापीठास केंद्र व राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी दिला जातो. या विद्यापीठाला शासनाकडून २०० कोटी रुपयाचा निधी दिला जातो. त्यापैकी रु. १५० कोटी कर्मचारी / अधिकाऱ्यांच्या पगारावर खर्च होतो. तर त्यांच्या कडून नवीन संशोधन का करुन घेतले जात नाही. हीच एक खेदाची बाब आहे. याबाबत समितीने सखोल चौकशी केली असून ७५% प्रयोगशाळा अद्ययावत नाही, काही संशोधन केंद्रे अत्यंत जूनी झालेली आहेत, कृषि क्षेत्रातील तज्ञांच्या मते कृषि क्षेत्रातील संशोधन व विकासासाठी पैसे कमी पडतात. आवश्यक तेवढे पैसे उपलब्ध करुन दिले जात नाहीत तसेच विद्यापीठातील ३० ते ४०% पदे रिक्त आहेत या सर्व बाबी पाहता आणि जगामध्ये कृषि क्षेत्रातील

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा व संशोधनाच्या झालेला विकास आणि भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील तंत्रज्ञान व संशोधन हे अत्यंत धीम्या गतीने सूरु असून या अतिशय महत्त्वाच्या बाबीकडे कृषि विद्यापीठे व शासनाचे पूर्णतः दूर्लक्ष झालेले आहे असे समितीचे ठाम मत आहे. राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांनी वारंवार परिषदा, बैठका, चर्चासत्र आयोजित करुन स्थानिक स्तरावरील संशोधनाचा व तंत्रज्ञानाचा विचार करुन सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. याकरिता **शासनाने राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांची एक स्वतंत्र आधुनिक संशोधन व तंत्रज्ञान समिती तीन महिन्यात गठित करावी व या समितीने राज्यातील सर्व जिल्ह्यांचा अभ्यास करुन याप्रकरणी आवश्यक तो अहवाल शासनास सादर करावा व त्या अनुषंगाने लागणारी यंत्रसामुग्री, प्रयोगशाळा, आवश्यक शास्त्रज्ञ, तज्ञ व लागणारा निधी याचा शासनाने कृती आराखडा तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

तसेच कृषि विद्यापीठातील रिक्त पदांचा आढावा घेतला असता संशोधनाच्या अनुषंगाने रिक्त असलेली पदे शासनाने खास बाब म्हणून भरण्यास परवानगी द्यावी व इतर रिक्त पदे शासनाच्या नियमाप्रमाणे भरण्यात यावीत अशीही समिती शिफारस करित आहे.

(३) मराठवाडा कृषि विद्यापीठाने स्थापनेपासून आजतागायत २६ पिकांच्या १२० संशोधीत वाणांची आणि १८ शेती औजारांची निर्मिती केली असून त्यापैकी १२ पिकांच्या ५० वाणांची नोंदणी राष्ट्रीय स्तरावरील वनस्पती जनुकीय संसाधन मंडळ, नवी दिल्ली येथे झाली असून पीक उत्पादन वाढीसाठी जवळपास ७०० तंत्रज्ञानाच्या शिफारशी शेतकऱ्यांसाठी केलेल्या आहेत तसेच फळांमध्ये केळी, सिताफळ या फळझाडांची रोपे देखील तयार केलेली आहेत परंतु ही निर्मिती समाधानकारक नसल्याने याबाबत समितीने खेद व्यक्त केला आहे.

राज्यात बी-बियाणांमध्ये फार मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. अशा परिस्थितीत कृषि विद्यापीठाने मोठ्या प्रमाणावर दर्जेदार बी-बियाणे, फळांची रोपे निर्माण करावीत आणि ती जास्तीत जास्त शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत जेणेकरुन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, त्यांची फसवणूक होणार नाही व आर्थिक नूकसानही होणार नाही. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत (१) विद्यापीठाने तयार केलेले वाण जास्तीतजास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे. (२) शेतकऱ्यांनी विद्यापीठाला केलेल्या सूचनेप्रमाणे त्यांना प्रात्यक्षिक दाखविणे व (३) नवीन औजारे तयार करणे या तीन गोष्टी प्रामुख्याने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार **शेतकऱ्यांपर्यंत ही बि-बियाणे, औजारे, फळ रोपे पोहोचविण्याकरिता विद्यापीठाने संशोधन केंद्राच्या ठिकाणी तसेच जिल्हा व तालुका स्तरावर विक्री केंद्रे विनाविलंब निर्माण करावीत व त्यांची योग्य रितीने प्रसिध्दी करुन**

शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे बि-बियाणे, औजारे व फळ रोपे, खत यांचा पुरवठा विद्यापीठाने करावा अशी शिफारस समिती करित आहे.

(४) मराठवाडा कृषि विद्यापीठाकरिता शासनाने ३५५५.४० हेक्टर जमिन संपादित केली आहे. विद्यापीठाकरिता केंद्र व राज्य शासनाकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला जातो. विद्यापीठाच्या एकूण क्षेत्रफळाचा व शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा विचार करता तुलनेने विद्यापीठाचे उत्पन्न अत्यल्प आहे.

अ.क्र.	वर्ष	महसुली उत्पन्न	महसुली खर्च
	२००७-२००८	८,६२,६८,०००	८,७१,६१,०००
	२००८-२००९	९,८८,२०,०००	७,७५,७१,०००
	२००९-२०१०	१०,६१,६५,०००	९,२०,५७,०००
	२०१०-२०११	१०,८४,८२,०००	१०,८३,७५,०००

उपरोक्त उत्पन्न लक्षात घेता विद्यापीठाच्या ताळेबंद रु. १५०-२०० कोटीचा आहे. शासनाकडून २०० कोटी रुपये अनुदान दिल्यानंतर विद्यापीठाचा महसूल फक्त २ ते ३ कोटी रुपये आहे ही परिस्थिती अव्यवहारिक आहे. विद्यापीठाचे काम हे पारंपारिक पध्दतीने सुरु असून उत्पन्न वाढविण्याकरिता अनेक मार्ग असतांना विद्यापीठ त्याप्रमाणे प्रयत्न करित नाही व शासनाने देखील कृषि विद्यापीठाला याबाबत काही सूचना दिल्याच्या व विशिष्ट उद्दिष्ट दिल्याचे निदर्शनास येत नाही. विद्यापीठामध्ये अनेक मार्गाने उत्पन्न वाढविण्याची क्षमता असताना, तसेच मनुष्यबळ देखील उपलब्ध असून वरीष्ठ पातळीवर उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न झालेले नाहीत असे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. निश्चित ही बाब गंभीर आहे. यापुढे **मराठवाडा विद्यापीठाने जास्तीत जास्त कृषि उत्पादनाची निर्मिती करुन त्यातून महसूल वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामध्ये विशेषत: फूड प्रोसेसिंग सिस्टिम तयार करुन जास्तीत जास्त ज्युस, फळ प्रक्रिया पदार्थ विक्रीसाठी तयार करणे, औजारे निर्मिती करणे, फळ रोपे बि-बियाणे यांच्या सुधारीत जाती उपलब्ध करणे, भाजीपाला स्टॉल्स उपलब्ध करणे इ. व अशा प्रकारच्या कृषि क्षेत्राशी संबंधित असलेल्या वस्तू, बि-बियाणे, औजारे तंत्र, खते, पदार्थ मोठ्या प्रमाणात निर्माण करुन ते बाजारात विक्रीस आणून उत्पन्न वाढविण्याचे दृष्टीने निश्चित यंत्रणा तयार करण्यात यावी व महसूली उत्पन्न वाढविण्यासाठी विशेष कक्ष निर्माण करावा अशी समिती आग्रहाची शिफारस करित आहे.**

आत्तापर्यंत कृषि विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयांचे काम हे अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्या पुरतेच सिमित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. राज्यात शेतकऱ्यांना व शासनाला कृषि विद्यापीठांकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. मात्र ह्या अपेक्षा कृषि विद्यापीठांकडून पूर्ण झालेल्या नाहीत याचे मुख्य कारण अथवा अडचण म्हणजे **विद्यापीठाकडे मार्केटिंग व्यवस्था नाही व व्यावसायीक दृष्टीने विद्यापीठाचे**

वातावरण पोषक नाही. विद्यापीठांने औजारे निर्मिती केली, बि-बियाणे निर्मिती केली परंतू बाजारात याची मोठ्या प्रमाणावर विक्री करण्यासाठी विद्यापीठाने खास प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची औजारे व बि-बियाणे मिळत नाहीत व त्यामुळे शेतकऱ्यांकडे विद्यापीठाचे व शासनाचे देखील नुकसान होत आहे. हे निश्चितच खेदजनक आहे. **भविष्यात याकडे विद्यापीठाने दूर्लक्ष न करता व्यावसायीक दृष्टीने बाजारात पदार्पण करुन मार्केटिंग करण्याच्या दृष्टीने एक स्वतंत्र मार्केटिंग विभाग निर्माण करुन विशिष्ट उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करित आहे.**

(५) कृषि विद्यापीठाच्या उत्पन्नाचे मार्ग वाढविण्याच्या अनुषंगाने माहिती देत असताना विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, विद्यमान मा.कृषि मंत्री महोदयांचा असा मानस आहे कि या विद्यापीठातील काही जमिनी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपसाठी देण्यात याव्यात. विद्यापीठामार्फत जी कामे चालविली जातात त्या कामांसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम सार्वजनिक संस्थांनी गुंतवावी आणि त्यातून विद्यापीठाला उत्पन्न मिळावे असा त्यामागील उद्देश आहे. परंतू समितीच्या मते या जमिनी शेतकऱ्यांकडून नाममात्र दराने घेतल्या असल्याने त्यावर प्रकल्प उभारण्यासाठी कोणत्याही खाजगी उद्योजकाला खाजगी तत्त्वावर किंवा जॉईंट व्हेंचर तत्त्वावर या जमिनी देण्यात येऊ नयेत. कारण राज्यात या तत्वांचा अनुभव फारसा चांगला नाही अनेक विद्यापीठांच्या जमिनींवर उद्योजकांचे लक्ष आहे. विद्यापीठाचा / मा.कृषि मंत्र्याचा उद्देश चांगला असला तरी खाजगी उद्योजक विद्यापीठाचा मूळ उद्देश बाजूला ठेवून स्वतःचा उद्देश साध्य करतील. **त्यामुळे अशा प्रस्तावास समितीने तीव्र विरोध केला आहे. त्यानुसार विद्यापीठांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना एकत्रित करुन इंडियन कंपनी ॲक्टच्या सेक्शन २५ व चॅप्टर IX-A अन्वये कंपनीची स्थापना करता येते, यासंबंधीची काही मार्गदर्शक तत्वे आहेत. यासाठी त्या भागातील शेतकरी व शेतकऱ्यांच्या संस्थांना जमिनी देण्यात याव्यात अथवा विद्यापीठातून जे विद्यार्थी पी.एच.डी. करतात त्यांच्याच ज्ञानाच्या सहाय्याने एखादा प्रकल्प राबविण्यासाठी विद्यापीठाने कार्यवाही करावी अशी समिती आग्रहाची शिफारस करित आहे.**

(६) विद्यापीठाचे असे म्हणणे आहे कि, विद्यापीठे स्वायत्त असून ती कूलपती म्हणजेच राज्यपालांच्या अखत्यारित येतात. विद्यापीठाला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असल्यामुळे विद्यापीठांवर राज्य सरकारचे कमीत कमी नियंत्रण असावे. शिवाय विद्यापीठांवर शिक्षण परिषदेचे मूळीच नियंत्रण नसावे. या सर्व बाबतीत विद्यापीठातील सर्व कूलगुरुंचे एकमत आहे. या सर्व बाबी शिक्षण परिषदेने शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत तसेच शासनाच्या माध्यमातून ज्या सूचना विद्यापीठास दिल्या जाता त्या सूचनांची दखल विद्यापीठे गांभीर्याने घेत नाहीत, शासनाच्या सूचनांच्या अनूषंगाने विद्यापीठांनी जी कार्यवाही करणे अपेक्षित आहे ती होताना दिसून येत नाही एकूणच विद्यापीठांवर कोणाचे नियंत्रण असावे हा विषय वादातीत असल्याचे समितीच्या निदर्शनास

आले आहे व ही बाब अत्यंत गंभीर आहे. **वास्तविक पाहता विद्यापीठाची जमिन शासनाची आहे, विद्यापीठातील कर्मचारी / अधिकाऱ्यांचा पगार शासन देते तसेच अनुदान शासनाकडून दिले जाते शिवाय या विद्यापीठांमध्ये राज्यातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. ह्या बाबी लक्षात घेता विद्यापीठे कूलपती तसेच मा.राज्यपालांच्या अखत्यारित असले तरी त्यांच्यावर शिक्षण परिषद, संशोधन परिषद व राज्य शासनाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. या दृष्टीने विभागीय सचिवांनी याबाबत संपूर्ण तपासणी करुन त्याप्रमाणे निश्चित शासन धोरण-आदेश निर्गमित करावेत आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापनात सुसूत्रता आणावी अशी समिती शिफारस करित आहे.**

(७) विद्यापीठाच्या लेखा परिक्षणामध्ये एकूण १४७ आक्षेप घेण्यात येऊन त्यापैकी ११२ आक्षेपांची पूर्तता करण्यात आलेली आहे तथापि उर्वरित आक्षेपांबाबतची माहिती समितीला देण्यात आली नसल्याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करित आहे तसेच सन २००८-२००९ पर्यंतचे लेखा परिक्षण झाले असून सन २००९-२०१० पासून लेखा परिक्षण झालेले नाही. ही बाब देखील योग्य नाही. **विद्यापीठाचे लेखापरिक्षण वेळच्या वेळी होण्याच्या दृष्टीने आणि लेखा परिक्षणाच्या आक्षेपांची तात्काळ पूर्तता करण्यासाठी विद्यापीठाने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता दक्षता घेण्यात यावी व ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे व बेजबाबदारीमुळे त्रुटी राहिल्या आहेत अशा अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(८) समितीने प्रत्यक्ष विद्यापीठाच्या भेटीच्या वेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाची पाहणी केली असता तेथील विद्यार्थ्यांनी समितीकडे मागणी केली कि, त्या ठिकाणी नोकरीकरिता प्लेसमेंट उपलब्ध नाही त्यामुळे नोकरी मिळण्यास विलंब लागतो. **ग्रामीण भागातील कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तातडीने व योग्य नोकरी मिळण्याच्या दृष्टीने कृषि महाविद्यालयाच्या ठिकाणी रोजगार व स्वयंरोजगार केंद्रे निर्माण करावीत अशी समितीची शिफारस आहे.**

(९) समितीला मिळालेल्या माहितीनुसार विद्यापीठाने ५० ते ५५ महाविद्यालये खाजगी संस्थांना चालविण्यास दिलेली आहेत. तेथे जे शिक्षक आणि प्राध्यापक आहेत ते प्रशिक्षीत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य गुणवत्तेचे शिक्षण मिळत नाही. प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये ५० पैकी ३५ ते ४० गुण दिले जातात. १० गुण महाविद्यालयाकडून दिले जातात त्यामुळे थिअरी परिक्षेमध्ये ४० पैकी कितीही गुण मिळाले तरी चालतात. परिणामी खाजगी संस्थांना चालविण्यात दिलेल्या महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्वक शिक्षण दिले जात नाही. पर्यायाने विद्यार्थ्यांची व पालकांची फसवणूक केली जाते. ही अत्यंत गंभीर व अक्षम्य बाब आहे. ही परिस्थिती लक्षात घेता **अशा महाविद्यालयामधील शिक्षक / प्राध्यापक हे नियमाप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव धारण करणारेच नियुक्त करण्यात यावेत व जी महाविद्यालये याची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी अशी समिती शिफारस करित आहे.**

तसेच विद्यापीठाने त्यांच्या परिक्षेत्रातील ज्या कृषि महाविद्यालयांना मंजुरी दिलेली आहे. परंतु अद्याप जी सुरु झालेली नाहीत अशी कृषि महाविद्यालये तात्काळ सुरु करण्यात यावीत, अशी देखील समिती शिफारस करीत आहे.

(१०) विद्यापीठाच्या अखत्यारित असलेल्या बदनापूर येथील वसतिगृहाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले त्या वसतिगृहाचे ८५५२ चौ.मी.चे **बांधकाम करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डीएसआर प्रमाणे रु. ५००/- इतका दर प्रती चौ.फूट ठरविण्यात आला होता. यानंतर यामध्ये बदल करुन रु. १३७०/- इतका दर प्रती चौ.फूट करण्यात आला. हा दर दुपटीपेक्षा जास्त असूनही बांधकाम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. प्रत्यक्षात बांधकाम दरात वाढ करण्याच्या व निश्चित समाधानकारक कारण समितीस समजू शकली नाहीत तसेच निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्यामुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सचिव पातळीवरील अधिकाऱ्याकडून चौकशी करण्यात यावी व त्याबाबतची पुढील कार्यवाही एक महिन्यात करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(११) मौ.शेंद्रा ता.जि.परभणी येथील गावठाणाचे क्षेत्र २७०५६ चौ.मी. एवढे असून ते संपादीत केले आहे. त्या बदल्यात पूनर्वसनासाठी मौ.कोरेगाव येथे जमिन संपादीत केली आहे. या संपादीत जमिनीचा पुनर्वसनाकरिता २६१ भूखंडाचे आरेखन देखील करण्यात आले आहे. तसेच पूनर्वसन मोजणी, आरेखन याकरिता निधी, मोबदला, नागरी सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. **परंतू गावकऱ्यांनी अद्यापही जून्या गावठाणातील आपली घरे सोडून देवून तेथून त्यांच्यासाठी संपादीत केलेल्या नवीन गावठाणात स्थलांतर केलेले नाही. परिणामी ग्रामस्थांची पाळीव जनावरे विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील प्रयोगाचे अतोनात नुकसान करित आहेत व विद्यापीठाच्या मौल्यवान साधनसामग्री व यंत्रसामुग्रीस मोठ्या प्रमाणावर क्षती पोहोचत आहेत. त्यास प्रतिबंध करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुसार नवीन गावठाणात स्थलांतर करण्याकरिता बैठका, चर्चा व आवाहन करुनही त्यास प्रतिसाद मिळत नाही. ही परिस्थिती लक्षात घेता जिल्हाधिकारी, विद्यापीठ, पोलीस अधिक्षक यांच्या पातळीवर विचारविनिमय करुन हा प्रश्न तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने तात्काळ योग्य ती खबरदारी घ्यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्याच्या आत कळविण्यात यावा अशी समिती शिफारस करित आहे.**

****

परिशिष्ट

(प्रपत्र - १ ते ४)

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक
दिनांक १३ ऑक्टोबर, २०११
स्थळ -: मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
उ प स्थि ती

१) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. सुभाष झनक, वि.स.स.

३) श्री. अशोक जाधव, वि.स.स.

४) श्री. शिरिषकुमार कोतवाल, वि.स.स.

५) श्री. अब्दुल रशीद ताहीर मोमिन, वि.स.स.

६) श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.

७) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स.

८) श्री. विनोद घोसाळकर, वि.स.स.

९) श्री. मोहन जोशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री. भा. शं. गायकवाड, अवर सचिव (समिती)

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

१) डॉ.के.पी. गोरे, कुलगुरु
२) डॉ.बी.बी. भोसले, कुल सचिव
३) डॉ.जी.आर. मोरे, संचालक संशोधन
४) श्री.व्ही.एस. शिंदे, संचालक व अधिष्ठाता
५) डॉ.एन.डी. पवार, संचालक विस्तार शिक्षण
६) डॉ.डी.डी. कोळेकर, विद्यापीठ अभियंता
७) डॉ.वसंत पवार, विभाग प्रमुख
८) डॉ.सुरेश सोनी, सहयोगी अधिष्ठाता
९) डॉ.आर.जी. नादरे, सहयोगी अधिष्ठाता

समितीने परभणी जिल्ह्यातील मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या विविध प्रकल्पांची / कामाची पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

दुसरी बैठक
दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२
स्थळ -: विधान भवन, मुंबई
: उ प स्थि ती :

१) श्री. दिलीप मोहिते, वि.स.स., तथा समिती प्रमुख

२) श्री. वल्लभ बेनके, वि.स.स.

३) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.

४) श्री. शिरीषकुमार कोतवाल, वि.स.स.

५) श्री. प्रदीप जाधव नाईक, वि.स.स.

६) श्री. चैनसुख संचेती, वि.स.स.

७) श्री. रविंद्र वायकर, वि.स.स.

८) श्री. अबु आसिम आजमी, वि.स.स.

९) श्री. दीपक साळुंखे, वि.प.स.

१०) श्री. मोहन जोशी, वि.प.स.

११) डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री. अशोक मोहिते, उप सचिव

२) श्री. शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव

३) श्री. भा. शं. गायकवाड, अवर सचिव (समिती)

कृषि विभाग

श्री.दिनेश कुदळे, उप सचिव, कृषि विभाग

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

१) डॉ. के. पी. गोरे, कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ

२) डॉ. जी. आर. मोरे, संचालक, संशोधन, म.कृ.वि.

३) डॉ. दत्ता भांगे, सहाय्यक नियंत्रक, म.कृ.वि.

४) श्री. वि. न. नागुला, सहाय्यक कुलसचिव

समितीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१२ रोजी परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठास दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

तिसरी बैठक
दिनांक ११ सप्टेंबर, २०१२
स्थळ -: विधान भवन, मुंबई
: उ प स्थि ती :

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.,

३) श्री.अशोक जाधव, वि.स.स.,

४) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.,

५) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

६) ॲड.चिंतामण वनगा, वि.स.स.,

७) श्री.सुभाष देसाई, वि.स.स.,

८) श्री.रवींद्र वायकर, वि.स.स.,

९) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.,

१०) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.,

११) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.,

१२) श्री.अनिल भोसले, वि.प.स.,

१३) श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.अशोक मोहिते, उप सचिव

२) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव

विभागीय अधिकारी

१) श्री.सुधीर गोयल, अप्पर मुख्य सचिव,

२) श्री.के.पी.गोरे, कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ

समितीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१२ रोजी परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठास दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने विभागीय सचिव व विभागीय प्रतिनिधींनीची साक्ष घेतली.

चौथी बैठक
दिनांक : १० डिसेंबर, २०१२
स्थळ -: विधान भवन, नागपूर
: उ प स्थि ती :

१) श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.अशोक जाधव, वि.स.स.

३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.

४) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

५) श्री.शिशिर शिंदे, वि.स.स.

६) श्री.विवेक पाटील, वि.स.स.

७) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.अशोक मोहिते, उप सचिव
२) श्री.शिवदर्शन साठ्ये, अवर सचिव
३) श्री.जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती)

समितीने प्रारुप अहवालावर चर्चा करून अहवाल संमत केला.

प्रपत्र - १

प्रपत्र - २

प्रपत्र - ३

प्रपत्र - ४

प्रपत्र - ५